शुक्रवार
२७
मार्च २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३७९
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



पंजाब किंग्जच्या ताफ्यात २ ऑस्ट्रेलियन 'फायटर'
(पान ७ वर)

## थोडक्यात

### आयपीएलचा उद्घाटन सोहळा रद्द



**मुंबई :** आयपीएल २०२६ ची सुरुवात २८ मार्चपासून होणार असली तरी यंदा स्पर्धा कोणत्याही उद्घाटन सोहळ्याशिवाय सुरू होणार आहे. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात पहिला सामना खेळला जाणार आहे. मात्र, बीसीसीआयने यंदा ओपनिंग सेरिमनी रद्द करण्याचा महत्वाचा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ४ जून २०२५ रोजी बंगळुरूमध्ये घडलेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्दैवी घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यासाठी बीसीसीआयने आयपीएलच्या १९व्या हंगामाचा उद्घाटन सोहळा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

### ममतांच्या विरोधात दाखल करणार चार्जशीट!



**पश्चिम बंगाल :** पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह २८ मार्च रोजी राज्याचा दौरा करणार आहेत. यावेळी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांच्या विरोधात चार्ज शीट दाखल करण्यात येणार आहे. ममता बॅनर्जी यांच्या गडाला सुरुंग लावण्यासाठी भाजपकडून पश्चिम बंगालसाठी खास रणनीती आखली जात आहे. जोरदार प्रचार आणि आकर्षक वचनांची खैरात वाटली जात आहे. प्रचाराच्या रिंगणात भाजपचे चाणक्य अमित शाह उतरणार आहेत. येत्या २८ मार्च रोजी अमित शाह एक महत्त्वाची पत्रकार परिषद घेणार आहेत आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस (टीएमसी) विरुद्ध औपचारिकपणे आरोपपत्र दाखल करणार आहेत. यामध्ये सत्ताधारी पक्षावरील भाजपच्या आरोपांची रूपरेषा असेल.

### कुवेत इंटरनॅशनल विमानतळावर हल्ला



**कुवेत:** आखाती देशाच्या उड्डाण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार कुवेत इंटरनॅशनल विमानतळावर ड्रोनद्वारे हल्ला करण्यात आला. यावेळी इंधन टाकीला आग लागली. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या हल्ल्यात फक्त ''मर्यादित'' नुकसान झाले आहे. प्रवक्ते अब्दुल्ला अल-राजही यांनी सांगितले, की संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ आपत्कालीन प्रक्रिया लागू केल्या आणि आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाला तैनात करण्यात आले. इराण अमेरिका इस्त्रायल यांच्यात युद्ध सुरु झाल्यापासून कुवैत विमानतळावर अनेक वेळा हल्ले झाले आहेत. १४ मार्च रोजी नागरी उड्डाण प्राधिकरणाने सांगितले होते की अनेक ड्रोनद्वारे करण्यात आलेल्या हल्ल्यात विमानतळाला लक्ष्य करण्यात आले आणि त्याच्या रडार प्रणालीवरही हल्ला झाला. त्या घटनेतही कोणतीही जीवितहानी झाली नव्हती.

# कोरोनाचा नवा व्हेरियंट २३ देशांत पसरला; जगभरात चिंता!


**वॉशिंग्टन : दि.२६ वृत्तसंस्था**

कोरोनाच्या '.३.२' या नव्या व्हेरियंटने (ज्याला 'सिकाडा' असेही संबोधले जात आहे) पुन्हा एकदा डोकं वर काढलं आहे. अमेरिकेतील २५ राज्यांसह जगातील २३ देशांमध्ये या व्हेरियंटचा शिरकाव झाला असून अमेरिकेची आरोग्य संस्था 'सीडीसी' () आणि जागतिक आरोग्य संघटनेने () यावर चिंता व्यक्त केली आहे.

हा व्हेरियंट ओमिक्रॉन कुटुंबातीलच एक उपप्रकार आहे. शास्त्रज्ञांच्या मते, हा व्हेरियंट २०१२ नंतर गायब झालेल्या '.३' मालिकेतील एक जुना दुवा आहे, जो आता अधिक प्रबळ होऊन परतला आहे. दक्षिण आफ्रिकेमध्ये नोव्हेंबर २०२४ मध्ये याचा पहिला रुग्ण आढळला होता. सध्या डेन्मार्क, जर्मनी आणि नेदरलँड्समधील नमुन्यांपैकी ३०% नमुने याच व्हेरियंटचे आढळत आहेत. या व्हेरियंटमध्ये ७० ते ७५ जनुकीय बदल (म्यूटेशन) झाले आहेत. विशेषतः याच्या 'स्पाइक प्रोटीन'मधील बदलांमुळे हा विषाणू जुन्या संसर्गातून किंवा लसीकरणातून मिळालेल्या रोगप्रतिकारशक्तीलाचकमा देण्यास अधिक सक्षम झाला आहे. परिणामी, हा व्हेरियंट इतर प्रकारांच्या तुलनेत अधिक संक्रामक असल्याचे मानले जात आहे.

### प्रमुख लक्षणे आणि तीव्रता

डॉक्टरांच्या मते, 'सिकाडा' व्हेरियंटची लक्षणे जुन्या कोरोनासारखीच असली, तरी काही बदल प्रामुख्याने जाणवत आहेत. घशामध्ये तीव्र खवखव किंवादुखणे , खूप जास्त थकवा आणि शरीरात सतत वेदना जाणवणे. नाक गळणे, नाक बंद होणे आणि कोरडा खोकला. सौम्य किंवा तीव्र ताप आणि थंडी वाजून येणे, ही लक्षणे दिसत आहेत.



### प्रतिबंधात्मक उपाय

आरोग्य यंत्रणांनी नागरिकांना गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरणे, हातांची स्वच्छता राखणे आणि लक्षणे दिसल्यास तातडीने चाचणी करून घेण्याचे आवाहन केले आहे. भारतात अद्याप याचा मोठा धोका समोर आला नसला, तरी आंतरराष्ट्रीय विमानांमुळे खबरदारी घेणे आवश्यक आहे.

### लस प्रभावी ठरेल का?

शास्त्रज्ञांच्या मते, या व्हेरियंटमधील प्रचंड म्यूटेशन्स पाहता सध्याची लस यावर किती प्रभावी ठरेल, याबाबत साशंकता आहे. सध्या हा व्हेरियंट 'डेल्टा'सारखा जीवघेणा असल्याचे सिद्ध झाले नसले, तरी त्याचा वेगाने होणारा प्रसार पाहता याला 'तत्काळ धोका' मानून सावध राहण्याची गरज असल्याचे व्हायरोलॉजिस्टनी स्पष्ट केले आहे.


# नरहरी झिरवाळ यांची तृतीय पंथीयासोबत अश्लील चित्रफित!

## झिरवाळ यांची मंत्रीपदावरून हकालपट्टी करण्याची मागणी

**मुंबई: दि.२६ वृत्तसंस्था**

**राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते नरहरी झिरवाळ यांची तृतीयपंथी व्यक्तीसोबतची अश्लील चित्रफित समाजमाध्यमावर प्रसारित झाल्याने खळबळ उडाली आहे. हा प्रकार मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानातील असून काँग्रेसने झिरवाळ यांची मंत्री पदावरून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे.**

तृतीयपंथी पवन यादव हा मंत्री झिरवाळ यांच्यासोबत चित्रफितीमध्ये दिसतो आहे. यादव याच्यावर मुंबईतील कुरार पोलिस ठाण्यात खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल आहे. झिरवाळ हे नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी या आदिवासी बहुल मतदार संघाचे आमदार आहेत. त्यांची प्रसारित झालेली चित्रफीत सात महिन्यापूर्वीची आहे. शासकीय निवासस्थानामध्ये तृतीयपंथी व्यक्ती मंत्री झिरवाळ यांच्यासोबत बिछान्यावर असून शेजारी खाद्य आणि मद्य आहे. दोन महिन्यापूर्वी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिकाला ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले (पान २ वर)



### चित्रफीत प्रकरणाची झिरवाळ यांना कल्पना

या चित्रफीत प्रकरणाची झिरवाळ यांना कल्पना होती. मंगळवारी झिरवाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केल्याचे सूत्रांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर पक्षांमध्ये मोठा गोंधळ सुरू आहे. मंत्री पदासाठी काही इच्छुक असून त्यामधून झिरवाळ यांना लक्ष केले जात असल्याची पक्षांमध्ये चर्चा आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मंत्री झिरवाळांच्या व्हायरल व्हिडीओबाबत बोलताना एक मोठा दावा केला. मंत्री झिरवाळांच्या व्हायरल व्हिडीओमागे एका माजी मंत्र्याचा हात असल्याचा गंभीर आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. मात्र, तो माजी मंत्री नेमकं कोण? हे विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं नाही.

### हा व्हिडीओ पवन यादव यानेच रेकॉर्ड केला!

तृतीयपंथी पवन यादव याचा नरहरी झिरवाळ यांच्यासोबत व्हायरल होणाऱ्या व्हिडीओवर बोलताना पवन यादव याचा भाऊ रवी यादव याने खुलासा करत थेटपणे सांगितले की, व्हायरल होणाऱ्या व्हिडीओमध्ये मंत्री नरहरी झिरवाळ दिसत आहे आणि माझा भाऊ पवन यादव हा आहे. हा व्हिडीओ माझा भाऊ पवन यादव यानेच रेकॉर्ड केला. तृतीयपंथी पवन यादव याच्यासोबत नरहरी झिरवाळ याने अनेकदा अनैतिक संबंध ठेवल्याचा दावाही रवी यादव याने केला आहे. (पान २ वर)



## प्रवाशांनी भरलेली बस नदीत कोसळली; २३ जणांचा मृत्यू

**ढाका : दि.२६ वृत्तसंस्था**

बांगलादेशमध्ये प्रवाशांनी खचाखच भरलेली एक बस खोल नदीत कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या अपघातात २३ प्रवाशांचा बुडून मृत्यू झाला. बसमध्ये अनेक मुलांसह अंदाजे ४० जण प्रवास करत होते.समोर आलेल्या माहितीनुसार, ईदच्या सुट्ट्या साजरे करून प्रवासी ढाक्याला परतत असताना हा भीषण अपघात घडला. बचाव आणि मदतकार्य सुरू आहे. अनेक जण अद्याप बेपत्ता आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. हा अपघात बुधवारी सायंकाळी घडला. अपघातानंतर क्रेनच्या साहाय्याने बस नदीतून बाहेर काढण्यात आली. परिस्थिती अत्यंत कठीण होती. खराब हवामानामुळे बचावकार्य अवघड झाले होते. बस बाहेर काढण्यासाठी अंदाजे सहा तास लागले. मिळालेल्या माहितीनुसार, फेरीमध्ये चढण्याचा प्रयत्न करत असताना बसचा तोल गेला आणि ती पद्मा नदीत कोसळली. अपघातानंतर घटनास्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. लष्कर, पोलीस, अग्निशमन दल आणि तटरक्षक दलाची पथके संयुक्तपणे बचावकार्य करत आहेत.

फेरीमध्ये चढण्याचा प्रयत्न करत असताना बस नदीत कोसळली. बेपत्ता प्रवाशांचा शोध सुरू असून, मृतांचे मृतदेह नदीतून बाहेर काढले जात आहेत. (पान २ वर)

# आंध्र प्रदेशात १३ जणांचा आगीत होरपळून मृत्यू!

## खासगी ट्रॅव्हलची डंपरला जोरदार धडक



**नेल्लोर: दि.२६ वृत्तसंस्था**

आंध्र प्रदेशातील मार्कापुरम जिल्ह्यात आज पहाटेच्या सुमारास एक हृदयद्रावक घटना घडली आहे. रायवरमजवळ एका खासगी ट्रॅव्हल्सची डंपरशी भीषण धडक होऊन झालेल्या अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या भीषण अपघातात बस पूर्णपणे जळून खाक झाली असून, मृतांचा आकडा अधिकृतपणे १३ असल्याचे मुख्यमंत्री कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हरिकृष्णा ट्रॅव्हल्सची ही बस तेलंगणातील निर्मल येथून आंध्र प्रदेशातील नेल्लोरकडे जात होती. आज (२६ मार्च) पहाटे सहाच्या सुमारास मार्कापुरम जिल्ह्यातील रायवरमजवळ बस आणि एका डंपरची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, क्षणार्धात बसने पेट घेतला. बसमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधी मिळण्यापूर्वीच आगीने रौद्र रूप धारण केले. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. सुमारे तीन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. पोलिसांनी सुरुवातीला मृतांची (पान २ वर)

### मुख्यमंत्र्यांकडून दु:ख व्यक्त

या भीषण अपघातावर आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी दु:ख व्यक्त केले आहे. मृतांच्या नातेवाईकांप्रती त्यांनी संवेदना प्रकट केल्या असून, जखमींना योग्य उपचार देण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

# अशोक खरात प्रकरणात दररोज नवे खुलासे!

## बंदुकीचा परवाना नाशिक जिल्हा प्रशासनानेच दिला

## पाण्याची जोडणी मातोश्रीच्या मॅडमच्या आग्रहाखातर

**मुंबई: दि.२६ वृत्तसंस्था**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण सध्या राज्यभरात चांगलं गाजत आहे. नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरुन सध्या राजकीय वर्तुळात अनेकांचे धाबे दणाणले आहेत. अशोक खरात हा राज्यातील अनेक बड्या राजकीय नेत्यांचा अध्यात्मिक मार्गदर्शक होता. अशोक खरातकडून जप्त बंदुकीचा परवाना नाशिक जिल्हा प्रशासनानेच दिल्याचे उघड झाले आहे. १५ ऑक्टोबर २०१२ रोजी शस्त्र परवाना मंजूर झाला होता. १ जानेवारी २०२४ रोजी परवान्याचे नूतनीकरण झाल्याची नोंद आहे. चौकशीत अशोक खरातच्या फार्महाऊसवरून २१ काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. त्यापैकी ५ काडतुसे वापरलेली, वापर कशासाठी केला याचा तपास सुरू आहे. राज्यभर गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणात दररोज नवे खुलासे समोर येत आहे. गेल्या सात दिवसांच्या तपासात शस्त्र बाळगल्याची माहिती समोर आली आहे. काडतुसांचा वापर नेमका कुठे झाला?, तपास यंत्रणांचा शोध



सुरू आहे. शस्त्र परवान्यासाठी खरातने जिल्हा प्रशासनाकडे अर्ज केला होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीनंतरच शस्त्र परवाना देण्यात आल्याची माहिती आहे. आता बंदुकीचा परवाना रद्द करण्याची प्रक्रिया सुरू आहे. याचदरम्यान, शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी एक्सवर केलेल्या ट्विटमुळे एकच खळबळ उडाली आहे.क्रूरकर्मा खरातला दिली गेलेली पाण्याची जोडणी ही मातोश्रीच्या मॅडमच्या आग्रहाखातर देण्यात आली होती म्हणेयही तो नही 'ताज' का राज? उबाठाला हा प्रश्न विचारलाच पाहिजे. 'ताज का राज' फुटला तर यांच्या तोंडचं पाणी पळेल, असं ट्विट शीतल म्हात्रेंनी केलं आहे. शीतल म्हात्रेंच्या या आरोपामुळे (पान २ वर)

### खरातच्या विरोधात आठवा गुन्हा दाखल

परदेशात लॉजिस्टिक्सचा व्यवसाय सुरू करण्यास मदत करण्याच्या बहाण्याने ६ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप पुण्यातील व्यावसायिक, हडपसर येथे राहणाऱ्या ५१ वर्षीय राजेंद्र जसूद यांनी केल्यानंतर अटक करण्यात आलेला स्वयंघोषित बाबा अशोक खरात विरोधात नाशिकमधील सरकारवाडा पोलिसांनी आणखी एक नवीन गुन्हा दाखल केला आहे. खरातच्या विरोधात दाखल झालेला हा आठवा गुन्हा आहे. जसूद यांनी म्हटले आहे की, त्यांचा खरातशी २०१८ मध्ये संपर्क आला होता. त्यांना परदेशात लॉजिस्टिक्सचा व्यवसाय सुरू करायचा होता. त्यासाठी सल्ला आणि मार्गदर्शन घेण्यासाठी खरात याला भेटण्यास सुचवले. त्यानुसार, जून २०१८ मध्ये त्यांनी नाशिक येथे जाऊन खरातची भेट घेतली. व्यवसायाच्या यशासाठी अवतारपूजा करणे आवश्यक आहे. यासाठी त्याने जसूदकडे मर्सिडीज कारची भेट मागितली, तसेच पाच वर्षांत करावयाच्या २१ देशांच्या दौऱ्याचा खर्चही जसूदलाच उचलावा लागेल, असेही सांगितले. त्यानुसार जसूदने डिसेंबर २०१८ मध्ये खरातच्या म्यानमार दौऱ्याची आणि (पान २ वर)

## देशात पुरेसा इंधन साठा: मुख्यमंत्री

**मुंबई: दि.२६ वृत्तसंस्था**

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाईच्या वावड्या उठल्याने राज्यातील काही ठिकाणी पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील इंधन स्थिती स्पष्ट करत जनतेला घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. राज्याकडे पेट्रोल आणि डिझेलचा आवश्यक साठा उपलब्ध असून, नागरिकांनी विनाकारण गर्दी करू नये, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले



की, केंद्र सरकारने देशात पुरेसा इंधन साठा असल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे; मात्र सोशल मीडियावरील अफवांमुळे नागरिक गरजेपेक्षा जास्त इंधन भरून घेत आहेत, ज्यामुळे पुरवठा साखळीवर विनाकारण ताण येत आहे. दरमहा जेवढ्या इंधनाची आवश्यकता असते, (पान २ वर)

### रिफायनरी १०० टक्के क्षमतेने सुरू

देशातील सर्व तेल शुद्धीकरण कारखाने (रिफायनरी) सध्या १०० टक्के क्षमतेने कार्यरत आहेत. कच्च्या तेलाचा पुरेसा साठा आपल्याकडे असून पुरवठ्यात कोणतीही तांत्रिक अडचण नाही. त्यामुळे 'पॅनिक बाइंग' (घाबरून खरेदी करणे) टाळावे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# आदित्य ठाकरेंनी संजय राऊतांची कॉलर पकडली?: खळबळजनक दावा

## सुषमा अंधारे विरुद्ध शितल म्हात्रे: ट्विटर वॉर

**मुंबई: दि.२६ वृत्तसंस्था**

शिवसेनेच्या दोन्ही गटांतील वाकयुद्ध आता टोकाला पोहोचले असून, शिंदे गटाच्या नेत्या शितल म्हात्रे यांनी ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांच्याबाबत एक खळबळजनक दावा केला आहे. गेल्या आठवड्यात आदित्य ठाकरे यांनी संजय राऊत यांची कॉलर पकडल्याची चर्चा असल्याचे म्हात्रे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे, ज्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे आणि शितल म्हात्रे यांच्यात सध्या जोरदार 'ट्विटर वॉर' सुरू आहे. अंधारे यांनी विधान परिषदेच्या आगामी जागांच्या पार्श्वभूमीवर शितल म्हात्रे



आणि नीलम गोऱ्हे यांच्यावर टीका केली होती. शिंदे यांची भाटगिरी अधिक तीव्रतेने करण्यासाठी म्हात्रे आणि गोऱ्हे जोमाने कामाला लागल्या आहेत, असा टोला अंधारे यांनी लगावला होता. या टीकेला प्रत्युत्तर देताना शितल म्हात्रे यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेत ठाकरे गटाच्या अंतर्गत वादावर बोट ठेवले. शितल म्हात्रे यांनी आपल्या पोस्टमध्ये प्रियांका चतुर्वेदी यांची जागा घेण्यावरून आणि शरद पवार यांच्या राज्यसभेवरील निवडीवरून ठाकरे गटात नाराजी असल्याचे सूचित केले. त्यांनी लिहिले की, आदू बाळाने (आदित्य ठाकरे) (पान २ वर)

## उपाय योजना — गॅस पाइपलाइन व पीएनजी वितरणासाठी केंद्र सरकारचा नवा आदेश

# विना अडथळा खोदकाम करता येणार!

**पुणे : दि.२६ वृत्तसंस्था**

**मध्यपूर्व भागामध्ये सुरु असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा भारतावर परिणाम झाला आहे. देशामध्ये तेल आणि गॅसचा तुटवडा निर्माण झाला. व्यावसायिक गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. याचा विपरित परिणाम हॉटेल, खानावळी आणि मेसवर झाला आहे. या गॅस तुटवड्यातून बाहेर येण्यासाठी केंद्र सरकारकडून जोरदार प्रयत्न सुरु आहेत. यामध्ये तेल खरेदी देखील मोठ्या प्रमाणात केली जात आहे.**

केंद्र सरकारने देशभरात नैसर्गिक गॅस व पेट्रोलियम उत्पादनांच्या वितरणाला गती देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेत



नवीन आदेश जारी केला आहे. २४ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या या आदेशानुसार गॅस पाइपलाइन टाकणे, देखभाल, विस्तार आणि संबंधित सुविधा उभारणीसाठी एक सुसंगत नियमावली लागू करण्यात आली आहे. अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि ऑल इंडिया पेट्रोल डिलर असोसिएशन कोअर कमिटी सदस्य अली दारूवाला यांनी दिली. अली दारूवाला यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या या आदेशामुळे घरगुती ग्राहकांना पाइपद्वारे नैसर्गिक गॅस पुरवठा वाढवण्यावर भर देण्यात आला असून, एलपीजीवरील अवलंबित्व कमी करण्याचा सरकारचा उद्देश आहे. ज्या भागांमध्ये नैसर्गिक गॅस पाइपलाइन उपलब्ध आहे, तेथे एलपीजी ऐवजी पीएनजी वापरास प्रोत्साहन दिले जाणार आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की, पाइपलाइन टाकताना विविध परवानग्या, जास्त शुल्क, जमीन उपलब्धतेतील अडचणी आणि रहिवासी संघटनांकडून होणारा विरोध यामुळे प्रकल्पांमध्ये विलंब होत होता. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी नवीन नियमांमध्ये परवानगी प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. या आदेशानुसार सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील संस्थांना ठराविक कालमर्यादेत पाइपलाइनसाठी परवानगी देणे बंधनकारक राहणार आहे. तसेच, परवानगी वेळेत न दिल्यास ती 'स्वतःच मंजूर' झालेली मानली जाईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

### गॅस वितरण मजबूत करण्यावर भर

महत्त्वाचे म्हणजे, निवासी भागांमध्ये पाइपलाइन टाकण्यास कोणीही अडथळा निर्माण करू शकणार नाही. जर नागरिकांनी पीएनजी कनेक्शन घेण्यास नकार दिला, तर ठराविक कालावधीनंतर त्या ठिकाणी एलपीजी पुरवठा बंद करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने इंधनाचे विविधीकरण आवश्यक असल्याचे केंद्र सरकारने नमूद केले आहे. जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या अडचणी, विशेषतः खाडी प्रदेशातील परिस्थिती लक्षात घेता, देशांतर्गत गॅस वितरण मजबूत करण्यावर भर दिला जात आहे.

# पान 1 वरून...

## आंध्र प्रदेशात १३ जणांचा ...

संख्या १४ सांगितली होती, मात्र नंतर मुख्यमंत्री कार्यालयाने १३ जणांच्या मृत्यूला अधिकृत दुजोरा दिला आहे. बसमध्ये एकूण ३५ प्रवासी होते, त्यापैकी २२ जण जखमी झाले आहेत. मार्कापुरमचे पोलीस अधीक्षक व्ही. हर्षवर्धन राजू यांनी सांगितले की, अपघातात जखमी झालेल्या २२ जणांना, ज्यात डंपर चालकाचाही समावेश आहे, तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बसमध्ये ३५ प्रवासी प्रवास करत होते. घटनेचा पंचनामा सुरू असून मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

## प्रवाशांनी भरलेली बस नदीत ...

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी ५:१५ च्या सुमारास नैऋत्येकडील राजबारी येथील दौलादिया टर्मिनलवर बस पद्मा नदीत कोसळल्याने हा अपघात झाला. घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, ढाक्याकडे जाणाऱ्या या बसमध्ये ४० प्रवासी होते. दौलादिया टर्मिनलवर फेरीमध्ये चढत असताना ती नदीत कोसळली. प्रत्यक्षदर्शींनी असेही सांगितले की, ४० प्रवासी असलेली बस फेरीच्या जवळ पोहोचत असताना एका लहान बोटीला धडकली. या धडकेमुळे बसचा तोल गेला आणि ती थेट खोल नदीत कोसळली.

## आदित्य ठाकरेंनी संजय ...

गेल्या आठवड्यात राऊतची (संजय राऊत) कॉलर धरली म्हणे. राज्यसभेसाठी शरद पवारांना पाठिंबा देण्याच्या मुद्द्यावरून आदित्य ठाकरे आणि संजय राऊत यांच्यात खडाजंगी झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती, त्यावरच म्हात्रे यांनी हा दावा केला आहे. म्हात्रे यांनी अंधारे यांच्यावर वैयक्तिक टीका करताना म्हटले की, विधान परिषदेची जागा मिळवण्यासाठी मातोश्रीच्या मॅडमची किती चापलूसी कराल? खासदार-आमदार होण्याची स्वप्ने आता सोडून द्या. अंधारे यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावरही टीका केल्यामुळे म्हात्रे यांनी तुमच्या राजकीय जीवनातील अंधार काही दूर होणार नाही, असे म्हणत अंधारे यांना लक्ष्य केले. दरम्यान, एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुका पाहता, दोन्ही गटांतील महिला नेत्यांमधील हा वाद आगामी काळात अधिकच चिघळण्याची शक्यता आहे. शितल म्हात्रे यांच्या या 'कॉलर' दाव्यावर सुषमा अंधारे यांनी शितल म्हात्रे यांच्या ट्विटला तीव्र प्रत्युत्तर देत म्हटले, अहो विषय भरकटवू नका. आपण तुमच्यावर संशोधन करायला बोलत आहोत. बाय द वे तुमचा व्हिडिओ मॉर्फ केलाय असं तुम्ही म्हणाला होतात. तोच तो सुर्वे प्रकरणातला, त्यातला नेमका ओरिजिनल व्हिडिओ सापडला का हो? सुषमा अंधारे यांनी शितल म्हात्रे यांच्या पूर्वीच्या एका व्हिडिओ प्रकरणाचा मुद्दा उपस्थित करून त्यांना चांगलेच टोमणे लगावले. दोन्ही नेत्यांमधील ही ट्विटर छन्नाछन्नी सध्या सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आहे. अशोक खरात प्रकरणात राजकीय आरोप-प्रत्यारोपांची नवी फेरी सुरू झाली असून, दोन्ही गटांमध्ये तीव्र शाब्दिक युद्ध पाहायला मिळत आहे.

## देशात पुरेसा इंधन साठा...

तेवढा पुरवठा नियमित सुरू आहे. तरीही कोणी या परिस्थितीचा फायदा घेऊन पेट्रोल-डिझेलचा काळाबाजार करत असेल, तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. दरम्यान, वाढती गर्दी आणि गोंधळ टाळण्यासाठी काही जिल्ह्यांमध्ये स्थानिक प्रशासनाने इंधन वितरणाचे नियोजन केले आहे. त्यानुसार, दुचाकी वाहनांना एका वेळी २०० रुपयांचे, तर चारचाकी वाहनांना २००० रुपयांचे इंधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. काही पंपांवर इंधन संपल्याचे फलक केवळ अचानक वाढलेल्या मागणीमुळे लावले गेले असून, तो कायमस्वरूपी तुटवडा नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## अशोक खरात प्रकरणात दररोज ...

शिवसेना ठाकरे गट कोणती प्रतिक्रिया देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना नाशिकमधील दारणा धरणातून अशोक खरात याच्या शिवनिका संस्थेसाठी ३९ लाख लिटर पाणी मंजूर करण्यात आले होते, ज्याचा जीआर नुकताच समोर आल्याने राजकीय वाद निर्माण झाला आहे. या संस्थानला पाणी पुरवण्यासाठी धरणापासून ४८ किलोमीटर लांब पाईपलाईन टाकण्यात आली होती. हे पाणी पिण्यासाठी आरक्षित दाखवले असले तरी, त्याचा वापर खरातच्या २१ एकरमधील आंब्याच्या बागेसाठी केला जात असल्याचा आरोप आहे. हा प्रस्ताव २५ जून २०२० रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मंजूर झाला होता. त्यावेळी जयंत पाटील हे जलसंपदा मंत्री होते.

## खरातच्या विरोधात आठवा ...

जून-जुलै २०१९ मध्ये ग्रीनलँड दौऱ्याची व्यवस्था केली. त्यानंतर त्याने खरातला अमेरिकेलाही नेले आणि तिथे त्याच्या प्रवासावर व रुग्णालयाच्या खर्चावर सुमारे २९.८१ लाख रुपये खर्च केले. जसूदने खरातला एक मर्सिडीज कारही भेट दिली. यासाठी जसूदने १५ लाख रुपये रोख दिले आणि उर्वरित ७५ लाख रुपयांचे कर्ज बँकेकडून घेतले. याव्यतिरिक्त, खरातने आपल्या फार्महाऊसच्या बांधकामासाठी, त्याच्या अंतर्गत सजावटीसाठी (इंटेरिअर) आणि फर्निचर खरेदीसाठी जसूदकडून सुमारे २.५ कोटी रुपये घेतले, असेही त्यात म्हटले आहे. जेव्हा जसूदच्या लक्षात आले की आपली फसवणूक होत आहे, तेव्हा त्याने खरातकडे मर्सिडीज कार आणि त्याच्यावर खर्च केलेले पैसे परत करण्याची मागणी केली; मात्र खरातने जसूदविरुद्ध जिल्ह्यातील वावी पोलीस ठाण्यात ५ कोटी रुपयांच्या खंडणीची तक्रार दाखल केली.

## नरहरी झिरवाळ यांची तृतीय ....

होते. तेव्हाच झिरवाळ यांच्या राजीनाम्याची विरोधकांनी मागणी केली होती. अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षाचे अध्यक्षपद सुनेत्रा पवार यांना मिळायला हवे, अशी मागणी करणारे झिरवाळ हे राष्ट्रवादीचे पहिले नेते होते. दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण करण्याचे अजित पवार यांनी ठरवले होते, असेही झिरवाळ यांनी जाहीर सांगितले आहे. ही चित्रफीत समोर आल्यानंतर झिरवाळ चर्चेत आले असून त्यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे यांच्यानंतर मंत्रीपद सोडावे लागणारे झिरवाळ हे राष्ट्रवादी काँग्रेसचे तिसरे मंत्री ठरतील. मंत्री नरहरी झिरवाळ यांची चित्रफित समाज माध्यमावर प्रसारित होणे महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिक अध:पतनाचे ज्वलंत उदाहरण आहे. झिरवाळ यांचा मंत्रीपदाचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. या संदर्भात झिरवाळ यांच्या स्वीय सहायकांशी संपर्क साधला असता साहेबांना याप्रकरणी काही बोलायचे नाही, असे सांगण्यात आले.

## हा व्हिडीओ पवन यादव यानेच ...

पवन याला सरकारच्या तृतीयपंथी बोर्डात मोठे पद हवे असल्याने त्याचा आणि झिरवाळचा संबंध आल्याचे रवी यादव यांनी सांगितले. यादरम्यानच रवी यादव यांनी नरहरी झिरवाळ यांच्यावर अजून काही गंभीर आरोप केले आहेत.

## हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग :

**मुंबई:**महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून फिलेरियासिसचा पूर्णतः नायनाट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की,विशेषतः दुर्लक्षित असलेल्या फिलेरियासिससारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली होती. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्रात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र शासनाकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे.

# हॉस्पिटलच्या टीमनेच केला नवजात बाळाचा ३ महिन्यापेक्षा अधिक काळ सांभाळ

**सांगली , दि. २६** वृत्तसंस्था

सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलमधील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या हॉस्पिटलमध्ये २६ नोव्हेंबर २०२५ रोजी एका बाळाचा जन्म झाला. बाळाच्या जन्मानंतर दुसऱ्याच दिवशी त्या बाळाची आई बाळाला सोडून पळून गेली. आईचा शोध घेण्यात आला मात्र ती कुठेच सापडली नाही.
हे बाळ शारीरिक दृष्ट्या नाजूक असल्यानं त्या बाळाचा सांभाळ तेथील स्टाफनेच करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान बाळाला हर्निया झाल्याचेही समोर आले. त्यावर ऑपरेशन सुद्धा करण्यात आलं.
या आईने एका मुलाला जन्म दिला आणि त्यानंतर ती हॉस्पिटलमधून चक्क पळून गेली त्यानंतर सिव्हिल स्टाफने तब्बल महिन्यापेक्षा अधिक



काळ या बाळाचा सांभाळ केला. आज म्हणजेच गुरुवारी (२६ मार्च) हे बाळ पुण्याला पाठवण्याची वेळ आली त्यावेळी सिव्हिलच्या स्टाफने बाळाचे नामकरण केलं आहे.
यावेळी आईविना असलेल्या या बाळाचं नाव वीरप्रताप असं ठेवण्यात आलं आहे. शासनाच्या आदेशाने हा तीन महिन्याचा वीरप्रताप पुण्याकडे रवाना झाला असून वीरप्रतापला निरोप देताना त्याचा सांभाळ करणाऱ्या स्टाफला रडू कोसळले. हे बाळ सांगली सिव्हिल हॉस्पिटलच्या विशेष नवजात शिशु दक्षता केंद्रातील स्टाफ सांभाळत होते. तब्बल तीन महिने या बाळाचा सांभाळ केल्यानंतर कोर्टाच्या आदेशाने आज बाळाला पुण्याला पाठवण्यात आलं. याबाबतचे कायदेशीर सोपस्कार पूर्ण करून या बाळाला पुण्याला पाठवण्यात आलं आहे. सांगली सिव्हिलच्या नर्सिंग स्टाफकडून बाळाच्या नामकरणासाठी पाळणा सजवण्यात आला. रांगोळ्या काढण्यात आल्या. फुग्यानी सजावट करण्यात आली. यावेळी या अनाथ बाळासाठी पाळना सुद्धा म्हणण्यात आला. शासनाच्या आदेशाने हा तीन महिन्याचा वीर प्रताप आज पुण्याकडे रवाना होणार होता. त्यामुळे त्याला निरोप देण्यासाठी सांगली सिव्हिल हॉस्पिटलमधील सर्व स्टाफ एकत्र आला असून यावेळी तीन महिने सांभाळ केलेल्या बाळाला पाठवताना येथील स्टाफ भावूक झाले.

# अशोक खरातच्या पीएचा सर्वात मोठा खुलासा

**मुंबई, दि. २६** वृत्तसंस्था

महिलांचा लैंगिक छळ करणाऱ्या स्वयंघोषित ज्योतिषी आणि आध्यात्मिक गुरु अशोक खरात प्रकरणात नवा ट्विस्ट समोर आला आहे. खरात यांचा अत्यंत जवळचा विश्वासू आणि खासगी सचिव (पीए) म्हणून ओळखला जाणारा रमेश हिंगे गेल्या पाच दिवसांपासून फरार असल्याची चर्चा होती.
मात्र आता हिंगे यांनी समोर येत एका वृत्तवाहिनीला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत त्यांनी खरात यांच्या फार्महाऊसवर मंत्री, उच्च पदस्थ अधिकारी आणि प्रतिष्ठित व्यक्ती कशा पद्धतीने येत असत, याबाबत महत्त्वाचे खुलासे केले आहेत.
रमेश हिंगे यांनी स्पष्टपणे सांगितले की, ''मी एक शिक्षक आहे. मी कधीही अशोक खरात यांचा खासगी सचिव (पीए) नव्हतो आणि आत्ताही नाही. मी त्यांचा मॅनेजरही नाही. मी फक्त सुट्टीच्या दिवशी ईशान्येश्वर मंदिरात स्वयंसेवक म्हणून जात असे. तिथे अनेक अधिकारी आणि मान्यवर येतात, त्यांना बघण्यासाठी मी जात असे. खरात यांच्या इतर काळ्या कारनाम्यांशी माझा काहीही संबंध नाही. मी त्यांच्या कोणत्याही संस्थेत कोणत्याही पदावर नाही ट्रस्टी नाही, मॅनेजर नाही, पीएही नाही.''
हिंगे यांनी पुढे सांगितले की, ते ईशान्येश्वर मंदिराबरोबरच अशोक खरात यांच्या फार्महाऊसवरही जात असत. फार्महाऊसवर पाण्यासाठी आणि बागेच्या देखभालीसाठी ते जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.
फार्महाऊसवरील वातावरणाबाबत बोलताना रमेश हिंगे म्हणाले, ''रविवारी माझ्यासारखे अनेक भाविक फार्महाऊसवर असायचेच. त्यांना खरात यांच्या दर्शनासाठी किंवा त्यांना बघण्यासाठी यायचे. आमचे काम फक्त स्वयंसेवक म्हणून चहा-पाणी देणे एवढेच होते. अशोक खरात प्रत्येक रविवारी फार्महाऊसवर असायचे. काही वेळा ते फक्त बाहेर असायचे, तर कधी महिनाभरही तिथे नसायचे.''

# डॉ. दिवाकर आचार्य यांच्या ' पीळ ' कादंबरीस राज्यस्तरीय उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार जाहीर

**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी



**अकोला, दि. २६ :**अकोला येथील प्रख्यात दंतशल्य चिकित्सक डॉ. दिवाकर कृष्ण आचार्य यांच्या 'पीळ ' कादंबरीस उत्कृष्ट कादंबरीचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराकरिता महाराष्ट्र आणि इतरही राज्यातील साहित्यिक व प्रकाशकांकडून २५२ ग्रंथ प्राप्त झाले होते. या सर्वांमधून 'पीळ'कादंबरीची निवड करण्यात आली.
महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात नवनव्या उपक्रमांसाठी वर्धा येथील मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठान प्रसिद्ध आहे. या प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या २०२६ च्या राज्यस्तरीय '' मारोतराव नारायणे स्मृती '' पुरस्कारांची नुकतीच घोषणा करण्यात आली असून त्यात उत्कृष्ट कादंबरी चा पुरस्कार डॉ. दिवाकर आचार्य यांनी लिहिलेल्या '' पीळ '' कादंबरीस जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कार निवड समितीचे परीक्षक म्हणून नाशिक येथील प्रयोगशील कादंबरीकार राकेश वानखडे, नागपूर येथील शांती विद्या भवन चे प्राचार्य व प्रख्यात समीक्षक डॉ. प्रकाश राठोड तसेच पुरस्कार संयोजन समितीचे सदस्य डॉ. संदीप भेले, किशोर पेटकर व सूर्यकांत पाटील यांनी काम पाहिले. मारोतरावं नारायणे यांच्या स्मृतिदिनानिमित्त २५ एप्रिल २०२६ रोजी वर्धा येथील एका भव्यसमारंभात डॉ. आचार्य यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात येईल.
' पीळ' या कादंबरीचे लेखक दिवाकर कृष्ण आचार्य हे दंतशल्य चिकित्सक असून अकोला येथे कार्यरत आहेत. अकोल्यातील दंत महाविद्यालयात ते २४ वर्षे प्राध्यापक होते. अखेरच्या १० वर्षात त्यांनी सहाय्यक अधिष्ठाता हे पद भूषविले. ते व्यवसायाने जरी डॉक्टर असले तरी साहित्य व लेखन क्षेत्रात त्यांचे प्रचंड योगदान आहे. त्यांनी लिहिलेल्या अनेक कथा, कादंबऱ्या व विविध लेखांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांच्या 'माइल्स टू गो'या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा'' सर्वोत्कृष्ट साहित्य निर्मिती 'चा पुरस्कार मिळालेला आहे. डॉ. दिवाकर आचार्य यांना या 'पीळ 'कादंबरीची कल्पना सर्वप्रथम १९८० च्या दरम्यान सुचली. व त्यानंतर या विषयाचा अभ्यास व संशोधन करून पाच वर्षांपूर्वी त्यांनी या कादंबरीचे लिखाण सुरू केले होते. पशुवैद्य आणि त्यांचा पशुंसोबत असलेला भावनिक बंध हा विषय मराठी साहित्य क्षेत्राला अपरिचित आहे. या कादंबरीमध्ये दोन समांतर विश्व आहेत. एक म्हणजे स्वतःचे स्वतंत्र स्वभाव असलेल्या माणसाचे आणि दुसरे म्हणजे तेवढेच स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेल्या जनावराचे. पशुवैद्य असलेला डॉक्टर अर्जुन या कथानकाचा नायक तर अडलेली म्हैस '' लक्ष्मी '' या कथानकाची दुसरी नायिका. भूमी, स्त्री आणि म्हैस या तिन्ही सृजन तत्त्वांची वेदना एकच असते. हे अधोरेखित करणारी ही कादंबरी शोषण, भय, अपमान, दु:ख, वेदना, अहंकार यांचे वेगवेगळे '' पीळ '' उलगडत जाते. त्यात सोबत पश्चिम वऱ्हाडांमधील ग्रामीण कृषीवल जीवन आणि लोकभाषा यांचे अस्सल आणि वास्तववादी जीवन या ''पीळ '' कादंबरीतून बघावयास मिळते.

# प्रशिस सोनोने यांचा कृषी अधिकारी झाल्याने सत्कार



**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :**बार्शीटाकळी तालुक्यातील लहानशा सकनी गावातील अल्पभुधारक शेतकरी व झोपडीत राहणारे दिलीप महादेव सोनोने यांचा मुलगा प्रशिस सोनोनेच्या अथक मेहनतीतून राज्यस्तरीय परिक्षेत चांगले गुण प्राप्त करून कृषी अधिकारी पदी झेप घेतल्याबद्दल समाजाने आदर्श घ्यावा अशा सुसंस्कारी प्रशिस सोनोने व त्याचे कुटूंबाचा पुष्पगुच्छ व 'गाथा रमाईची' ग्रंथ भेट देवून माँ जिजाऊ सार्व. वाचनालयाचे अध्यक्ष तथा लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष पंजाब वर व कार्यकारी संपादिका सुनंदा वर यांनी यथोचित सत्कार केला. प्रशिस सोनोने याने अगदी बिकट परिस्थितीत झोपडीत राहून, कोणतीही सुविधा उपलब्ध नसतांना, बीएस्सी ॲग्री चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला व त्यानंतर स्पर्धा परिक्षेची तयारी करून त्याने हे कृषी अधिकारी पद प्राप्त केले आहे त्याचे कुटूंबात काका बुद्धभुषण सोनोने उपशिक्षणाधिकारी तर दुसरे काका दिनेश सोनोने आरटीओ कर्मचारी आहे. अक्षद शिवदास सोनोने एम.बी.बी.एस करीत असून आनंद सोनोने, श्रद्धा सोनोने (इंगोले) हे इंजिनिअर आहेत. यावेळी शकुंतला प्रभाकर आडोळे, बबीता वसंता सोनोने, सुनिता दिलीप सोनोने, राजकन्या बंडूजी सोनोने,सुनिता शिवदास सोनोने, छबुताई दिलीप सोनोने, सुरेखा दिनेश सोनोने, मनस्वी बुद्धभुषण सोनोने, पुष्पा पवन सोनोने, इंजी. आनंद सोनोने, कांता संघपाल आडोळे, करुणा अजय नाईक, श्रद्धा प्रतिक इंगोले, छाया डापसे, चारूताई सुशिल भगत, अनूजा जीवन बेलखडे, बाली गजानन खिराडे, विजूताई इंगोले, तृप्ती विशाल आडोळे, बाळूभाऊ सोनोने आदींची उपस्थिती होती.

# ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन

**मुंबई :**ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन झाल्याचे वृत्त समोर आले आहे. आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालावली. एक दु:खद बातमी समोर आली आहे. महाराष्ट्राचे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे निधन झाले झाले आहे. आज पहाटेच्या सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ८५ वर्षाचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती बिघडली होती. अखेर आज त्यांची पहाटे प्राणज्योत मालावली. त्यांच्या अकाली निधनाच्या बातमीने ''मराठेशाहीचा इतिहासकार हरपला'' अशी भावना व्यक्त केली जात आहे. त्यांच्या जाण्याने इतिहास संशोधनात एक पोकळी निर्माण झाली आहे.
ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ, विचारवंत आणि राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचे खंदे पुरस्कर्ते म्हणून डॉ. जयसिंगराव पवार यांची ख्याती होती. डॉ. जयसिंगराव पवार यांचा जन्म ३० डिसेंबर १९४१ रोजी सांगली जिल्ह्यातील तडसर येथे झाला. त्यांनी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठातून एम.ए. (सर्वप्रथम) आणि पीएच.डी. पदवी संपादन केली.तीन दशकांहून अधिक काळ महाविद्यालयीन क्षेत्रात प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले.

# प्रियंका चतुर्वेदी खासदारांच्या बैठकीत भडकल्या ?

**मुंबई, दि. २६** वृत्तसंस्था

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर खासदारांची एक बैठक आयोजित केली असल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीत पक्षाच्या नेत्या प्रियंका चतुर्वेदी यांनी राज्यसभेच्या जागेवरुन नाराजी व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.
उद्धव ठाकरे बोलत असतानाच प्रियंका चतुर्वेदी भडकल्या आणि त्यांनी संजय राऊत यांनी शरद पवार यांचं नाव का घेतलं? असा सवाल केला. त्यांनी यावर आपली नाराजी व्यक्त केली. ते (संजय राऊत) बोलले म्हणून काय झालं? पक्षप्रमुख मी आहे. ते बोलले म्हणून काय झालं शेवटी निर्णय मीच घेईल, असे उद्धव ठाकरे म्हणाले. यानंतर राजकीय वर्तुळात खासदारांच्या बैठकीत झालेल्या खडाजंगी झाल्याची चर्चा रंगली आहे. अशातच खासदार संजय राऊत यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. ''मला माहिती नाही. मी त्या बैठकीला नव्हतो. असं काही अजिबात घडलेलं नाही. मी या पक्षाच्या स्थापनेपासूनचा सदस्य आहे एवढचं मी सांगतो''. असे ते म्हणाले. पुढे संजय राऊत म्हणाले, स्वतः बाळासाहेब ठाकरेंनी ज्यांना नियुक्त केले त्यातला मी एक आहे.

# महाराष्ट्रात कुपोषणाचे संकट गडद!

## हवामान बदलामुळे ६० लाख मुलांच्या आरोग्याला धोका

**मुंबई, दि. २६** वृत्तसंस्था




राज्यासह देशभरात हवामान बदलामुळे दुष्काळ, तापमान वाढीमुळे अनेक क्षेत्रांवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. आता कुपोषणाच्या कारणांमध्ये हवामान बदल हासुद्धा एक प्रमुख घटक असल्याचे युनिसेफ मानते. हवामान बदलामुळे विविध प्रकारे पोषणावर परिणाम होत आहे.
महाराष्ट्रातील दुष्काळ, उष्णतेची लाट आणि कृषी क्षेत्रावर कोसळलेली संकटे यांचा परिणाम कुपोषणावर झालेला दिसत असून भविष्यात याचा धोका वाढला आहे. यामुळे मातेच्या पोषणाला प्राधान्यक्रम देण्याचे आवाहन युनिसेफने केले आहे.
मातेचे पोषणविषयक प्राधान्यक्रम आणि समावेशक प्रारंभिक बाल्यावस्थेतील विकास या विषयावर युनिसेफ-इंडिया आणि पत्र सूचना कार्यालय यांच्यातर्फे बुधवारी आयोजित क्षमता निर्मिती कार्यशाळेत तत्संबंधी चर्चा झाली.
यातून पुढे आलेल्या मुद्द्यांनुसार असे दिसून आले आहे की, गर्भाच्या आणि बाळाच्या मेंदूच्या विकासाच्या महत्त्वाच्या काळात हवामान बदल गर्भवती महिलांवर परिणाम करतो.
युनिसेफच्या ज्येष्ठ सल्लागार डॉ. मृदुला फडके म्हणाल्या, प्रारंभिक बाल्यावस्था विकासाच्या काळातील पोषणाचा अभाव गर्भावर परिणाम करून गर्भातील जिवाला आयुष्यभरासाठी मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित गुंतागुंतीसारखे आजार जडण्याची स्थिती निर्माण होते.
जेव्हा एखादी गर्भवती महिला आहारविषयक असुरक्षितता, हृदयावर ताण किंवा शारीरिकदृष्ट्या थकवणारे बाळंतपण यांना सामोरी जाते तेव्हा फक्त तिच्याच आरोग्याला धोका निर्माण होतो असे नव्हे तर तिच्या बाळाचे आरोग्य आयुष्यभरासाठी धोक्यात येऊ शकते, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, गर्भाचा आणि गर्भावस्थेतील बाळाच्या अगदी सुरुवातीच्या काळात बाळाच्या शरिराच्या चयापचयाची प्रक्रिया निश्चित होते. या टप्प्यात कमी पोषण मिळाले तर बाळाच्या आयुष्यात नंतरच्या काळात लठ्ठपणा, इन्सुलिन प्रतिकार तसेच टाईप २ प्रकारचा मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयरोग आणि मानसिक आजार होण्याची शक्यता बळावते.

**उपक्रम** | **दिग्गज कलाकार आणि मंत्र्यांची उपस्थिती**

# साताऱ्यात रंगणार ४४ वी राज्यस्तरीय कलाशिक्षण परिषद

**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**सातारा, दि. २६ :** महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळ आणि सातारा जिल्हा कलाध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ४४ वी राज्यस्तरीय कलाशिक्षण परिषद दि. २८ व २९ मार्च २०२६ रोजी साताऱ्यातील स्व. यशवंतराव चव्हाण बहुउद्देशीय सभागृह, जिल्हा परिषद येथे भव्यदिव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेचे उद्घाटन शनिवार, दि. २८ मार्च रोजी दुपारी १२ वाजता राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून खासदार ना. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी कला क्षेत्रातील नामवंत अधिकारी, पदाधिकारी आणि कलाकारांची उपस्थिती लाभणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत




कलाशिक्षकांसाठी वैचारिक आणि प्रात्यक्षिक अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चित्रकार ओंकार पवार, सत्यजित वरेकर तसेच युवा शिल्पकार मंदार लोहार यांची थेट प्रात्यक्षिके हा विशेष आकर्षण ठरणार आहे. 'रंगरेषा ते डिझाईन : सृजनात्मक प्रवास' आणि 'नवीन शैक्षणिक धोरणातील कलाशिक्षणाचे स्थान' या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. तसेच कला क्षेत्रातील करिअरच्या संधी व जागतिक स्तरावरील आर्ट स्टुडिओविषयी मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. परिषदेतील राज्यस्तरीय पुरस्कार वितरण व कलाध्यापकांचा गौरव सोहळा हा आणखी एक आकर्षणाचा केंद्रबिंदू असणार आहे. परिषदेदरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम, निसर्गचित्र स्पर्धा आणि कलाशिक्षकांसाठी खुला मंच असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. रविवार, दि. २९ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता समारोप सोहळा होणार असून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांत (दादा) पाटील, शालेय शिक्षण मंत्री ना. दीपक केसरकर, पर्यटन मंत्री ना. शंभूराज देसाई यांची उपस्थिती लाभणार आहे. महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र बाराई यांनी या परिषदेचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, बदलत्या शैक्षणिक धोरणात कलेचे स्थान व कलाशिक्षकांचे भविष्य या विषयांवर या परिषदेत मंथन होणार आहे. राज्यातील अधिकाधिक कलाशिक्षक, कलाकार आणि कलाप्रेमींनी या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. या परिषदेसाठी सातारा जिल्हा कलाध्यापक संघाचे अध्यक्ष उमेश देशमुख व पदाधिकारी परिश्रम घेत असून अकोला जिल्हा कलाध्यापक संघाचे अध्यक्ष संदीप शेवलकर व सचिव चंद्रकांत वाघ यांनी अकोला जिल्ह्यातील कलाशिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे. दरम्यान, अकोला जिल्ह्यातून सुभाष धार्मिक, संजय आगाशे, संदीप शेवलकर, चंद्रकांत वाघ, गणेश खानझोडे, संजय गोपनारायण, विठ्ठल इढोळे, विवेक फोकमारे, हनुमंत चव्हाण, उमेश जोशी, संतोष सहारे, उद्धव काळपांडे, संजय तायडे, आनंदा फुलारी, गणेश निमकंडे, राजेश अंभोरे, शिवदास बेलोकार, सुनील देशमुख, गजानन गाडगे, मुकेश गव्हाणकर, महेंद्र कोकणे, मंगेश श्रीवास, राजेश्वर ताले, अनिल आयस्कार, दिपक भुसारी आदी कलाशिक्षक उपस्थित राहणार आहेत.

# रुपाली चाकणकरांच्या अडचणीत वाढ

**मुंबई, दि. २६** वृत्तसंस्था

अशोक खरातप्रकरणी एका जुन्या कागदपत्राने रुपाली चाकणकर यांच्या अडचणीत पुन्हा वाढ झाली आहे. अशोक खरातच्या वडिलांच्या निधनानंतरची २०१७ मधील त्यांच्या दशक्रिया पत्रिकेचा एक फोटो समोर आला आहे.
ज्यात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे नाव शोकाकुल म्हणून छापण्यात आल्याचे समोर आले आहे.

**CHANGE IN NAME**
My Old name was
**MOHAMMED SHAFI MOHAMMAD HASHAM**
now my new name is
**MOHAMMAD SHAFI MOHAMMAD HASHAM**
Passport No:M5976997
For All Futures Purposes
**Address**
**NEAR LOKHANDI POOL AGAR BES,OLD CITY AKOLA**

महत्त्वाचे

## अमेरिकेचे 'सुरक्षा कवच' अयशस्वी!

**नवी दिल्ली** :मध्य-पूर्वेतील आकाशात सध्या शांतता नाही, तर मृत्यूचे तांडव सुरू आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष आता केवळ धमक्यांपुरता मर्यादित राहिला नसून, तो एका भीषण युद्धाच्या रूपात समोर आला आहे. इराणने केलेल्या ताज्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांनी कुवेतपासून सौदी अरेबियापर्यंत पसरलेल्या अमेरिकन लष्करी तळांना अक्षरशः हादरवून सोडले आहे. या हल्ल्यांमध्ये अमेरिकेचे अतोनात नुकसान झाले असून, ६ शूर सैनिकांनी आपला जीव गमावला आहे. हल्ल्याचा सर्वात भीषण फटका कुवेतला बसला आहे. शुऐबा बंदरातील अमेरिकेचे 'टॅक्टिकल ऑपरेशन्स सेंटर' इराणच्या अचूक क्षेपणास्त्र माऱ्यात पूर्णपणे जमीनदोस्त झाले. या स्फोटात ६ अमेरिकन सैनिकांचा जागीच मृत्यू झाला. इतकेच नाही, तर 'अली अल सालेम' हवाई तळावरील विमानांचे हँगर्स आणि 'कॅम्प ब्यूहरिंग' येथील इंधन साठेही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आहेत. अमेरिकेसाठी हा गेल्या अनेक दशकांतील सर्वात मोठा लष्करी धक्का मानला जात आहे.

## इस्रायलने उडविला इराणचा एकमेव पाणबुडी तळ

**तेहरान** :मध्य-पूर्वेतील युद्ध आता एका अशा भीषण वळणावर पोहोचले आहे, जिथे इस्रायलने इराणच्या अस्तित्वावरच घाला घालण्यास सुरुवात केली आहे. मंगळवारची रात्र इराण आणि लेबनॉनसाठी काळरात्र ठरली. इस्रायली हवाई दलाने अत्यंत अचूक गुप्त माहितीच्या आधारे इराणच्या लष्करी शक्तीचा कणा असलेल्या इस्फहान येथील पाणबुडी उत्पादन केंद्रावर भीषण हल्ला केला. या एका हल्ल्याने इराणने गेल्या कित्येक वर्षांपासून नौदलात वर्चस्व मिळवण्यासाठी केलेली मेहनत मातीत मिसळली आहे. इराणमधील इस्फहान हे शहर लष्करी दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील मानले जाते. याच ठिकाणी इराणचे एकमेव लष्करी पाणबुडी प्रणाली संशोधन आणि विकास केंद्र होते. इस्रायल डिफ ेन्स फोर्सच्या मते, हे इराणमधील असे एकमेव ठिकाण होते जिथे आधुनिक पाणबुड्यांची रचना आणि निर्मिती केली जात होती. इतकेच नाही, तर या केंद्रात इस्रायलला समुद्रातून धोका निर्माण करू शकणारी 'मानवरहित जहाजे' देखील बनवली जात होती. इस्रायलच्या लढाऊ विमानांनी या केंद्रावर इतका अचूक निशाणा साधला की, आता इराणला नवीन पाणबुडी तयार करणे किंवा जुन्या पाणबुड्या दुरुस्त करणे पुढील अनेक वर्षे शक्य होणार नाही.

इस्रायलने केवळ इराणलाच नाही, तर लेबनॉनमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या हिजबुल्लाहलाही मोठा दणका दिला आहे. लेबनॉनची राजधानी बैरुतमधील दहिया भागात असलेल्या हिजबुल्लाहच्या मुख्यालयावर इस्रायलने बॉम्बचा पाऊस पाडला.

# अबु धाबीत क्षेपणास्त्राचे अवशेष कोसळून भीषण दुर्घटना

## एका भारतीयाचा मृत्यू

**अबु धाबी: दि.२६ वृत्तसंस्था**



अबु धाबीमध्ये गुरुवारी क्षेपणास्त्र रोखल्यानंतर पडलेल्या अवशेषांमुळे झालेल्या दुर्घटनेत एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती जॉर्डनच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. या घटनेत अन्य एक भारतीय आणि एक जॉर्डनचा नागरिक जखमी झाले असून, ते थोडक्यात बचावले आहेत. जॉर्डनच्या परराष्ट्र मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, या दुर्घटनेत भारतीय नागरिकासह पाकिस्तनाच्या नागरिकाचाही मृत्यू झाला आहे. जॉर्डनने या घटनेचा तीव्र निषेध केला असून, याला 'इराणी हल्ला' म्हटले आहे. स्थानिक प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, ही दुःखद घटना अबु धाबीतील 'स्वीहान स्ट्रीट' येथे घडली. अबु धाबी मीडिया ऑफिसने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वायु संरक्षण प्रणालीद्वारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र यशस्वीरित्या रोखल्यानंतर स्वीहान स्ट्रीटवर पडलेल्या अवशेषांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीला प्रशासनाने त्वरित प्रतिसाद दिला आहे. इराण आणि इस्रायल-अमेरिका यांच्यातील युद्ध सुरू झाल्यापासून संयुक्त अरब अमिरातीमधील ऊर्जा पायाभूत सुविधांसह अनेक ठिकाणांना इराणी ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी लक्ष्य केले आहे. 'गल्फ न्यूज'च्या वृत्तानुसार, युएईमध्ये आतापर्यंत या युद्धाशी संबंधित ११ मृत्यूंची नोंद झाली आहे. यापूर्वी नोंदवलेल्या नऊ मृत्यूंमध्ये युएई सशस्त्र दलाच्या तीन सदस्यांचा समावेश होता. युएईच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, आतापर्यंत पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश आणि पॅलेस्टाईनच्या सहा नागरिकांचाही मृत्यू झाला आहे. बुधवारी मंत्रालयाने माहिती दिली की, इराणच्या आक्रमकतेच्या सुरुवातीपासून, युएईच्या वायु संरक्षण दलाने ३५७ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, १५ क्रूझ क्षेपणास्त्रे आणि १,८१५ यूएव्ही (ड्रोन) नष्ट केले आहेत. या संपूर्ण काळात एकूण १६६ लोक जखमी झाले असून, त्यांच्या जखमांचे स्वरूप किरकोळ ते गंभीर आहे. जखमींमध्ये युएई, भारत, पाकिस्तान, इजिप्त, सुदान, इथिओपिया, फिलीपिन्स, बांगलादेश, श्रीलंका, ओमान, जॉर्डन आणि स्वीडनसह अनेक देशांच्या नागरिकांचा समावेश असल्याचे मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

**जर वेळ निघून गेली, तर...**

दरम्यान, अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धात रशिया इराणला गुप्तपणे ड्रोन पुरवत असल्याचा दावा काही दिवसांपूर्वी करण्यात आला होता. याबाबत वेगवेगळ्या चर्चा समोर आल्या होत्या. मात्र, अमेरिका-इस्रायल बरोबरच्या युद्धात इराणला गुप्तपणे रशियाने खरंच ड्रोन पुरवले का? याबाबतचा खुलासा पहिल्यांदाच रशियाने केला आहे. इराणला गुप्तपणे ड्रोन पुरवल्याचं वृत्त रशियाने फेटाळून लावलं आणि हे वृत्त खोटं असून त्याकडे लक्ष देऊ नये असं रशियाने म्हटलं आहे. याबाबत क्रेमलिनचे (रशियन राष्ट्रपती कार्यालय) प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी पत्रकारांशी बोलताना हा खुलासा करत हे वृत्त फेटाळून लावलं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत सुरू असलेल्या वाटाघाटींबाबत आपली कडक भूमिका मांडली असून इराणी प्रतिनिधींच्या वागणुकीवर तीव्र शब्दांत टीका केली.

## इस्रायली हल्ल्यात इराणी अधिकारी ठार



इराणच्या बंदर अब्बास शहरावर केलेल्या हल्ल्यांमध्ये इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) चे नौदल कमांडर अलीरेझा तंगसिरी यांना ठार केल्याचा दावा इस्रायलने केला आहे. अलीरेझा तंगसिरी हे आयआरजीसी नौदलाचे प्रमुख होते आणि इराणच्या सागरी लष्करी रणनीतीमधील एक प्रमुख व्यक्ती मानले जात होते, विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये, जिथे त्यांनी जहाज पाळत आणि लष्करी कारवायांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, या दाव्याला इराणकडून अद्याप अधिकृतपणे दुजोरा देण्यात आलेला नाही. इस्रायली लष्कराने सांगितले की, बंदर अब्बास येथे झालेल्या हल्ल्यात इराणी रिव्होल्यूशनरी गार्ड नौदलाच्या गुप्तचर विभागाचे प्रमुख बेहनम रझाई ठार झाले. या हल्ल्यात नौदल कमांडर अलीरेझा तंगसिरी हेही ठार झाले. लष्कराच्या म्हणण्यानुसार, या कारवाईत नौदलाच्या अनेक वरिष्ठ कमांडरांना लक्ष्य करून ठार करण्यात आले, विशेषतः सागरी कारवायांमध्ये सहभागी असलेल्यांना. इस्रायलने म्हटले आहे की, बेहनम रझाई अनेक वर्षांपासून नौदलाच्या गुप्तचर विभागात कार्यरत होते. प्रादेशिक देशांविषयी गुप्त माहिती गोळा करणे आणि इतर संस्थांशी समन्वय साधण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती.

# अमेरिकेला शरण गेला इराण?

## ट्रम्प यांना थेट 'सर्वोच्च नेता' बनण्याची ऑफर, जगभरात खळबळ

**वॉशिंग्टन/तेहरान : दि.२६ वृत्तसंस्था**



इराणशी सुरु असलेल्या तणावादरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक मोठे विधान केले आहे. यामुळे जागतिक राजकारणात खळबळ उडाली आहे. गुरुवारी (२६ मार्च २०२६) एका कार्यक्रमात बोलताना ट्रम्प यांनी दावा केला आहे की, इराणच्या जनतेने त्यांना अनऔपचारिकपणे त्यांचे पुढीव सर्वोच्च नेते बनण्याची ऑफर दिली आहे. परंतु त्यांना हा प्रस्तावर नाकरल्याचे म्हटले. सध्या ट्रम्प यांच्या या विधानाने मोठी खळबळ उडाली आहे.

ट्रम्प यांनी अमेरिका-इराण युद्ध संपवण्यासाठी पडद्यामागू चर्चा करत असल्याचा दावा केला आहे, जो इराणने फेटाळला असून ट्रम्प खोट्या अफवा पसरवत असल्याचे म्हटले आहे. या दरम्यान त्यांनी आणखी एक मोठा दावा केला आहे. त्यांनी म्हटले की, काही इराणी लोक मला, तुम्हीच आमचे पुढील सर्वोच्च नेते व्हा असे म्हणत होते. पण त्यांना स्पष्टपमे नकार दिला आहे. त्यांना कोणत्याही दुसऱ्या देशाचा नेता बनण्याची इच्छा नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांच्या मते इराण सध्या अत्यंत कमकुवत परिस्थिती असून त्यांना लवकरात लवकर युद्धबंदी करायची आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी अमेरिका-इस्रायलच्या संयुक्त हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांचा मृत्यू झाला होता. तेव्हापासून इराणच्या सत्तेत पोकळी निर्माण झाल्याचा दावा ट्रम्प करत आहेत. तसेच नवे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनेई मृत असल्याचीही शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. सध्या अमेरिकेने इराणसमोर १५ अटींचा प्रस्ताव मांडला आहे. यामध्ये इराणला अणु कार्यक्रम बंद करण्याचा, हिजबुल्लाह आणि इतर दहशतवादी गटांना मिळणारा पाठिंबा थांबवण्याचा, आणि 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' हा सागरी मार्ग व्यापारासाठी पुन्हा खुला करावयात या प्रमुख अटी आहेत.

# जम्मू-काश्मीरमध्ये हाय अलर्ट!

**नवी दिल्ली : दि.२६ वृत्तसंस्था**

## दहशतवाद्यांचा आयईडी हल्ल्याचा कट



जम्मू आणि काश्मीरमध्ये पुन्हा एकदा सुरक्षा वाढवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. गुप्तचर यंत्रणांच्या माहितीच्या आधारे, संपूर्ण जम्मू-कश्मीरमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. दहशतवादी संघटना आयईडी वापरून सुरक्षा दलांवर मोठा हल्ला करण्याचे प्लॅनिंग करत असल्याची मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोणताही संभाव्य धोका टाळण्यासाठी ही सतर्कता सर्व सुरक्षा यंत्रणा आणि सैन्याची तैनाती वाढवण्यात आली आहे. सुरक्षा दलांना त्यांच्या हालचाली मर्यादित ठेवण्याचे आणि बुलेटप्रूफ नसलेल्या वाहनांचा वापर टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून, आता केवळ बुलेटप्रूफ वाहनांमधूनच गस्त घालण्याचा आणि कारवाई करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. संवेदनशील भागांमध्ये अतिरिक्त दक्षता घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

गुप्तचर माहितीमुळे, दहशतवादी आयईडी स्फोट आणि त्यानंतर अंदाधुंद गोळीबार करण्याची त्यांची पूर्वीची पद्धत पुन्हा वापरू शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे. अशा परिस्थितीत, सुरक्षा दलांना कोणत्याही परिस्थितीसाठी तयार राहण्याचे आणि एसओपीनुसार कार्य करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सध्या, यंत्रणा संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत आणि कोणत्याही संशयास्पद हालचालींवर तात्काळ कारवाई करण्यासाठी सतर्क आहेत.

याशिवाय, संभाव्य दहशतवादी धोक्याच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन आठवड्यांपासून राज्यातील सुरक्षा व्यवस्थेचा सातत्याने आढावा घेतला जात आहे. काही संवेदनशील ठिकाणे निश्चित करून 'शोधा आणि मारा' मोहीम राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जम्मू आणि काश्मीर पोलीस, सीआरपीएफ आणि लष्कराचे जवान या भागांमध्ये स्वतंत्रपणे किंवा संयुक्तपणे दहशतवादविरोधी कारवाया करत आहेत. महामार्ग आणि दुर्गम मार्गांवरही बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. या कारवायांमध्ये ड्रोन आणि स्निफर श्वानांनाही तैनात करण्यात आले आहे.

दहशतवादी संघटना आणि नक्षलवादी मोठ्या प्रमाणावर नुकसान करण्यासाठी आयईडीचा वापर करतात. यामध्ये अत्यंत स्फोटक आणि ज्वलनशील पदार्थ असतात, ज्यामुळे स्फोटानंतर लगेच आग लागते. आयईडी अनेकदा रस्त्याच्या कडेला किंवा पायवाटांवर लपवून ठेवलेले असतात आणि एखादी व्यक्ती किंवा वाहन त्यांच्या संपर्कात येताच त्यांचा स्फोट होऊ शकतो. ते रिमोट कंट्रोल किंवा इन्फ्रारेड ट्रिपवायरसारख्या साधनांनीही सक्रिय केले जाऊ शकतात.

# पुतिन यांनी मोदींच्या पाठीत खुपसला खंजीर?

## युद्धजन्य परिस्थितीत पाकिस्तानला मदत तर भारताला आडकाठी

**मॉस्को : दि.२६ वृत्तसंस्था**



पश्चिम आशियातील तणावामुळे जागतिक राजाकारणात वेगाने बदल होत आहे. अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण युद्ध मुळे स्ट्रेट ऑफ होर्मुझ सामुद्रधुनी बंद आहे. यामुळे जागतिक उर्जा संकट निर्माण झाले आहे. याच वेळी भारताचा सर्वात जुना मित्र रशियाने एकामागूएक धक्कादायक निर्णय खेले आहेत. रशियाने मात्र भारताला स्वस्त दरात तेल विकण्यास नकार दिला. याशिवाय खतांची निर्यातही थांबवली. ज्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

भारत देशाच्या एकूण गरजेपैकी जवळपास ४०% कच्चा तेलाची आयात ही आखीत देशांमधून स्ट्रेट ऑफ होर्मुझ मार्गे करतो. इराणने या मार्गावरुन भारताच्या काही जहाजांना जाऊ दिले आहे, परंतु परिस्थितीच्या मनाने जहाजांचा आवाका खूप कमी आहे. यामुळे संकट काळात भारताने आपल्या मित्राकडे रशिया कडे धाव घेतली होती. परंतु रशियाने भारताला तेल स्वस्त दरात देण्यास नकार दिला असून किमतीत मोठी वाढ केली आहे.

रशियाने तेलाच्या झटक्यानंतर भारताला आणखी एक मोठा हादरा दिला आहे. रशियाने देशांतर्गत मागणीला प्राधान्य देत इतर काही खतांची निर्यात २१ एप्रिल २०२६ पर्यंत थांबवली आहे. भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात खत आयात करतो. २०२५ मध्ये सुमारे २५ लाख टन खत भारताने एकट्या रशियाकडून खरेदी केले होते. परंतु हंगामाच्या तोंडावर रशियाने खत पुरवठा थांबवल्यामुळे भारताच्या शेतीला मोठा धक्का बसला आहे.

सध्या भारतासमोर दुहेरी संकट उभे ठोकले आहे. स्ट्रेट ऑफ होर्मुझ बंद असल्याने सौदी आणि ओमानसारख्या आखाती देशांतून होणारी आयात ठप्प झाली आहे. तर दुसरीकडे रशियाने खत पुरवठा थांबवला आहे. यामुळे भारताच्या अन्नधान्य उत्पादनावर परिणाम होण्याची आणि महागाई वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली. सध्या भारताकडे पर्यायी मार्ग म्हणून बेलारुस आणि मध्य आशियाईतील देश आहे. पण सगळ्यात विश्वासू मित्राने संकटकाळात पाठ फिरवल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर नव्या चर्चांना उधाण आले आहे.

# आम्ही दलाल नाहीः पश्चिम आशियातील तणावावर भारताची स्पष्ट भूमिका

**नवी दिल्ली : दि.२६ वृत्तसंस्था**



मध्यपूर्वेतील अमेरिका इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत मध्यपूर्वेतील संघर्षावर परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी भारताची भूमिका स्पष्टपणे मांडली. तसेच देशातील उर्जा आणि इंधन पुरवठ्यावरही महत्त्वपूर्ण विधान केले. याशिवाय मध्यपूर्वे तील संघर्षात पाकिस्तानच्या मध्यस्थीच्या भूमिकेला भारत दलाल देश नाही हे ठणकावून सांगितले.

पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने बुधवारी (२५ मार्च २०२६) एक महत्त्वाची सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, जी सुमारे दीड तास चालली. या बैठकीत गृहमंत्री अमित शाह, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्माला सीतारमन आणि पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्यासह वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान अमेरिका इराणमधील तणाव थांबवण्यासाठी पाकिस्तानच्या मध्यस्थीबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. यावेळी जयशंकर यांनी कठोर भूमिका घेत, भारत दलाल देश नाही अशा शब्दात भूमिका स्पष्ट करत पाकिस्तानच्या हस्तक्षेपाला केराची टोपली दाखवली. त्यांनी म्हटले की, पाकिस्तान १९८१ पासून अशा प्रकारची भूमिका बजावण्याचा प्रयत्न करत आहे, यामध्ये काहीही नवीन नाही.

याशिवाय बैठकीत इंधनाचा तुटवडा आणि तेलाच्या वाढत्या किमतींबाबत विरोधकांनी चिंता व्यक्त केली होती. यावर केंद्र सरकारने आश्वासन दिले की, भारताची उर्जा सुरक्षा पूर्णपणे सुरक्षित आहे. देशात तेल आणि वायूचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. यासाठी बुकिंह करण्यात आले आहे. तसेच सरकारचे स्ट्रेट ऑफ होर्मुझमधील पुरवठासाखळीवर बारकाईने लक्ष आहे. येत्या काही दिवसांत चार जहाजे भारतीय बंदरावर पोहोचतील असे सरकारने स्पष्ट केले.

उर्जा संकट

## मध्यपूर्वेतील संघर्षाचा फिलिपिन्सला मोठा तडाखा

# फिलिपिन्समध्ये राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा

**मनिला : दि.२६ वृत्तसंस्था**



मध्यपूर्वेतील अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण युद्धाने संपूर्ण जगभरात मोठे इंधन आणि उर्जा संकट निर्माण झाले आहे. या युद्धाचे पडसाद फिलिपिन्समध्येही उमटले आहे. याच पार्श्वभूमीवर फिलिपिन्सने राष्ट्रीय आणीबाणीची घोषणी केली आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर अशी आणीबाणी जाहीर करणारा फिलिपिन्स हा जगातील पहिला प्रमुख देश ठरला आहे.

फिलिपिन्सने मंगळवारी (२४ मार्च २०२६) रात्री उशिरा राष्ट्रीय आणीबाणीची घोषणा केली आहे. मध्यपूर्वेतील युद्धामुळे देशात गंभीर उर्जा संकट निर्माण झाले आहे. यामुळे देशाने हा निर्णय घेतला आहे. फिलिपिन्सचे राष्ट्रपती फर्डिनेंड मार्कोस ज्युनिअर यांनी एका कार्यकारी आदेशाद्वारे देशात इंधन टंचाईच्या धोक्याचा इशारा दिला आहे.

देशातील तेल पुरवठा विस्कळीत

फिलिपिन्स तेलासाठी मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेवर अवलंबून आहे. देशाच्या गरजेच्या जवळपास ९०% हून अधिक तेल मध्यपूर्वेतून आयात केले जाते. सध्या युद्धामुळे फिलिपिन्सचा तेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे चलन पेसोचीही ४ टक्क्यांनी घसरण झाली आहे. याशिवाय शेअप बाजारही ९ टक्क्यांनी कोसळला आहे. देशाच तेलाच्या किमती वाढल्या असून महागाईचा भडका उडाला आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, फिलिपिन्सकडे सध्या केवळ ४५ दिवसांचा तेल साठ शिल्लक आहे. राष्ट्रपती मार्कोस यांनी दिलेल्या माहितीनुसार, इंधनाचा पुरवठा झाला नाही तर देशातील विमानसेवा देखील पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता आहे. जून अखेरपर्यंत साठाच सुरक्षित असल्याचे फिलिपिन्सने म्हटले आहे.

संकटकाळात सरकारची कठोर पावले

सध्या फिलिपिन्स या संकटावर मात करण्यासाठी प्रयत्न करत आहे. यासाठी सरकारने विशेष समिती स्थापन केली असून ही समिती इंधन, अन्नधान्य, औषधे आणि कृषी उत्पादनांच्या वितरणावर देखरेख ठेवत आहे. तसेच गैर इंधन साठा रोखण्यासाठी आणि बचतीसाठी कडक नियम लागू करण्यात येणार आहेत. याशिवाय वाहतूक क्षेत्रालसा दिलासा देण्यासाठी इंधन आणि प्रवासी भाड्यावर सबसिडी देण्याचे निर्देश देण्यात आहेत.

सरकारी उर्जा कंपन्यांना तेल खरेदीसाठी १५ टक्क्याहून अधिक आगाऊ रक्कम देण्याची परनावगी देण्यात आली आहे.

मध्यपूर्वेतील अमेरिका इराण युद्धाने जागतिक स्तरावर चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. सध्या अमेरिकेने इराणला १५ कलमी शांतता प्रस्ताव पाठवला आहे. मात्र इराणने हा प्रस्ताव फेटाळला आहे. ज्यामुळे युद्धबंदीबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. युद्ध आणखी भडकण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

# मला दुसरे काम आहे, युद्ध लवकर संपवा!

**नवी दिल्ली : दि.२६ वृत्तसंस्था**

जागतिक राजकारणाच्या पटावर सध्या अत्यंत वेगवान हालचाली सुरू आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता इराण युद्धाबाबत आपला सर्वात मोठा आणि अंतिम निर्णय घेतला आहे. ''मला अजून बरेच काम करायचे आहे,'' असे म्हणत ट्रम्प यांनी आपल्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना आणि सल्लागारांना हे युद्ध येत्या ४ ते ६ आठवड्यांत संपवण्याचा कडक आदेश दिला आहे. ट्रम्प यांच्या या अनपेक्षित निर्णयामुळे केवळ इराणच नाही, तर संपूर्ण जगाचे लक्ष आता व्हाईट हाऊसकडे लागले आहे.

ट्रम्प यांना इराणसोबतचा हा संघर्ष का लांबवायचा नाहीये, यामागे एक मोठे राजनैतिक कारण आहे. मे महिन्याच्या मध्यात बीजिंगमध्ये चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि डोनाल्ड ट्रम्प यांची एक महत्त्वाची शिखर परिषद होणार आहे. या परिषदेपूर्वी इराणचे संकट पूर्णपणे दूर झालेले असावे, अशी ट्रम्प यांची जिद्द आहे. इराण युद्धावरून जगाचे लक्ष विचलित होत असल्याने, त्यांना आता आपल्या देशांतर्गत राजकीय अजेंड्यावर आणि चीनसोबतच्या व्यापारिक संबंधांवर लक्ष केंद्रित करायचे आहे. ट्रम्प यांच्या या घाईमागे अमेरिकेचे अंतर्गत नुकसान हे देखील एक मोठे कारण आहे. आतापर्यंत या संघर्षात सुमारे ३०० अमेरिकन सैनिक जखमी झाले असून १३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## हास्यास्पद मध्यस्थी!


अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे एक अस्थिर बुद्धीचे आणि अविचारी नेते आहेत. इस्रायलच्या आहारी जाऊन अमेरिका युद्धात पडल्यामुळे ट्रम्प यांचे काही सहकारी आणि सल्लागारदेखील नाराज असून, ट्रम्प प्रशासनातील 'यूएस काऊंटर टेररिझम'चे प्रमुख जो केंट यांनी तर नुकताच पदाचा राजीनामा दिला आहे. अमेरिकन संसदेला विश्वासात न घेता ट्रम्प यांनी इराणविरुद्धच्या युद्धात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. युद्ध सुरू झाल्याच्या आरंभीच इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांना ठार मारण्यात यश आल्यामुळे ट्रम्प यांनी सार्वजनिक कार्यक्रमात नाचत आपला आनंद व्यक्त केला. आता इराण तत्काळ शरण येणार, असे त्यांना वाटत होते. खामेनी यांच्या जागी दुसरा कोणीही नेता आला तरी त्याला खतम केले जाईल, अशा गर्जनाही ट्रम्प यांनी केल्या; मात्र इराणने होर्मुझची सामुद्रधुनी जवळपास बंद करताच आणि अन्य आखाती राष्ट्रांवर हल्ले सुरू करताच अमेरिकेचे धाबे दणाणले. इराणची ऊर्जा केंद्रे नष्ट करू, असा अमेरिकेने इशारा दिल्यानंतर आम्हीही तुमचे ऊर्जा प्रकल्प उद्ध्वस्त करू, असा प्रति इशारा इराणने दिला. इस्रायलने इराणच्या अणुकेंद्रानजीक हल्ला करताच याची आम्हाला कल्पनाच नव्हती, असे म्हणून ट्रम्प यांनी कानावर हात ठेवले. इराणची जनता तेथील धार्मिक नेतृत्वाविरुद्ध उठाव करेल, हा ट्रम्प यांचा अंदाजही फोल ठरला. उलट इराणमध्ये लाखो लोक खामेनींच्या अंत्ययात्रेत सामील झाले आणि नंतर वारंवार त्यांनी अमेरिकेविरुद्ध निदर्शनेही केली. युद्धामुळे इराणमधील जनतेची एकजूट वाढली आहे. उलट इस्रायल व अमेरिका यांच्यातील मतभेद समोर आले आहेत. आम्ही सांगू त्या शर्तींवर इराणला समझोता करावा लागेल, असे अमेरिकेने जाहीर करताच इराणने ही शक्यता साफ फेटाळून लावली. उलट आपल्याच शर्ती जाहीर केल्या... युद्ध तुम्ही सुरू केले आहे, आता ते आम्ही आमच्या पद्धतीने संपवू, असे इराणने घोषित करून टाकले. ट्रम्प यांनी अचानकपणे इराणमधील संभाव्य हल्ले पाच दिवस लांबणीवर टाकण्याची घोषणा केली आहे. अमेरिका-इराणमध्ये अतिशय चांगली व सकारात्मक चर्चा झाली. त्यातूनच युद्धावर पूर्ण तोडगा निघेल, असा दावा ट्रम्प यांनी समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये केला आहे. आश्चर्य म्हणजे इराणमधील कोणाशी चर्चा करण्यात आली, याची माहिती त्यांनी दिलेली नाही. इराणने तर अशा वाटाघाटी झाल्याच नसल्याचे स्पष्ट केले आहे. याचा अर्थ ट्रम्प यांनी धडधडीत खोटी माहिती दिली आहे का, असा प्रश्न निर्माण होतो; मात्र त्यापूर्वी इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अरागची यांनी अमेरिका-इराण चर्चेसाठी मध्यस्थी करणाऱ्या तुर्कस्तानचे परराष्ट्रमंत्री हकन फिदान यांच्याशी बोलणी केली आहेत. म्हणजे उभय देशांत समोरासमोर बोलणी न होता, मध्यस्थांच्या मार्फत मार्ग काढण्याच्या हालचाली सुरू असू शकतात. युद्ध सुरू होण्यापूर्वी ओमानमध्ये अशी बोलणी झाली होती आणि त्यातून इराणच्या अण्वस्त्र साठ्यांसदर्भात मार्गही निघाला होता. परंतु इस्रायल व अमेरिकेला कोणत्याही परिस्थितीत इराणला अद्दल घडवायची असल्यामुळे त्यांनी एकतर्फी युद्ध सुरू केले. गेल्या वर्षी देखील इस्रायल व अमेरिकेने इराणवर हल्ले चढवले होते. आता इराणने पश्चिम आशियातील ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करण्याचा इशारा दिल्यामुळे अमेरिकेने माघार घेतली, असे वृत्त इराणच्या सरकारी माध्यमांनी दिले आहे. हे देखील इराणचे प्रचारी कथनच म्हणावे लागेल; मात्र इराणने आखातातील काही अमेरिकन तळांवर व अन्य इमारतींवर बॉम्ब व क्षेपणास्त्र हल्ले केल्यामुळे त्या देशांचा अमेरिकेवर दबाव आला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीवर माझे आणि जे नवे अयातुल्ला असतील, अशा दोघांचे नियंत्रण असेल, असे उद्गार ट्रम्प यांनी काढले आहेत. इराणने याची टिंगल केली असून, अमेरिकेच्या युद्धनौकांवर हल्ले चढवल्यानंतर ट्रम्प घाबरले आहेत, अशा शब्दांत डिवचलेदेखील आहे. परंतु एकतर्फी विरामानंतरही दोन्ही बाजूंकडून बॉम्बफेक सुरू आहे. त्याचप्रमाणे क्षेपणास्त्रेही डागण्यात येत आहेत. जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होणार नाहीत, तोपर्यंत युद्धबंदी होणार नाही, असे इराणने ठणकावले आहे. अमेरिकेकडून इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याकरिता ४८ तासांचा अवधी देण्यात आला होता. परंतु अशा धमक्या देणार असाल, तर हा मार्ग पूर्णपणे बंद करू, असे इराणने सुनावल्यानंतरच अमेरिकेने युद्धबंदी जाहीर केली. या संघर्षामुळे जागतिक पुरवठा साखळी, अर्थव्यवस्था आणि जनजीवनावर प्रभाव पडत असून लवकरात लवकर तोडगा निघावा, अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे. संघर्षावर संवाद आणि मुत्सद्देगिरीतून मार्ग काढण्याच्या त्यांच्या आवाहनाची इस्रायल, अमेरिका व इराणने दखल घेतली पाहिजे. आखाती देशांमध्ये एक कोटी भारतीय असल्यामुळे त्यांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी भारत सरकार सर्व प्रकारचे प्रयत्न करत आहे. शिवाय दशकभरात भारताने ऊर्जा व इंधन आयातीचे स्रोत २७ वरून ४१ देशांपर्यंत वाढवले आहेत. मंगळवारी राज्यसभेत बोलताना, येणारा काळ हा देशाची सर्वात मोठी परीक्षा घेणारा आहे. युद्ध सुरू राहिल्यास त्यांचे गंभीर परिणाम होतील. म्हणूनच राज्यांचे सहकार्य आवश्यक असून, 'टीम इंडिया'प्रमाणे काम करावे लागेल, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. नेहमीचे कुरघोडीचे राजकारण बाजूला ठेवून, या संकटाच्या वेळी सर्व राजकीय पक्षांनी केंद्र सरकारच्या मागे उभे राहिले पाहिजे. आता युद्ध थांबवण्यासाठी मध्य पूर्वेतील तणाव कमी करण्याच्या दृष्टीने पाकिस्तानने पडद्यामागून हालचाली सुरू केल्या आहेत. 'दहशतवादी देश' म्हणून पाकिस्तान कुविख्यात असून जगात आणि विशेषतः मध्य पूर्वेतही त्यास फारसे मित्र उरलेले नाहीत. जो देश स्वतःच खाईत आहे, त्याने युद्धात मध्यस्थी करण्याची तयारी दाखवणे हे अत्यंत हास्यास्पद आहे. ट्रम्प यांच्याप्रमाणेच शरीफ आणि मुनीर हे जगाच्या चेष्टेचा विषय बनले आहेत.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### मर्यादा पुरुषोत्तम



राम राजा होता
तोच पुरोषोत्तम
असे हवे आता
नेते तसेच उत्तम

रामराज्य ही कल्पना
प्रत्यक्षात ती येईल
जन सर्वसामान्यांना
सुखी करून जाईल

विश्वगुरू म्हणवणारे
टेकत आहेत गुडघे
गॅस, इंधन, तेल सारे
नाहीसे झालेत अवघे

## ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

गरजेपुरता
मैत्री नको आहे ।
मैत्री नको आहे
स्वार्थासाठी ।।

मैत्री निरागस
बाळासम आहे ।
पाण्यासम आहे
नितळ हो ।।

लोखंडाचे नाते
सोण्यासम होते ।
मैत्री सदा होते
परीस हो ।।

ज्या कुणाला नाही
मित्र हया जगती ।
फकीर जगती
ना त्या सम ।।

श्रीमंती नसली
तरीही चालेल ।
मैत्रीत जगेल
समाधानी ।।

# सर्वोच्च न्यायालयाचा न्याय्य व अभिनंदनीय निर्णय...!



विचारमंथन

डॉ. एम. आर. इंगळे
मो. 9423429060



नुकताच सर्वोच्च न्यायालयाने देशातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांच्या संदर्भात एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतल्याची बातमी वाचून खूप बरं वाटलं. कारण न्यायालयांच्या ''तारीख पे तारीख'' धोरणामुळे त्यांनी दिलेल्या निर्णयात न्याय असतोच असे म्हणता येत नाही, कारण न्यायासाठी विलंब म्हणजे न्याय नाकारणे होय.

**न्यायालयांबाबत प्रचलित मत:**

समाजात न्यायालयांबाबत शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये, असे मत प्रचलित झाले आहे. कारण जेव्हा फिर्यादी पक्ष न्याय मिळविण्यासाठी न्यायालयात खटला दाखल करतो तेव्हा तो खटला वर्षानुवर्षे चालतो, त्यासाठी फिर्यादी पक्षाला न्यायालयात सतत खेटे घालावे लागतात. कधी विरोधी पक्ष किंवा त्यांचा वकील किंवा न्यायाधीश हजर नसतात त्यामुळे तारीख पे तारीख दिली जाते. या कोर्टाच्या सततच्या तारखांमुळे वकिलाची वाढती फी, येण्याजाण्याचा खर्च इत्यादीमुळे आर्थिक नुकसान तर होतेच पण फार मोठा मानसिक व शारीरिक तणाव येतो परिणामी लोकं हैराण होतात, त्यातही न्याय मिळण्याची किंवा केव्हा मिळेल याची शाश्वती नसते. त्यामुळे आपण कोर्टात न्यायासाठी आलो की स्वतःला त्रास करून घेण्यासाठी असा प्रश्न पक्षकारांना पडतो, त्यांना कोर्टाची पायरी चढण्याचा पश्चात्ताप तर होतोच पण न्यायव्यवस्थेच्या विश्वासार्हतेलाही तडा जात असतो. मात्र याबद्दल न्यायाधिशांना व वकिलांना काहीही खंत नसते पण पक्षकार मात्र भरडला जातो. त्यामुळेच ''शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये'' असे मत समाजात दृढ झाले, ही न्यायव्यवस्थेची फार मोठी शोकांतिका आहे.

**प्रलंबित खटल्याची कारणे :**

वर्ष २०२५-२६ च्या आकडेवारीनुसार भारतातील सर्वोच्च, उच्च आणि कनिष्ठ न्यायालयांमध्ये प्रलंबित खटल्यांची संख्या ५ कोटींहून अधिक म्हणजे सुमारे ५.४९ ते ५.५० कोटी झाली आहे. यापैकी कनिष्ठ न्यायालयांमध्ये सर्वाधिक, म्हणजेच ४.६ कोटींहून अधिक खटले प्रलंबित आहेत, तर ६० लाखांहून अधिक खटले उच्च न्यायालयांमध्ये आणि सर्वोच्च न्यायालयात ८६ हजारांहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. खटले प्रलंबित राहण्यासाठी न्यायाधीशांची कमतरता, पायाभूत सुविधांचा अभाव, गुंतागुंतीची कायदेशीर प्रक्रिया आणि खटल्यांची वाढती संख्या ही प्रमुख कारणे तर आहेतच परंतु वारंवार तारखा पडणे हे मुख्य कारण आहे.

**न्यायव्यवस्थेचे अपयश:**

न्यायालयीन प्रक्रिया क्लिष्ट, वेळखाऊ व अतिविलंबाची असल्यामुळे समाजात बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून वाद किंवा प्रकरण निकाली काढण्याचे प्रमाण वाढत आहे. तसेच वर्षोगणती चालणाऱ्या खटल्यांमुळे गुन्हेगारीवर वचक बसविण्यात न्यायालये अपयशी ठरत आहेत, परिणामी गुन्हेगारी वाढत आहे, ही वास्तवता नाकारता येत नाही. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने तारीख पे तारीखला आळा घालण्यासाठी आणि न्यायालयाची विश्वासार्हता कायम राखण्यासाठी घेतलेला निर्णय ऐतिहासिक असून यापुढे एका प्रकरणासाठी सातत्याने कोर्टाची पायरी चढावी लागणार नाही अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

**सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय:**

सर्वोच्च न्यायालयाने तारीख पे तारीख ला प्रतिबंध घालण्यासाठी नुकतेच एक परिपत्रक जाहीर केले असून एखाद्या प्रकरणाची सुनावणी टाळण्यासाठी किंवा पुढे ढकलण्याबाबतच्या नियमांमध्ये मोठे बदल केले आहेत. यामुळे नव्या किंवा नियमित प्रकरणांमध्ये सातत्याने तारखा घेण्याला आळा बसणार आहे. केवळ अपरिहार्य परिस्थितीतच सुनावणी टाळली जाऊ शकेल असे कडक नियम तयार करण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या परिपत्रकात म्हटले आहे की, २९ नोव्हेंबर २०२५ आणि २ डिसेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या नियमांऐवजी आता नवे नियम लागू होतील. त्यानुसार वेगवेगळ्या प्रकरणांसाठी वेगळे नियम निश्चित करण्यात आले आहेत. प्रामुख्याने नियमित प्रकरणांमध्ये नियम कडक करण्यात आले आहेत. कोर्टासमोर सुनावणीसाठी एखादे प्रकरण लिस्टेड असेल तर कोणत्याही अपरिहार्य कारणाशिवाय त्याची सुनावणी टाळता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. नव्या किंवा आफ्टर नोटीस प्रकरणांमधील सूटही कमी करण्यात आली आहे. एखाद्या पक्षकाराला सुनावणी पुढे ढकलायची असल्यास त्यासाठी दुसऱ्या पक्षाला त्याची आधीच माहिती द्यावी लागेल. त्याचा पुरावाही द्यावा लागणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया सुनावणीच्या एक दिवस आधी सकाळी ११ वाजण्यापूर्वी पूर्ण करावी लागेल, असे कोर्टाने स्पष्ट केले आहे. दुसऱ्या पक्षाला सुनावणी पुढे ढकलण्याच्या नोटिशीवर आक्षेप घेण्याची संधी मिळणार आहे. दुपारी १२ वाजेपर्यंत ईमेलद्वारे आक्षेप घेता येऊ शकतो. हा आक्षेप कोर्टासमोर मांडला जाईल. पुढची तारीख मागणाऱ्या पक्षकाराला त्याबाबचे ठोस कारण सांगावे लागणार आहे. यापूर्वी कितीवेळा पुढची तारीख घेण्यात आली, हेही सांगावे लागेल. त्यामुळे सुनावणी पुढे ढकलणे आता सहजासहजी शक्य होणार नाही. केवळ अपरिहार्य कारणास्तव पुढची तारीख मिळू शकते किंवा सुनावणी पुढे ढकलली जाऊ शकते. कुटुंबामध्ये एखाद्या व्यक्तीचा मृत्यू, गंभीर आजार किंवा इतर ठोस कारणे, जे कोर्टासमोर टिकू शकेल, अशा परिस्थितीतच पुढची तारीख दिली जाईल. नव्या प्रकरणांमध्ये सुरूवातीला केवळ एकदाच पुढच्या तारखेसाठी अर्ज देता येईल. सलग दोनदा सुनावणी पुढे ढकलता येणार नाही. या अर्जाचा नमूनाही तयार करण्यात आला असून हा अर्ज भरून ईमेलवर पाठवावा लागेल. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे तारीख पे तारीख ही कुप्रथा प्रतिबंधित बंद होईल व न्यायालयीन प्रक्रियेसाठी कालमर्यादा निश्चित केली जाईल व निर्णय लवकर दिले जातील. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय खरोखर ऐतिहासिक, न्याय्य व अभिनंदनीय आहे.

# अंधश्रद्धेच्या विळख्यात अडकलेला सुशिक्षित समाज

चर्चा

ज्योती चव्हाण (राठोड)
मो. ७५८८५९०९९८



**''ऐसे कैसे झाले भोंदू, कर्म करोनी म्हणती साधू**
**अंगी लावून या राख, डोळे झाकूनी करती पाप**
**दावूनी वैराग्यांची कळा, भोगी विषयांचा सोहळा**
**तुका म्हणे सांगो किती, जळो तयांची संगती...'**

संत तुकाराम महाराज यांनी शेकडो वर्षांपूर्वी उच्चारलेल्या या ओळी आजही तितक्याच ज्वलंत आणि वास्तव वाटतात. काळ बदलला, साधने बदलली, जीवनशैली बदलली; पण ''भोंदूगिरी'' आणि त्याला बळी पडणारी मानसिकता मात्र अजूनही बदललेली नाही, हीच आपल्या समाजाची सर्वात मोठी शोकांतिका आहे. नुकत्याच उघडकीस आलेल्या अशोक खरात या भोंदू ज्योतिषाच्या लाजिरवाण्या कारनाम्याने महाराष्ट्रासह संपूर्ण समाजमनाला हादरा दिला. या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, उच्चशिक्षित, सुस्थित आणि प्रतिष्ठित वर्गातील अनेकजण यामध्ये गुंतलेले असल्याचे समोर आले. हा प्रकार



एखाद्या व्यक्तीपुरता मर्यादित नसून, तो आपल्या समाजातील खोलवर रुजलेल्या अंधश्रद्धेचा आणि विवेकशून्यतेचा जिवंत पुरावा आहे. आपण २१व्या शतकात जगत आहोततंत्रज्ञान, विज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिकीकरणाच्या युगात. पण या साऱ्या प्रगतीच्या झगमगाटामागे एक कटू सत्य दडलेले आहेविचारशक्तीचा अभाव. शिक्षणाच्या जोरावर आपण पदव्या मिळवल्या, करिअर घडवले; पण विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची आणि तर्काने निर्णय घेण्याची क्षमता मात्र अनेकदा विकसित झाली नाही. म्हणूनच आज ''सुशिक्षित'' हा शब्द केवळ कागदावर मर्यादित राहतो आहे. अंधश्रद्धा ही केवळ अज्ञानातून जन्माला येते, अंधश्रद्धा ही ग्रामीण भागात जास्त आहे हा समज आज खोटा ठरत आहे. उलट, आज खऱ्या अर्थाने सुशिक्षित म्हणवणारा वर्गच अशा भोंदू बाबांच्या जाळ्यात अधिक प्रमाणात अडकताना दिसतो. यामागे एक महत्त्वाचा मानसशास्त्रीय पैलू आहेअसुरक्षितता. आधुनिक जीवनशैलीने माणसाला भौतिक सुखसोयी दिल्या, पण मानसिक स्थैर्य हिरावून घेतले. नोकरीतील अस्थिरता, नातेसंबंधातील ताण, आरोग्याच्या समस्या, स्पर्धेचा दबावया सगळ्यामुळे माणूस आतून कमकुवत होत चालला आहे. आणि अशा वेळी ''तुमच्या सगळ्या समस्या दूर होतील'' असे सांगणारा कोणी तरी भोंदू बाबा त्याला आशेचा किरण वाटतो. हे भोंदू बाबा लोकांच्या भीतीवर आणि अंधविश्वासावरच आपले साम्राज्य उभे करतात. ''तुमच्यावर वाईट शक्तीचा प्रभाव आहे'', ''तुमच्या कुंडलीत दोष आहे'', ''विशेष पूजा केल्याशिवाय संकट टळणार नाही'' अशा शब्दांनी ते लोकांना मानसिकदृष्ट्या गुलाम बनवतात. त्यानंतर सुरू होते आर्थिक लूट, मानसिक शोषण आणि काही वेळा शारीरिक शोषणसुद्धा. या संदर्भात आसाराम बापू आणि बाबा राम रहीम यांसारख्या तथाकथित भोंदू बाबांची उदाहरणे आपल्या समोर आहेत. ''साधू'', ''गुरू'' या पवित्र नावाखाली त्यांनी केवळ अंधश्रद्धेचा बाजार मांडला नाही, तर अनेक निरपराध स्त्रियांचे शोषण केले. न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्यांचा खरा चेहरा जगासमोर आला; तरीही समाजातील काही घटक आजही त्यांच्यावर विश्वास ठेवतात, ही वस्तुस्थिती अधिक भयावह आहे. हे चित्र केवळ काही व्यक्तींपुरते मर्यादित नाही. अशा भोंदूगिरीला पोषक वातावरण आपणच निर्माण करत आहोत. विशेष म्हणजे, या सगळ्यात सुशिक्षित वर्गाची भूमिका अधिक चिंताजनक आहे. कारण हा वर्ग समाजासाठी आदर्श ठरतो. जेव्हा डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, राजकारणी अशा क्षेत्रातील लोकच अंधश्रद्धेला खतपाणी घालतात, तेव्हा सामान्य माणूसही त्याच दिशेने वळतो. परिणामी, अंधश्रद्धेचा हा विषारी वेल अधिक वेगाने वाढतो. अंधश्रद्धा ही केवळ वैयक्तिक पातळीवरील समस्या नाही; ती सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्तरावर मोठे नुकसान करते. अनेक कुटुंबे आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त होतात, महिलांचे शोषण होते, मानसिक आरोग्य बिघडते आणि समाजात भीतीचे वातावरण निर्माण होते. यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन कमकुवत होतो आणि समाजाची प्रगती खुंटते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सारख्या संस्थांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. या संस्था लोकांमध्ये जागरूकता निर्माण करून अंधश्रद्धेविरुद्ध लढा देतात. मात्र, केवळ काही संस्था किंवा कायदे यावर अवलंबून राहून ही समस्या सुटणार नाही. यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाने स्वतः मध्ये बदल घडवणे आवश्यक आहे. शिक्षण व्यवस्थेचा येथे अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये केवळ पाठ्यपुस्तकांचे ज्ञान देण्यापेक्षा विद्यार्थ्यांमध्ये तर्कशक्ती, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. ''का?'' हा प्रश्न विचारण्याची सवय लावली, तर अंधश्रद्धेची मुळे आपोआप कमकुवत होतील. तितक्याच महत्त्वाची भूमिका माध्यमांची आहे. काही वेळा च्या नादात अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणारे कार्यक्रम दाखवले जातात, ज्यामुळे लोकांचा विश्वास अधिक दृढ होतो. याउलट, माध्यमांनी जबाबदारीने वागून सत्य मांडणे आणि समाजाला जागरूक करणे आवश्यक आहे. आजची खरी गरज आहे ती विचारप्रवर्तनाची. अंधश्रद्धेविरुद्ध लढा हा केवळ कायद्याचा किंवा मोहिमेचा विषय नसून, तो मानसिकतेचा प्रश्न आहे. जोपर्यंत माणूस स्वतः विचार करायला शिकत नाही, तोपर्यंत अशा भोंदूगिरीला आळा बसणार नाही. आपण प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा ''आपण खरोखरच सुशिक्षित आहोत का?'' जर शिक्षण असूनही आपण अंधविश्वासाच्या मागे धावत असू, तर त्या शिक्षणाचा उपयोग काय? खरी शिक्षणाची ओळख ही विवेक, तर्कशक्ती आणि मानवतावादी मूल्यांमध्ये असते. अशोक खरात, आसाराम बापू, बाबा राम रहीम यांसारखी प्रकरणे ही केवळ बातम्या नसून, ती समाजासाठी चेतावणीची घंटा आहेत. पण दुर्दैवाने, आपण काही दिवस चर्चा करतो, संताप व्यक्त करतो आणि पुन्हा त्याच जुन्या मानसिकतेत परत जातो. हीच साखळी तोडणे आज अत्यंत गरजेचे आहे. अंधश्रद्धा ही अंधारासारखी असतेती आपल्याला दिशाहीन करते. त्यातून बाहेर पडण्यासाठी ''विचार'' हा एकमेव प्रकाश आहे. म्हणूनच आज प्रत्येकाने ठामपणे ठरवायला हवेश्रद्धा ठेवू या, पण अंधश्रद्धेला दूर सारून. प्रश्न विचारू, तर्क करू आणि सत्याचा शोध घेऊ. कारण खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच, जो विज्ञान, विवेक आणि मानवतेच्या आधारावर उभा राहतो. **आता वेळ आली आहेभीतीतून नव्हे, तर विचारातून जगण्याची..**

# भोंदू बाबाची धिंडच काढली पाहिजे




मागोवा

अमोल भारसाकळे
अमरावती मो. ८४४६५७९१८२



''महाराष्ट्र ही संतांची भूमी असून आजच्या काळात सामाजिक स्वच्छता,अंधश्रद्धा निर्मूलन आणि शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी संत गाडगेबाबांच्या विचारांची अत्यंत गरज असल्याचे दिसून येते व आजच्या विज्ञान युगात अंधश्रद्धा निर्मूलन काळाची गरज ठरते हे चिंतनीय बाब आहे अंधश्रद्धा अगदी क्लास वन अधिकारी, मोठं मोठे शासकीय कर्मचारी, डॉ, वकील, इंजिनिअर पर्यंत जाऊन पोहोचली आहे. ''

नाशिक येथील सयंघोषित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात नावाचा एक ढोंगी, भोंदू बुवा अंधश्रद्धेचा बाजार भरवत होता जो स्वतः ला ज्योतिषी म्हणवत असे अंकशास्त्राच्या नावाखाली भविष्य सांगणाऱ्या अशोक खरात या भोंदू बाबाने महिलांना गुंगीचे औषध देऊन अत्याचार केल्याचा आणि त्यांचे अश्लील व्हिडिओ (जवळपास ५८ व्हिडिओ) तयार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे त्यामुळे महाराष्ट्रात मोठी खळबळ उडाली ज्याचे लाभार्थी सेलिब्रेटी,राजकीय नेते, क्लास वन अधिकारी व शिक्षित नोकरदार, माध्यम वर्गीय होते हे उपलब्ध असलेल्या फोटो मुळे सिद्ध झालंय त्यामुळे तो राजकीय पाठबळ असल्यामुळे श्रीमंता कडून पैसे व मधमवर्गीय महिलांचे शोषण करत असल्याचे बोलल्या जाते त्यामुळे ग्रामीण व शहरी दोन्हीही भागातिल समाजात वाढलेली बुवाबाजी खूप मोठी सामाजिक समस्या बनलेली आहे. मुळात अशा सुशिक्षित लोकांना याची गरजच का पडते हे संशोधनीय आहे.

या आधी आसाराम बापू होऊन गेले त्यांचे सुद्धा असेच किस्से समजापुढे निदर्शनास आले होते पूर्वीच्या काळी आशिक्षित व्यक्ती अंधश्रद्धेला बळी पडायचे व आजच्या विज्ञान युगात शिक्षित ही चिंतनीय व विचारणीय बाब आहे. म्हणून आज गाडगेबाबांच्या अंधश्रद्धा निर्मूलन या विचाराची गरज समाजाला आहे. सध्याच्या स्वार्थी जगात सामाजिक सुधारणेसाठी आज अंधश्रद्धा आणि देव-धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या कू प्रथांना विरोध करून त्यांनी जो वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला, ज्याची आज समाजाला खरी गरज आहे.कारण गाडगेबाबांचे अंधश्रद्धांबद्दलचे विचार म्हणजे देव माणसात: देव देवळात नसून तो दीन-दुबळे, अनाथ आणि अपंग माणसांत आहे, असे ते म्हणत. मानवी सेवेलाच ते खरी ईश्वरपूजा मानत परंतु कोणती मानवी पूजा हे समजून घेतले पाहिजे कॅप्टन खरात म्हणजे मानवी पूजा नाही ती बुवाबाजी झाली गाडगेबाबा म्हणायचे दिन - दुबळे, अंध, अनाथ, अपंग यांची सेवा करा.त्यांनी मूर्तिपूजेलाही विरोध केला होता दगडधोंड्यांची पूजा करून काहीही मिळणार नाही, त्यामुळे देवळात जाऊ नका आणि मूर्तिपूजा करू नका, अशी शिकवण त्यांनी दिली जी आजच्या काळात खरी वाटतात. कर्मकांडावर प्रहार त्यांनी जोरदार प्रहार केला मंत्र-तंत्र, चमत्कार, अंधश्रद्धा आणि देव-देवस्की यांसारख्या निरर्थक रुढींवर त्यांनी विश्वास ठेवू नका असे सांगितले पण आजचा समाज हा यात गुरफटलेला दिसून येत आहे. गाडगेबाबांनी आयुष्यभर समाजातील भोळ्याभाबड्या लोकांना अंधश्रद्धेच्या जाळ्यातून बाहेर काढून त्यांना स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग दाखवला होता व आज काही लोकं परत समाजाला त्या खाईत लोटण्याचा प्रयत्न करत आहेत हे रोखयचे असेल तर प्रत्येकाणे जागरूक राहून कॅप्टन खरात सारख्या भोंदू बाबाची धिंड काढली पाहिजे व समाज जागृती केली पाहिजे अन्यथा असे संधी साधू येतील व तुमचा सुखी संसार मोडून निघून जातील.


# कथात्म कथनाचा आविष्कार: द मिरर अँड द पोर्टेट्स

समीक्षण

संजय डोंगरे, वाडेगावकर
अकोला मो. ९४२०७०४५८०.



प्रा. विजयेंद्र सुरवाडे यांचे हे स्व कथनात्मक पुस्तक द मिरर अँड द पोर्टेट्स आहे. पण ते ततत्वज्ञानात्मक असल्याने निव्वळ स्वकथन नाही. आजवर वाचन परिसरात असे एकही पुस्तक आलेल नाही. म्हणूनही त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. समाजशील दृष्टिक्षेपात हा अनमोल ऐतिहासिक ठेवा सुरवाडेंनी ग्रंथीत केला आहे. सोपिनाथ महाराजांची मळसूर जत्रा, डिग्रस जत्रा, भंडारज, इंगळे, सुरवाडे, अकोला, चान्नी फाटा, पातूर,आमचे वाडेगाव, तांदळी, ही गावे प्रसंग होतात. गावे वाचत असताना गत काळातील स्मृतींचा आशय व्यापक होतो. लेखन शैली एक सहेतूक सोयरपण निर्मित करते. हे सोयरपण जपत नवे आणखी एक जे नाते लेखकाने उभारले आहे ते भुमिकार्द वास्तव घेऊन हे पुस्तक पुढे जात राहते. या पुस्तकाच्या रूपाने लेखकाची ओळख उशिरा झाली. असे बिलकुल नाही. ते जबाबदार रचनाकार आहेत. देवानंद पवार जे या पुस्तकाचे प्रकाशक आहेत त्यांनाही या पुस्तकाच्या निमित्ताने धन्यवाद दिले पाहिजेत. पुढे महाराष्ट्रातले आणि जगभरातले संदर्भ येतात. ते केवळ स्वकथनात्मक न राहता दस्तावेज ठरतात. स्वकथन हा वाङ्मय प्रकार जोखमीचा आहे. या बाबत प्रकाश मोगले सरांचे पुस्तक अभ्यासाला घ्यायला हवे. स्वकथन लिहू पाहणाऱ्या प्रत्येकाने ते वाचले पाहिजे. स्वकथनातून काय सांगायचं आहे ते लेखकीय न राहता तत्वचिंतनात्मक होण्यात खरे मर्म आहे. ते विजयेंद्र सुरवाडे नावाच्या प्रकाशाच्या वाक्याने ओळखले आहे. द मिरर अँड द पोर्टेट्स या स्वकथनाचा हेतू स्पष्ट केलेला वाचतांना डोळ्यातून आसवे आल्याशिवाय राहणार नाहीत. येथे अरविंद सुरवाडे यांनी केलेल्या अपेक्षेचे ''...मी कसा जगलो यापेक्षा माझ्या जगण्याची निश्चित दिशा काय आहे...'' मूर्त रूप लेखकाच्या लेखनातून आलेले प्रतीत होते. वेटिंग फॉर व्हिसा या ग्रंथात पारिया या जातीचा उल्लेख आहे. या जमातीवर सवर्णांनी घातलेल्या निर्बंधांच्या उदाहरणांसह उल्लेख आहे. यावरून इतरांचे दु:ख जर आपल्याला दिसत असेल तर आपलेही दु:ख विरळ होते. असा संदेश आपल्यापर्यंत येऊन पोहोचतो. त्याच संदेशानुरूप काही ठळक स्वकथनांचा उल्लेख करता येईल. दुर्योधन अहिरे यांचे एक स्वकथनात्मक पुस्तक आहे. आठवले तसे.. त्यात अहिरेंच्या जीवनातील विशेष प्रसंगांचाच फक्त उल्लेख केलेला आहे. त्या लक्षणीय प्रसंगांचे सविस्तर आणि कथनीय वर्णन केलेले आहे. भालचंद्र मुणगेकर यांच्या स्वकथनात केवळ दहावीपर्यंतच्या आयुष्याचाच उल्लेख आलेला आहे. अशी आणखीही अनेक पुस्तके आहेत ज्यातून





समदु:खाचा विचार रेखांकित केलेला दिसतो. या निरिक्षणीय लेखनातून ही पुस्तके केवळ एकट्याची राहत नाहीत. याच विचारधारेतून आलेले हे विजयेंद्र सुरवाडे यांचे द मिरर अँड द पोर्टेट्स पुस्तक आहे. अशा पुस्तकां मधून लेखकाला जे सांगायचे असते ते सांगण्यासाठी लेखकाने ज्या कथांचा उपयोग केलेला असतो त्या कथांची ती पुस्तके असतात. त्या कथा वाचकांना मानवी जीवनाची अनुभूती देत वाचन सुलभ ज्ञानोभुषीत सर्जनस्तर उपलब्ध करून देत असतात.आपल्या लेखन कौशल्याने ज्यातून वाङ्मयाभिरुची वाचकांच्या वाचनात निर्माण केलेली असते ही काही सहज साध्य बाब नाही. त्यासाठी अविरत प्रयासांतून आळस उपसलेला असतो. तो तेव्हा तो होतो. जेव्हा ज्ञानसुलभ प्रदेश दृश्यमान होतो तेव्हा त्यांना वाचकांकडून प्रशस्तीची थाप मिळते. विजयेंद्रंचे हे पुस्तक या परिप्रेक्ष्यात प्रशंसनीय आहे. सुप्रसिद्ध समिक्षक अनुवादक अरविंद सुरवाडे यांनी म्हटले की ''..खरं तर ही सगळी प्रकरणं म्हणजे एकेक स्वतंत्र कथाच आहेत. केवळ त्या लेखकाने आपल्या जगण्याचा एका सूत्रात गुंफल्यामुळे त्याला स्वकथन म्हणायचं, इतकंच! '' अशी या पुस्तकाची महनीयता वर्धीत केली आहे. विजयेंद्र, केवळ वाङ्मयधारी लेखक नाहीत. मानवतेच्या प्रस्थापनेसाठी कार्यरत असणारे सैनिक आहेत. त्यांची ऊर्जा त्यांना वितरीत करायची आहे. त्या मोबदल्यात त्यांना काहीही नको आहे. ज्या निरपेक्ष वृत्तीने लेखक जीवनाकडे पाहतो त्या दृश्य प्रदेशालाच निर्वाण भूमी म्हणतात. तिथे मानवामानवात पैसा,सत्ता,संपत्तीचे असभ्य भेद नाहीत.. लेखकाच्या निर्छटीय वाटचालीस माझ्या हार्दिक मंगलकामना..

द मिरर अँड द पोर्टेट्स
ले. विजयेंद्र सुरवाडे
बोधिपर्ण प्रकाशन, औरंगाबाद

# चालतेच हाये!



हिंद्यान
चंद्रशेखर अ. महाजन
मो. ९६२३२३८०९६




" झाली ना मांडोस. कधी जाता मंग नव्या घरात रायाले ? "

" काम रायलं ना रे भौ अजून बाकी."

" सिलॅप पळला. छपई झाली. म्हटलं भेटते आता जेव्याले आपल्याले. "

" जेव्याचं काय रे. पयले चाहाच घे. ये बस. ठेव बरं वं चाहा. हे पायनं. खिळक्या दरवाजे रायले ना बसोयाचे ."

" आता लोगूच बसोयाचे होते मंग. येवळा टाईम."

" कायच्या माथं बसोतं. नोट करे गोठ चिल्लर करे ईचार असं झालं सगळं मार्च येंडीगच्यानं घरकुलाचा शेवटचा टप्पा अटकला ना."

" मंग त्या दिनेसचा कसा काय निंगाला टप्पा ."

" तुले माहित नाई काय, उटाले शिळ्या लावनं बरोबर ज्यमते ना त्याले."

" तुमी करून पाव एखांद्या वाक्ती, काय होते ."

" पायात घुंगरं बांधुन सगळ्येईलेच नाचता आलं असतं तं मंग कायले असतं ."

" पन मले तं एक कारागीर दिसला पर्वा तुमच्या घरी ."

" त्या स्लाईडींगच्या खिळक्या बसोयाच्या हायेत ना ."

" काय म्हने मंग. देलं काय त्याले काम ."

" त्यानं माप नेलं काळून. पन मोठा घोर झाला ."

" आता काय झालं येवळं. ॲडवान्स पैसे मांगतले काय."

" नाई ना रे भौ. भावाचा मेळ नाई ज्यमला ना . " म्हनजे. काय झालं. मले नाई समजलं ."

" पंधरा दिवसात एकदम सवई दिळीनं भाव वाळोले गळ्या ."

" काय सांगता. येवळं कसकायं एकदम."

" या युद्धानं मोठा घोर केला लेका. पंधरा दिवसा आंधी त्याच्या दुकानवर गेलतो तं बराबर भाव सांगतले होते. काल घरी आला तं म्हने भाव वाळले. तेई लागे एकदम सवई दिळीनं."

" युद्धाच्यानं लयच घोर लावला हो आपल्या जीवाले ."

" तो म्हने आमाले मालच नाई भेटून रायला वरतून. आमीच काय कराव ? "

" भौ. वरते माल गील सगळं असते म्हनतात . पन् काही मोठ्या धंद्यावाले बराबर चानस पायतात, अन् सोताचं सरकं करून घेतात. जसं कोरोनात केलतं तसं. मंग सरकारी धाळ पळली की अटकतात बराबर . " पन् आपल्या खिश्याले तं तान बसते याईच्याच्यानं."

" भौ राजा , आपल्या सोयाबीनचे भाव तेवळेच रायतात. पन सोयाबीन तेलाचे भाव बराबर वाळतात. हे कसकाय हो..?"

" हाव ना गळ्या. काही काही दुकानात जा , त्याईनं भाव वाळ्याचं कारन पाठच करून ठेवेल असते. जो तो युध्दाच्या नावावर नीरा चानसच माऱ्याले पाह्यते . पन् आपल्या सारख्या गरीबाचं काय? "

" भौमाला मावसभाऊ सांगे युद्धाच्या नावनं आमच्या केळीचे भाव पळले म्हने. पन ईचार केला तं , पुऱ्या राज्यातं पाच दा टक्केच केळी विदेशात जाया जोगती निंगते. मग बाकीची केळी जर भारतातच खपते तं युद्धाचा नावानं भाव पाळ्याचा काय संबध ."

" आपल्या कास्तकाराच्या माथं याईचं उखय पाढरं होते , पन् आपल्या नशीबाच्या सातबाऱ्यावर पळेल भावाचा बोजा मातर कायम चळेलच रायते रे गळ्या ते पाय , आला चाहा घे. मंग पाहू बाकीचं चालतेच हाये ! "


# सम्राट अशोक : तलवारीतून धम्माकडे-मानवतेच्या इतिहासातील अद्वितीय प्रवास



प्रासंगिक
प्रविण बागडे
नागपूर, मो. 9923620919

भारतीय इतिहासात अनेक राजे झाले. काहींनी साम्राज्ये उभी केली, काहींनी युद्धे जिंकली, तर काहींनी संपत्ती आणि वैभवाची शिखरे गाठली. परंतु इतिहासात असे फार थोडे राजे आहेत ज्यांनी युद्ध जिंकूनही युद्धाचा त्याग केला आणि सत्ता असूनही मानवतेचा मार्ग स्वीकारला. अशाच अद्वितीय व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे अशोका, ज्यांना इतिहासात सम्राट अशोक महान म्हणून ओळखले जाते. सम्राट अशोक हे केवळ एक सामर्थ्यशाली राजा नव्हते, तर ते मानवतेचा संदेश देणारे, दयाभाव आणि करुणेचा मार्ग दाखवणारे एक अद्वितीय शासक होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या विचारांचा आणि त्यांच्या धम्मनीतीचा विचार करताना भारतीय समाजाला आजही नवी दिशा मिळू शकते.

अशोक हे बिंदुसार यांचे पुत्र आणि महान सम्राट चन्द्रगुप्त मौर्य यांचे नातू होते. मौर्य साम्राज्य आधीच विशाल होते, परंतु अशोक यांच्या काळात त्याने प्रचंड विस्तार केला. त्यांच्या सामर्थ्यवान लष्कराने भारतातील मोठा भूभाग जिंकला. त्यांच्या राजवटीच्या सुरुवातीला ते एक कठोर, निर्णायक आणि पराक्रमी योद्धा म्हणून ओळखले जात होते. सत्ता मजबूत करण्यासाठी त्यांनी अनेक युद्धे लढली. परंतु त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा टप्पा ठरला तो कालिंग युद्ध कलिंग, इतिहास बदलणारा क्षण. कलिंग (आजचे ओडिशा) जिंकण्यासाठी झालेल्या युद्धाने इतिहासाची दिशा बदलली. या युद्धात लाखो लोक मारले गेले, हजारो जखमी झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. रणांगणावर पडलेली प्रेते, विधवा झालेल्या स्त्रिया, अनाथ झालेली मुले या सगळ्या दृश्यांनी सम्राट अशोक यांचे मन हादरून गेले. इतिहासात सांगितले जाते की या युद्धानंतर त्यांनी रणांगणावर उभे राहून एक प्रश्न स्वतःला विचारला, ''या विजयाची किंमत इतकी भयानक का असावी?'' याच क्षणापासून त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा परिवर्तनाचा प्रवास सुरू झाला.



कलिंग युद्धानंतर अशोक यांनी हिंसेचा मार्ग सोडला आणि बुद्धिस्म स्वीकारले. त्यांनी धम्म हा जीवनाचा आणि राज्यकारभाराचा आधार बनवला. धम्म म्हणजे केवळ धार्मिक विचार नव्हता. तर तो होता दया, करुणा, अहिंसा, सहिष्णुता, सर्व धर्मांचा आदर. सम्राट अशोक यांनी युद्ध जिंकणाऱ्या राजापासून मानवतेचा संदेश देणाऱ्या राजामध्ये केलेले रूपांतर हे जगाच्या इतिहासात अद्वितीय मानले जाते. अशोक यांनी आपल्या राज्यात धम्मनीती राबवली. त्यांनी प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. रस्त्यांच्या कडेला झाडे लावणे, प्रवाशांसाठी धर्मशाळा उभारणे, विहिरी बांधणे, रुग्णालये उभारणे या सगळ्या गोष्टी त्या काळात अत्यंत प्रगत विचारांचे उदाहरण होते. त्यांनी प्राण्यांच्या हत्येवर मर्यादा आणल्या आणि पर्यावरणाबद्दल संवेदनशीलता दाखवली. त्यांच्या शिलालेखांमध्ये प्रजेबद्दलची काळजी आणि नैतिकतेचा संदेश स्पष्टपणे दिसतो.

सम्राट अशोक यांनी बुद्धिसम चा संदेश केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही. तर त्यांनी धम्मदूत विविध देशांत पाठवले. श्रीलंका, म्यानमार, थायलंड, नेपाळ, अफगाणिस्तान अशा अनेक देशांमध्ये बौद्ध विचारांचा प्रसार झाला. इतिहासात सांगितले जाते की त्यांचा पुत्र महिंदा आणि कन्या संघमित्ता यांनी श्रीलंकेत बौद्ध धर्माचा प्रसार केला. यामुळे भारताची सांस्कृतिक ओळख जगभर पोहोचली. अशोक यांनी आपल्या प्रशासनात नैतिकतेला विशेष महत्त्व दिले. त्यांनी धम्ममहामात्र नावाचे अधिकारी नेमले जे लोकांच्या कल्याणाची काळजी घेत होते. राज्यकारभाराचा उद्देश केवळ सत्ता टिकवणे नसून प्रजेचे सुख आणि कल्याण आहे, हा विचार त्यांनी प्रत्यक्षात आणला. आजच्या लोकशाही व्यवस्थेतही हा विचार अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज भारताने विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थकारणात मोठी प्रगती केली आहे. परंतु सामाजिक तणाव, हिंसा, असहिष्णुता आणि द्वेषाची भावना अनेक ठिकाणी दिसून येते. अशा वेळी सम्राट अशोक यांची धम्मनीती आपल्याला आठवण करून देते की, सत्ता मोठी असते, पण मानवता त्याहून मोठी असते. त्यांच्या जीवनातून आपल्याला एक महत्त्वाचा संदेश मिळतो. खरा विजय तलवारीने नाही, तर करुणेने मिळतो. आज भारताच्या राष्ट्रीय प्रतीकांमध्येही अशोक यांची छाप दिसते. भारतीय राष्ट्रचिन्हातील लॉयन कैपिटल ऑफ अशोका हे त्यांच्याच काळातील सारनाथ स्तंभाचे शिल्प आहे. तसेच भारतीय ध्वजावरील अशोक चक्र हे त्यांच्या धम्मचक्राचे प्रतीक आहे. याचा अर्थ असा की आधुनिक भारताच्या मूल्यांमध्येही सम्राट अशोक यांच्या विचारांची छाया आहे. आज जगभरात युद्धे, संघर्ष आणि राजकीय तणाव वाढताना दिसत आहेत. अशा काळात सम्राट अशोक यांचा इतिहास आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतो. हिंसेने सत्ता मिळू शकते, पण मन जिंकता येत नाही. मानवतेचा मार्ग स्वीकारणारा राजा खऱ्या अर्थाने महान ठरतो.

सम्राट अशोका यांचे जीवन म्हणजे शक्तीपासून शांतीकडे, युद्धापासून करुणेकडे आणि अहंकारापासून मानवतेकडे जाणाऱ्या प्रवासाची प्रेरणादायी कथा आहे. त्यांनी दाखवलेला धम्माचा मार्ग आजही मानवतेसाठी प्रकाशाचा दीप आहे. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ त्यांच्या साम्राज्याचे स्मरण करू नये, तर त्यांच्या विचारांचे स्मरण करावे. कारण खऱ्या अर्थाने महान राजा तोच असतो, जो तलवारीने नव्हे, तर मानवतेने जग जिंकतो. सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या महान विचारांना विनम्र अभिवादन!

# श्री पंचमुखी महादेव यात्रा महोत्सव २०२६



अध्यात्म
डॉ. प्रमोद चोपडे
देवरी (ह.मू. मुंबई)

अकोला जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेले देवरी येथील श्री पंचमुखी महादेव यात्रा महोत्सवला दिनांक २३ मार्च २०२६ पासून सुरुवात झाली आहे. अकोट अकोला रोडवरील देवरी फाट्यावरून एक किलोमीटर आत असेल देवरी नावाचं गाव सम्पूर्ण जिल्ह्यात देवाची देवरी म्हणून प्रसिद्ध आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे देवरी येथे असलेले अनेक देव देवतांची प्रशस्त मंदीर. भव्य श्रीकृष्ण मंदिर , जुने महादेव मंदिर, मुक्ताबाई मंदिर, विठ्ठल रुखमाई मंदिर, हनुमान मंदिर आणि गावाचे ग्राम दैवत असलेले भव्य दिव्य असे श्री पंचमुखी महादेव मंदिर असे अनेक मंदिर देवरी गावामध्ये आहेत. श्री पंचमुखी महादेव मंदिर हे देवरी पंचक्रोशी मध्ये जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे, या मंदिरातील महादेवाची काळ्या पाषाणातील पिंड आणी त्यावरील पंचमुखी महादेवाचे सुंदर सुबक लिंग साक्षात देवाधिदेव महादेव च जणू मंदिर गाभाऱ्यात असल्याचा भास करून देते. सुमारे २५० पेक्षा अनेक वर्षापूर्वी ह्या भव्य अश्या मंदिराची बांधणी झालेली आहे. मंदिराचे बांधकाम कुणी केले याची माहिती उपलब्ध नाही पण गावातील वयोवृध्द सांगतात की त्याच्या वडिलांच्या आधी पासून हे मंदिर देवरी येथे आहे. मंदिराची सुबक बांधणी अगदी जुनी असली तर आजही मंदिर अगदी सुस्थिती मध्ये आहे. मंदिर परिसरात प्राचीन रथ आहे ज्यात गावातून आधी महादेवाची मिरवणुक काढण्यात येत होती, बाजूलाच जूनि भूमिगत विहीर आहे (ज्याचा जीर्णोध्दार सध्या प्रगतीपथावर आहे) आणि नवीनच बांधण्यात आलेले भव्य असे सभागृह मंदिर परिसरात आहे. मंदिराच्या आजूबाजूला खूपवर्ष जूनी चिंचेची झाड आहेत. ह्याच परिसरात आपल्याला अनेक लहान लहान मंदिर आणि काही समाधी स्थळ पण पाहायला मिळतात, हे समाधी स्थळ नेमके कुणाचे आहेत ह्याबद्दल पूर्ण जरी माहिती नसले तरी गावातील वयोवृध्द सांगतात की या मंदिर परिसरामध्ये अनेक ऋषी मुनींनी तप केले आहे आणि त्यांच्या समाध्याच इथे आहेत. अश्या ह्या निसर्गरम्य वातावरणत चैत्र महिन्यामध्ये ही यात्रा वर्षानुवर्ष भरत आहे.

आठवडा भर चालणाऱ्या या यात्रेकची प्रतीक्षा पंचक्रोशीतील सर्वच जणांना असते. ही यात्रा महादेवाचे नवसाची यात्रा म्हणून सुद्धा प्रसिद्ध आहे. देवरी मधील सर्व सासुरवासिन मुली तर या यात्रेसाठो आवर्जून दरवर्षी माहेरी येतात. प्रत्येक घरी आपले सोयरे आणि नातेवाईक यांची रेलचेल असते. सर्व आबालवृद्ध , तरुण वर्ग , लहान मुलं सर्वच जण यात्रेचा भरपूर आनंद घेतात. आमचे बालपण देवरी मध्ये गेल्यामुळे ह्या यात्रेच्या निमित्ताने एक सुंदर फेरफटका डोळ्यासमोर आपसूकच येऊन जातो.

चैत्र शुद्ध अष्टमीला महादेवाचे लग्न लागते आणि यात्रेला सुरूवात होते. आठवडाभर चालणाऱ्या या यात्रेच्या प्रत्येक दिवशी महादेवाच्या पिंडीला अत्यंत मोहक पणे सजवले जाते आणि संपूर्ण भावभक्तीने महादेवाची आरती केली जाते. संपूर्ण परिसर हा या यात्रेदरम्यान शिवमय झालेला असतो.

यात्रेतील तीन महत्वाचे दिवस म्हणजे लोटांगण , बारास चे जेवण आणि शेवटच्या दिवशी काला ज्या दिवशी महाप्रसादाने यात्रेची सांगता होते !



लोटांगण ( मंदिर परिक्रमा)- या दिवशी संध्याकाळी वाजत गाजत सर्व महिला मंडळी ,लहाण मुलं आणि सर्व नागरिक आपल्या घरून महादेवाची पूजा करायला निघतात , आपआपल्या मोहल्यामधून सर्व जण वाजतगाजत मंदिरात पोहचतात आणि मंदिराला परिक्रमा घालतात. परिक्रमा घालताना लहान मुलं आणि मोठे नागरिक सुद्धा महादेवाच्या मंदिर समोर लोटांगण घेतात, गावकरी मुलाच्या अंगावर पाणी टाकून त्यांचा लोटांगणाचा आनंद द्विगुणित करतात. अश्याप्रकारे लोटांगण घालूंन आपल्या श्रद्धेप्रमाणे आणि नवस फेडून सर्व गावकरी महादेवाचे एकप्रकारे आभार च मानतात. श्री पंचमुखी महादेव संस्थान हे जागृत देवस्थान मान्यता प्राप्त असल्यामुळे अनेक जण महादेवाला नवस बोलतात त्याप्रमाणे एकादशीला मुलांना लोटांगण घालतात आणि दुसऱ्या दिवशी भंडाऱ्याचे आयोजन करतात. लोटांगण , मंदिर प्रदक्षिणा झाल्यानंतर सर्व गावकरी महादेवाचे दर्शन घेऊन घरी जाऊन एकादशीचे फराळ करतात. याच दिवशी सर्व भाविक आपापल्या परीने धन धान्य मंदिरात दान करतात ज्याचा उपयोग यात्रेच्या शेवटच्या दिवशी महाप्रसाद साठी केला जातो.बारस चे रोडगे - या दिवशी देवरी आणि पंचक्रोशीमध्ये आपल्याला धुरच धूर पाहायला मिळेल , कारण प्रत्येक घरी आणि मंदिराच्या आजूबाजूच्या परिसरात सर्व ठिकाणी रोडगे च्या भंडाऱ्याचे आयोजन केले असते. मंदिर परिसरामध्ये कित्येक दूरवरून आलेले भक्तगण इथे रोडगे च्या भंडाऱ्याचे आयोजन करून आपले नातेवाईकांना आमंत्रित करून सर्वांसोबत रुचकर जेवणाचा आनंद घेतात. गाई च्या शेणापासून बनवलेल्या गवऱ्याच्या जगरा बनवलेले गरम गरम रोडगे , वांग्याची भाजी ,मठ्ठा , मेथी आणि कोबीचा सलाड आणि शेवटी गुळामध्ये बनवलेला रोडग्याचा चुरमा असा सुंदर बेत प्रत्येक घरी आणि सर्व भंडारा आयोजनात असतो. यात्रेची सांगता - यात्रेच्या शेवटच्या दिवशी संपूर्ण गावातून भव्य ढोलाची मिरवणूक काढली जाते , संपूर्ण गावातील आणि पंचक्रोशीतील ढोलाचे भजनी पथक ,मंडळ या मध्ये समाविष्ट होतात. महादेवाची स्तुती आणि विविध प्रकारचे भजन गाऊन सर्व भजनी मंडळ पूर्ण परिसर शिवमय करतात . मिरवणूक मंदिर परिसरात पोचल्यानंतर मंदिर परिसरात दहीहंडी उत्सव पार पडतो. सर्व जण एकमेकाना प्रसाद वाटप करतात आणि काल्याचा आनंद घेतात. त्यानंतर मंदिर समितीतर्फे भव्य महाप्रसादाचे आयोजण केलेल असते , सर्व भाविक आणि पंचक्रोशीतील नागरिक महाप्रसादाचा आनंद घेतात. महाप्रसादाचे वाटप करण्यासाठी सर्व गावकरी आणि भाविक आपली सेवा देतात.यात्रेच्या दिवशी परिसरातील सर्व वाहन धारक आपली सेवा देतात. सर्व शिवभक्तांसाठी देवरी फाटा ते मंदिरापर्यंत जाण्याकरिता वाहन निःशुल्क उपलब्ध असतात.

**या वर्षीच्या कार्यक्रमाची रूपरेषा**

महादेवाचे लग्न मिती चैत्र शुद्ध अष्टमी गुरुवार २६ मार्च २०२६

लोटांगण ( मंदिर परिक्रमा ) मिती चैत्र शुद्ध एकादशी रविवार २९ मार्च २०२६

मुख्य यात्रा महोत्सव मिती चैत्र शुद्ध बारस सोमवार दि. ३० मार्च २०२६

मिती चैत्र शुद्ध १३ , दि ३१ मार्च २०२६ वार मंगळवार रोजी सकाळी ११ वाजता भव्य ढोलाची मिरवणूक आयोजित केली आहे, तरी पंचक्रोशीतील सर्व ढोल भांनी मंडळांनी यात सहभागी होऊन मिरवणुकीची शोभा वाढवावी असे आवाहन श्री पंचमुखी महादेव संस्थाहन यात्रा समिती तर्फे करण्यात आले आहे !!

यावर्षी विशेष म्हणजे यात्रेच्या दरम्यान २३ मार्च ते २९ मार्च रोजी दररोज दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत सुप्रसिद्ध कथावाचक वेदशास्त्रसंपन हभप श्री सुरेश महाराज जोशी यांचे सुमधुर वाणीतून श्रीमद भागवत ज्ञानकथा संपन्न होईल. तसेच मुख्य यात्रेच्या दिवशी म्हणजेच ३० मार्च रोजी रात्री ८ वाजता शेलू बाजार येथील भारुडसम्राट ह.भ. प. वादक श्री संतोष महाराज भालेराव,यांचे बहुरंगी भारूडाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सुद्धा मंदिर आयोजन समितीने केले आहे.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 347



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
अस्त
आदि
उणे
काका
काकू
कान
काम
गण
गस्त
घेरी
जम
जोर
टाच
तण
तोड
दही
धाम
नारी
पट
पत
पल
बाला
बोट
मत
मद
मेष
मोर
रत
रोम
वळ
वाम
सण
सुन
सोम
स्वस्त

**तीन अक्षरी**
आरोप
कपट
कमर
कातर
खडावा
घनता
चरण
जावक
डमरू
तरळ
नरम
पारवा
भेदक
माकड
मोहर
मांजर
रगड
लवण
वसंत
समान
सुमंत
संगम

**चार अक्षरी**
अवघड
उरविणे
एकटक
जपमाळ
जमविणे
जोडाक्षर
डावखोरा
बोलपट
बोळवण
मजकूर
मतभेद
मालवणे
मंदावणे
लक्षदीप
लाजवणे
वरधावा
संगणक
हटवादी
हस्तकला

**पाच अक्षरी**
अनुकरण
अवरोहण
एकलकोंडा
जकात नाका
नतमस्तक
परोपकार
मकरालय
वजनदार
वसंतोत्सव
सगा सोयरा

**सहा अक्षरी**
पदरात घेणे
महाराष्ट्र दिन
वानर किवण
सुगावा लागणे

**अन्य अक्षरी**
ताटाखालचे मांजर
कान उघडणी करणे

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



## महाशब्दकोडे 728



**—: आडवे संकेत :—**


1) दगडाचे काम करणारा, शिलावट
3) दीपावलीतील एक दिवस
6) चांगला वास, सुवास
9) सहज समजण्यासारखा
10) छाया, प्रतिबिंब
12) विवाह समारंभात वधूने नवरदेवाच्या गळ्यात घालण्याचा हार
14) रोजनिशी, दैनंदिनी (इं)
15) मुखरस, तोंडाला सुटणारे पाणी
16) मस्तक, डोके
18) खेळण्याची काचेची लहान गोटी
19) विचारात गर्क असताना होणरा हाताच्या बोटांचा होणारा चाळा
22) एक तंतूवाद्य
24) गाडीचे आच्छादन
25) इच्छा, आकांक्षा
26) धन्यवाद, उपकाराची जाणीव
28) ताजमहालाकरिता प्रसिद्ध शहर
29) अवाढव्य वस्तू बघून सहज तोंडातून निघणारे शब्द
30) अतिशय घट्ट, न सुटणारी मिठी
33) आड केलेले वस्त्र
34) फळ, फूल वगैरेचा दांडा
35) देवांना अमरत्व देणारे द्रव्य
36) एक सरपटणारा प्राणी
39) मुसलमानांचे प्रार्थना मंदिर
40) जन्मस्वभाव, अंगचा गुण, वर्ण
41) लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी चालविलेली राज्यपद्धती
42) एक धान्य, सातू
45) जप करण्याची अक्षरे
46) सढळ हाताने दान करणारा
47) रवा, साखरेचा एक गोड पदार्थ
49) एकदा खाल्लेले अन्न पुन्हा तोंडात आणून चघळीत बसणे
51) साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच्या वयात मनुष्याच्या बुद्धिला भ्रंश होण्याचा संभव असतो, या अर्थाचा एक वाक्प्रचार
54) रामायणात रावणाची पत्नी
56) केसांची गुंतागुंत
59) भ्रांती, गोंधळ
61) त्रासलेला, गांजलेला
62) हेळसांड, हयगय
64) भारताचा नागरिक
65) अंग मोडून येणे
66) एका महाराष्ट्रीयन खेळात बसलेल्या खेळाडूला उठविण्याचा शब्द
67) हेर, खंदक
68) दगड, खडक

**—: उभे संकेत :—**

1) महाभारतात पार्थ अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करणारा, श्रीकृष्ण
2) छाती
4) आश्चर्यकारक, अपूर्वाईची गोष्ट
5) दुधावर प्रक्रिया झाल्याने होणारा पदार्थ
6) पानदानातील एक जिन्नस
7) धारण करणारा, धरणारा
8) भूकंप, जमिनीला बसणारे हादरे
9) व्यवस्था, अनुकूलता
11) केवळ लीला म्हणून श्रीविष्णूने घेतलेला अवतार
13) लहान वस्त्र, कापडाचा तुकडा
14) एक भयंकर अक्राळविक्राळ स्त्री (इं)
17) पाठविणे, जाणे
20) ज्यावर्षी फेब्रुवारी मध्ये 29 दिवस असतात ते वर्ष
21) उर्दूत बुरखा
22) मंदिराच्यापुढे कथा कीर्तनासाठी उभारलेला मांडव
23) हाताच्या बोटात घालण्याची मुद्रिका
27) देवीच्या नावे मागितलेली भिक्षा
28) प्रलोभन, लालूच
29) सूर्योदय
31) गळ्यातील रत्न, अतिशय लाडका
32) अमृत प्राप्तीसाठी देव असुरांनी घुसळलेला समुद्र
33) ज्ञानेश्वरांनी देवाजवळ मागितलेले वरदान
35) शेळी, बकरी
37) रोग, व्याधी
38) साखरेपासून तयार होणारी एक मिठाई
41) निष्णांत, पटाईत
42) महाराष्ट्रीयन लोकांची भाषा
44) परीट, धोबी, रजक
47) तिटकारा, दुर्गंधीमुळे होणारी मळमळ
48) बुद्धिचा कस लावणारा एक खेळ
50) निमंत्रण, सादर बोलाविणे
52) अडथळा
53) खडकात सापडणारे एक पारदर्शक असे खनिज
55) मित्र, सखा
57) आठवण
58) मृत झालेला
60) एक वजनी माप
62) दाह, उष्णता
63) बंदुकीची दारू, मोठा आवाज
64) बोली, संवाद साधण्याचे साधन

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## थोडक्यात

### विशेष श्रम संस्कार निवासी शिबिर

**नागपूर :** राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत शासकीय आयटीआय नागपूर येथे आयोजित पाच दिवसीय विशेष श्रम संस्कार निवासी शिबिर पार पडले. शिबिरात एकूण 70 स्वयंसेवक सहभागी झाले होते. कार्यक्रमाला प्रादेशिक कार्यालय नागपूरचे उपसंचालक किरण मोटघरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेच्या उपसंचालिका श्वेता कुलकर्णी, किशोरी पंडिले, एनएसएस कार्यक्रम अधिकारी शिवाजी ढुमणे, प्रभाकर खंडाते, सुधाकर गावंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उद्घाटना प्रसंगी किरण मोटघरे यांनी विद्यार्थ्यांना समाजातील विविध समस्यांवर उपाय शोधण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात श्वेता कुलकर्णी यांनी शिबिराचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगितले. महात्मा गांधी यांच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी समाजाभिमुख कार्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. प्रास्ताविक शिवाजी ढुमणे यांनी, संचालन साहेबराव गुडधे यांनी केले. प्रभाकर खंडाते यांनी आभार मानले.

### राष्ट्रीय लोक अदालत ९ मे रोजी

**नागपूर :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने ९ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी आपले वाद मिटविण्याकरीता या लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर प्रवीण उन्हाळे यांनी केले आहे.

### खोट्या ई-चलन लिंकपासून सावध राहा

**नागपूर :** अलीकडील काळात ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी व ई-चलन सेवांशी संबंधित बनावट वेबसाइट्स, फसवे मोबाईल ॲप्स तसेच एसएमएस, व्हाट्स ॲपद्वारे पाठविल्या जाणाऱ्या खोट्या लिंकद्वारे नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असल्याचे निदर्शनास येत आहे. या प्रकारांमुळे वाहन चालक व मालकांची आर्थिक फसवणूक, वैयक्तिक माहितीची चोरी आणि ओळखीचा गैरवापर होत असल्याचे समोर आले आहे. सह परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या सूचनेनुसार नागरिकांनी केवळ अधिकृत शासकीय संकेतस्थळांचाच वापर करावा, असे आवाहन नागपूर ग्रामीणचे प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण यांनी केले आहे.

# राम जन्मोत्सव भव्य शोभायात्रा

## श्री पोद्दारेश्वर राम मंदिरात धार्मिक उत्साह, भाविकांनी शिस्त पाळून घेतला भक्तीसोहळ्याचा आस्वाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ : शहराचे आराध्य दैवत आणि ऐतिहासिक वारसा असलेल्या श्री पोद्दारेश्वर राम मंदिरात आज रामनवमीचा सोहळा अत्यंत भक्तिभावाने साजरा करण्यात आला १०० वर्षांपेक्षा अधिक परंपरा लाभलेल्या मंदिराच्या वतीने प्रसिद्ध शोभायात्रा काढण्यात आली नागपूरकरांच्या उपस्थितीने संपूर्ण शहर 'राममय' झाल्याचा अनुभव सर्वांनी घेतला.**





गुरुवारी पहाटे काकड आरतीपासूनच भाविकांनी मंदिरात रांगा लावल्या होत्या. मंदिरात पहाटे काकड आरतीने उत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर अभिषेक, पूजन व विशेष आरतीचे आयोजन करण्यात आले. दुपारी प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव सोहळा पार पडला. धार्मिक जयघोषात आणि फुलांच्या वर्षावात भाविकांनी रामलल्लाचे दर्शन घेतले. आकर्षक फुलांनी आणि रोषणाईने सजविलेल्या मंदिराच्या प्रांगणातून सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास ६० व्या भव्य शोभायात्राचा प्रारंभ करण्यात आला.

**प्रमुख आकर्षण**

यंदा ६० व्या वर्षपूर्तीनिमित्त राजस्थानातील विशेष कलाकारांनी सजवलेला प्रभू श्रीरामचंद्राचा रथ आणि अन्य राज्यातील सांस्कृतिक पथके यात सहभागी झाली 'किन्नर आखाडा' आणि विविध सामाजिक संघटनांचे चित्ररथ यंदा विशेष आकर्षण ठरले. सोबतच विविध पारंपरिक लोकनृत्य सादर झाले यात आदिवासी कोरकू चिटकोरा, छेज नृत्य, गरबा नृत्य, झंडा नृत्य सादर करण्यात आले याशिवाय स्केटिंग नृत्यही सादर होते तसेच, १०८ बालिकांचा समावेश असलेली मंगलकलश यात्राचाही समावेश होता.

**सर्व सुविधा**

रथ यात्रादरम्यान मंदिराच्या वतीने आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या मार्गात विविध ठिकाणी रुग्णवाहिका आणि मोफत आरोग्य सुविधांची सोय करण्यात आली. शेकडो रामसेवकांनी यावेळी स्वयंसेवकाची भूमिका पार पाडली भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता पोलिस प्रशासन आणि स्वयंसेवकांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला. दर्शनासाठी स्वतंत्र रांगा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच वैद्यकीय मदतीसाठीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या

### पारंपरिक मार्गाने मार्गक्रमण

**भव्य शोभायात्रा मेयो हॉस्पिटलजवळील मंदिरातून निघून हंसापुरी, इतवारी, बडकस चौक, महाल, गांधीगेट, सीताबर्डी, मानस चौक अशा पारंपरिक मार्गाने मार्गक्रमण केले. भाविकांच्या सुरक्षेसाठी मंदिर प्रशासन आणि नागपूर पोलिस प्रशासन सज्ज होते संपूर्ण मार्गावर ५०० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुमारे तीन हजार पोलिस कर्मचाऱ्यांचा ताफा तैनात होता.**

### मान्यवरांची उपस्थिती

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, माजी आमदार सुधाकर कोहळे, भाजपा शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी आदींनी दर्शन घेतले तसेच, रथयात्रा ओढण्यात सहभाग घेतला. दरम्यान, देशासह विदेशातील आणि शहरातील सर्व वयोगटातील भाविकांसाठी श्री पोद्दारेश्वर राम मंदिराच्या वतीने फेसबुक आणि यूट्यूब पेजवर 'लाईव्ह दर्शन'उपलब्ध करून देण्यात आले.**

**नयनरम्य रथ**

श्रीराम रथयात्रात विविध संघटना, संस्थांच्या वतीने रथ सहभागी झाले श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवन, दैनिक भास्कर, रोकडे ज्वेलर्स, सहयोग शारदा उत्सव मंडळ, श्री अन्नपूर्णा दुर्गामाता मंदिर, आपले श्रीराम गणेश मंडळ, श्री दुर्गा जस महिला मंडळ, श्रीसंत गजानन महाराज मंदिर पवननगर आदी रथाचा समावेश होता यंदाची ६० वी शोभायात्रा ही नागपूरच्या सांस्कृतिक वैभवाचा कळस असल्याचा अनुभव समस्त भाविकांनी घेतला रामनामाच्या जयघोषांनी परिसर दुमदुमून गेल्याने सर्वत्र भक्तीमय वातावरण निर्माण झाले. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, बालक अशा सर्व वयोगटातील भाविकांनी शिस्त पाळून या भक्तीसोहळ्याचा आस्वाद घेतला.

# विद्यार्थ्यांच्या आरोग्य व पोषणाबाबत कोणतीही तडजोड नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ :** मनपाच्या शिक्षण विशेष समितीच्या सभापती संतोषदेवी लढ्ढा यांनी अन्नामृत व बचत गट मिड-डे मील योजनेअंतर्गत कार्यरत संस्थांच्या अध्यक्षांसोबत बैठक घेतली. बैठकीत सभापतींनी विविध मुद्यावर सविस्तर व महत्त्वपूर्ण चर्चा करीत निर्देश दिले. याप्रसंगी उपशिक्षणाधिकारी सीमा खोब्रागडे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान विद्यार्थ्यांना वेळेवर, स्वच्छ, पौष्टिक व गुणवत्तापूर्ण अन्न उपलब्ध करून देण्याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. सर्व संबंधित संस्थांना स्पष्ट निर्देश देण्यात आले की अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता,



पोषणमानके व वितरण प्रक्रियेत कोणतीही निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत वेळेवर अन्न पोहोचावे व वितरण प्रक्रिया शिस्तबद्ध व सुयोग्य पद्धतीने पार पडावी, यावर विशेष भर देण्यात आला. या प्रसंगी उपशिक्षणाधिकारी सीमा खोब्रागडे यांनी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शन केले. शिक्षण सभापती संतोषदेवी लढ्ढा यांनी सर्व संस्थांना स्पष्टपणे निर्देश दिले की विद्यार्थ्यांच्या आरोग्य व पोषणाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. संतोष लढ्ढा यांनी पुढे असेही नमूद केले की आगामी काळात नियमित पाहणी व आढावा बैठकींद्वारे कामांची गुणवत्ता तपासली जाईल. सर्वांच्या उपस्थितीत ही बैठक अत्यंत सकारात्मक व परिणामकारक ठरली असून, मिड-डे मील योजनेच्या सुरळीत, पारदर्शक व प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक दिशा-निर्देश देण्यात आले.

# गरजेपेक्षा अधिक पेट्रोल व डिझेल खरेदी करू नका : जिल्हाधिकारी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ :** अधिक सुरक्षितता आणि अनावश्यक काळजी या दोन गोष्टींना डोळ्यासमोर ठेवून ग्राहक भीतीपोटी आवश्यकतेपेक्षा जास्त पेट्रोल आणि डिझेल खरेदी करीत आहेत. एरव्ही ज्यांना जेवढी गरज आहे तेवढेच इंधन घेण्याचा ग्राहकाचा कल होता. तो गेल्या दोन ते तीन दिवसात विस्कळीत झाला आहे.

जनतेने अधिक पॅनिक न होता अथवा गरजेपेक्षा अधिक पेट्रोल व डिझेलची खरेदी न केल्यास पुरवठ्याची ही साखळी पूर्ववत येईल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी व्यक्त केला. सद्यस्थितीत संपूर्ण नागपूर जिल्ह्यात 1 कोटी पाच लाख लिटर डिझेल उपलब्ध आहे. सुमारे 35 लाख लिटर पेट्रोल उपलब्ध आहे. हे प्रमाण नागपूर जिल्ह्याच्या नित्य गरजेपेक्षा अधिक आहे. साधारणतः जिल्ह्यात वाहनधारक दोन चाकी वाहनात दररोज लोक 50 ते 100 रुपयांपर्यंत पेट्रोल भरत होते. ते आता 500 ते 800 रुपयांचे पेट्रोल भरत आहेत. चारचाकी वाहनांच्या बाबतीतही एरव्हीची खरेदी 300 ते 600 रुपये प्रति ग्राहक होती. ती आता 2 ते 6 हजारांपर्यंत वाढली ही वस्तुस्थिती पेट्रोलपंप असोसिएशन तसेच इंधन कंपन्यांनी सादर केली. जिल्ह्यातील प्रत्येक व्यक्तीची गरज पूर्ण होईल एवढा साठा व पेट्रोल व डिझलेची उपलब्धता असल्याचे त्यांनी सांगितले. लोकांनी आपल्या रोजच्या गरजेपुरतेच पेट्रोल अथवा डिझेलची खरेदी करावी, असे आवाहनही पेट्रोलपंप डिलर्स असोसिएशनने केले.ग्रामीण भागातील काही पेट्रोलपंपांवर वाहनधारकांकडून वाहनांव्यतिरिक्त डब्बा, बॉटल अशा साधनांमध्ये इंधनाची मागणी करण्यात येत आहे.



कुठल्याही पेट्रोलपंपधारकांनी वाहनाव्यतिरिक्त पेट्रोल देऊ नये. नियमानुसारही ते देता येत नसल्याचे जिल्हाधिका-यांनी स्पष्ट सांगितल. कंपन्यांनी इंधनाचा अधिकाधिक पुरवठा करावा. डिलर्स असोसिएशनने यावेळी कंपन्यांकडून मागणीप्रमाणे अधिकाधिक पुरवठा करावा, अशी मागणी केली. पेट्रोलपंपधारकांच्या मागणीत वाढ झालेली आहे. त्यानुषंगाने पेट्रोल पुरवठा करणा-या कंपन्यांनीही अधिकचा पुरवठा करावा, त्या अनुषंगाने नियोजन करावे असे निर्देशही जिल्हाधिका-यांनी दिले.

### महिला बचत गटांना अनुदान

**नागपूर, दि. २६ :** गावातील नोंदणीकृत महिला शेतकरी गट यांचे मार्फत "गावस्तरावरील कृषि अवजारे बैंक" स्थापन करण्याकरीता "एक गाव एक कृषी औजारे बैंक" या तत्वानुसार, गावातील एमएसआरएलएम (उमेद) व माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ यांनी ५ एप्रिलपर्यंत महाडीबीटी पोर्टलवा ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभाग यांचे मार्फत करण्यात आले आहे. औजार बैंक स्थापन करण्यासाठी एका गावातून एकापेक्षा जास्त गटांचे अर्ज प्राप्त झाल्यास, अर्जाची निवड प्रक्रिया ऑनलाईन लॉटरी पद्धतीने करण्यात येईल, गावस्तरीय कृषी औजारे बँक या घटकासाठी प्रकल्पाच्या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज प्रकल्प गावातील महिला शेतकरी गटांनी ५ एप्रिल पूर्वी करावेत.

# राष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालयात आयोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ :** ताजाबाद शरीफ येथील हजरत बाबा ताजुद्दीन कला आणि वाणिज्य महाविद्यालयात आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिषद उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडली.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष यांनी परिषदेचे उद्घाटन केले. उच्च शिक्षण सह संचालक डॉक्टर संतोष चव्हाण शहादा एज्युकेटिव्ह सोसायटी नागपूरचे अध्यक्ष जन्नत अब्दुल सलीम अब्दुल जब्बार व इतर पदाधिकारी यांनी केले.देशभरातील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांच्या




उपस्थितीत ही परिषद ज्ञान, संशोधन आणि नवोन्मेष यांचा संगम ठरली. मानविकी, सामाजिक शास्त्रे, वाणिज्य, व्यवस्थापन आणि शुद्ध विज्ञान या विविध शाखांतील समकालीन विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. शाश्वत विकासासाठी नवोन्मेषी विचारसरणी विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला. विविध तज्ज्ञांनी आपले संशोधन सादर करतांना बदलत्या जागतिक परिस्थितीत शिक्षण आणि संशोधनाची भूमिका अधोरेखित केली. कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर अध्यक्षता म्हणून उपस्थित होत्या. समारोप सोहळ्यात उत्कृष्ट संशोधनपत्रांना गौरविण्यात आले. परिषदेमुळे विद्यार्थ्यांना नवीन संधी खुली झाली असून शैक्षणिक क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना सहभागींकडून व्यक्त करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ शकील अब्दुल सत्तार यांनी प्रास्ताविक भाषण केले त्यानंतर शोध निबंध जनरल पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. हजरत बाबा ताजुद्दीन महाविद्यालय आणि अशोक मोहरकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मारिया कला आणि विज्ञान महाविद्यालय तसेच उम्मे- सलमा कला आणि विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने परिषदेचे आयोजन करण्यात आले.

### CAPTION तिसऱ्या दिवशीही पंप बंद



**नागपूर:** उपराजधानीतील पेट्रोल-डिझेल पुरवठ्यासंदर्भातील स्थिती अद्यापही स्पष्ट झालेली नाही म्हणूनच सकाळपासूनच शहरातील पेट्रोल पंपांवर गर्दी होत आहे. मेडिकल चौकातील पंप आज तिसऱ्या दिवशीही बंद असल्याचे दिसून आले.

**जैवविविधता क्षेत्र विकास...** भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र वन विभागात सामंजस्य करार

# दहा हेक्टर क्षेत्रात होणार पक्षी उद्यान आणि पक्षी विहार क्षेत्र

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वरील 'जामठा क्लोव्हरलीफ इंटरचेंजचा लीफ-1' हा भाग नागरिकांचा विरंगुळा आणि जैवविविधता क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाने सामंजस्य करार केला आहे.**

हा सामंजस्य करार म्हणजे दोन्ही आस्थापनांनी पर्यावरण संवर्धन आणि हरित पायाभूत सुविधा विकासाच्या




दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

एका कार्यक्रमात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे मुख्य महाव्यवस्थापक (तांत्रिक) तथा प्रादेशिक अधिकारी राकेश प्रकाश सिंह आणि महाराष्ट्र राज्य नागपूरचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन दल प्रमुख) एम. श्रीनिवास राव यांनी करारावर स्वाक्षरी केली.

सदर प्रकल्पाअंतर्गत २०२६-२७ दरम्यान सुमारे १० हेक्टर जमीन पक्षी उद्यान आणि पक्षी विहार क्षेत्र म्हणून विकसित केले जाणार आहे. या परिसरात नागरिकांचा विरंगुळा आणि जैवविविधता क्षेत्र तयार करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे. यामुळे या परिसराचे पर्यावरणीय मूल्य वाढेल आणि पर्यटकांना निसगार्चा एक अनोखा अनुभव घेता येणार आहे. हा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ऑक्सिजन पार्क या उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग आहे. हा उपक्रम म्हणजे पायाभूत सुविधांच्या विकासात पर्यावरणीय संवर्धनाचा मेळ घालण्याच्या प्रगत दृष्टिकोनाचेच प्रतीक आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे 34 कोटी रुपये इतका खर्च येणार असल्याचे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कळवले आहे.

### मुख्य घटक

**प्रकल्पाअंतर्गत पर्यटकांना फिरता येईल असे मोठे पक्षी विहार (वॉक-थ्रू एव्हियरी) क्षेत्र असेल. येथे पोपट आणि उष्णकटिबंधीय पक्षांसाठी विशेष पिंजरे, जमिनीवर राहणाऱ्या पक्ष्यांसाठी संरक्षक कठडे आणि स्थानिक वनस्पतींचा आधारे तयार केलेली नैसर्गिक अधिवास व्यवस्थेचा अंतर्भाव असणार आहे. पक्ष्यांसाठी समर्पित रुग्णालय अथवा दवाखाने, नवीन आणलेल्या पक्ष्यांसाठी विलगीकरण क्षेत्र आणि पिलांच्या संगोपनासाठी विशेष रोपवाटिकेची सोय असेल.**

# तीन दिवसीय 'भारत फोटो फेअर 2026'

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २६ :** कॅव्होक सर्विसेसच्यावतीने 'भारत फोटो फेअर 2026' या भव्य प्रदर्शनचे 27, 28 व 29 मार्च 2026 दरम्यान नक्षत्रा बॅन्क्वेट, एम्प्रेस मॉल येथे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळा, स्पर्धा, फॅशन शो, मॉडेल शुट, पुरस्कार असे भरगच्च कार्यक्रम या तीन दिवसीय फेअरमध्ये सकाळी 11 ते संध्याकाळी 6 या वेळेत आयोजित करण्यात येणार आहेत, अशी माहिती कॅव्होकचे संचालक सुमीत जैन यांनी दिली. प्रदर्शनीत सोनी, फुजीफिल्म, निकॉन, डिजटिक, टॅमरॉन आदी 100+ आघाडीचे फोटोग्राफी ब्रँड्स सहभागी होत आहे. कॅमेरे, लेन्स, ॲक्सेसरीज, लाईट्स, स्टुडिओ सेटअप, अल्बम, प्रिंटर्स आदी एकाच छताखाली बघण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमात 3 कार्यशाळा, 2 टॉक शो, तसेच 15+ इंडस्ट्री मेंटर्स आणि 20+ इन्फ्लुएंसर्स सहभागी होणार आहेत.

27 मार्च रोजी दुपारी दुपारी 12 वाजता महापौर नीता ठाकरे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून विविध मान्यवर उपस्थित राहतील. दुपारी 4 वाजता 'फोटोग्राफी – राईट इक्विपमेंट – बिझनेस डेवलपमेंट अँड मोअर' विषयावर टॉक शो होणार असून, यात प्रसिद्ध फोटोग्राफर मानसी थक्कर, जयंत पेडनेकर, विनोद देशपांडे व संगीता महाजन सहभागी होतील.

महत्त्वाचे

## पंजाब किंग्जच्या ताफ्यात २ ऑस्ट्रेलियन 'फायटर'

**चंदीगड :** अवघ्या दोन दिवसांच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या आयपीएल स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर, पंजाब किंग्जचा संघ आता पूर्ण ताकदीनिशी सज्ज झाला आहे. ऑस्ट्रेलियाचे धडाकेबाज अष्टपैलू खेळाडू मार्कस स्टोइनिस आणि युवा तुफान कूपर कॉनोली बुधवारी मोहालीत दाखल झाले. न्यू चंदीगड येथील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर या दोन्ही खेळाडूंचे स्वागत करण्यात आले. गेल्या हंगामात विजेतेपदाच्या उंबरठ्यावरून परतलेल्या पंजाब किंग्जने यंदा कोणतीही कसर सोडलेली नाही. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील या संघाने गेल्या काही आठवड्यांपासून सराव सत्रात बरीच मेहनत घेतली आहे. ३१ मार्च रोजी पंजाबचा सामना घरच्या मैदानावर गुजरात जायंटस् विरुद्ध होणार आहे.यापूर्वी मागील आयपीएल फायनलमध्ये पंजाब किंग्जला आरसीबीविरुद्ध अवघ्या ६ धावांनी पराभव पत्करावा लागला होता.

## राजस्थान रॉयल्सचा विक्रम आरसीबीने मोडला

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमिअर लीगमधील राजस्थान रॉयल्स या टीमची विक्री करण्यात आली आहे. अमेरिकन उद्योजक कल सोमानी यांच्या संघानं राजस्थान रॉयल्सला १.६३ अब्ज अमेरिकन डॉलर्स म्हणजेच १५२८६ कोटी रुपयांना खरेदी केलं आहे. राजस्थान रॉयल्सनंतर, आता आरसीबीलाही नवीन मालक मिळाला आहे. आदित्य बिर्ला ग्रुपच्या नेतृत्वाखालील एका संघाने रॉयल चॅलेंजर्स बंगळूर संघ १.७८ अब्ज अमेरिकी डॉलरमध्ये विकत घेतला आहे. आदित्य बिर्ला ग्रुप, टाइम्स ऑफ इंडिया ग्रुप, बोल्ट व्हेंचर्स आणि ब्लॅकस्टोन इन्व्हेस्टमेंट कंपनी यांनी संयुक्तपणे आरसीबी फ्रँचायझी १६,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीत विकत घेतली आहे. त्यांनी युनायटेड स्पिरिट्स लिमिटेडकडून बंगळूर संघाची १०० टक्के मालकी मिळवली आहे.आदित्य बिर्ला ग्रुपचे संचालक आर्यमन विक्रम बिर्ला हे आरसीबी फ्रँचायझीचे अध्यक्ष असतील, तर टाइम्स ऑफ इंडिया ग्रुपचे सत्यन गजवानी उपाध्यक्ष असतील.

# टीम इंडियाचे मेगा शेड्युल जाहीर

### आगामी हंगामात वेस्ट इंडिज, श्रीलंका, झिम्बाब्वेसह ऑस्ट्रेलिया करणार भारत दौरा




**नवी दिल्ली: दि. २६ वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने गुरुवारी टीम इंडियाच्या २०२६-२७ च्या आंतरराष्ट्रीय घरगुती हंगामाचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले आहे. येणाऱ्या आगामी हंगामात वेस्ट इंडिज, श्रीलंका, झिम्बाब्वे आणि ऑस्ट्रेलिया हे चार संघ विविध स्वरूपातील मालिकांसाठी भारताचा दौरा करणार आहेत. यामुळे देशभरातील चाहत्यांना क्रिकेटचा थरार अनुभवण्याची संधी मिळणार आहे.२०२६-२७ च्या आंतरराष्ट्रीय घरगुती हंगामात १७ शहरांमध्ये एकूण २२ सामने खेळवले जाणार आहेत. भारताच्या घरगुती हंगामाची सुरुवात २७ सप्टेंबर २०२६ पासून वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेने होईल. या दौऱ्यात तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० (२०) सामन्यांचा समावेश आहे.

एकदिवसीय सामने तिरुवनंतपुरम, गुवाहाटी आणि न्यू चंदीगड येथे होतील, तर टी-२० सामने लखनौ, रांची, इंदूर, हैदराबाद आणि बेंगळुरू येथे खेळवले जातील.यानंतर डिसेंबर २०२६ मध्ये श्रीलंका संघ भारत दौऱ्यावर येईल. या मालिकेत तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामने खेळवले जातील. दिल्ली, बेंगळुरू आणि अहमदाबाद येथे एकदिवसीय सामने होतील, तर राजकोट, कटक आणि पुणे येथे टी-२० सामन्यांचे आयोजन करण्यात आले आहे.२०२७ च्या सुरुवातीला, जानेवारी महिन्यात झिम्बाब्वेचा संघ तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतात येईल. हे सामने कोलकाता, हैदराबाद आणि मुंबई येथे खेळवले जातील, जे नवीन वर्षातील आंतरराष्ट्रीय क्रिकेटची सुरुवात करतील.या हंगामाचा समारोप अत्यंत प्रतिष्ठेच्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीने होईल. ऑस्ट्रेलियाविरुद्धची ही पाच सामन्यांची कसोटी मालिका २१ जानेवारी २०२७ पासून नागपूर येथे सुरू होईल. त्यानंतर उर्वरित सामने चेन्नई, गुवाहाटी, रांची आणि अहमदाबाद येथे खेळवले जातील.

## दक्षिण आफ्रिकेने एकाच खेळाडूसमोर गुडघे टेकले, न्यूझीलंडचा ९२ धावांनी विजय

**नवी दिल्ली: दि. २६ वृत्तसंस्था**

न्यूझीलंड मेन्स क्रिकेट टीमला मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी २० मालिका गमवावी लागली. दक्षिण आफ्रिकेने पाचव्या आणि निर्णायक सामन्यात न्यूझीलंडवर ३३ धावांनी विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकेने या विजयासह ५ सामन्यांची मालिका ३-२ अशा फरकाने आपल्या नावावर केली. तर दुसऱ्या बाजूला न्यूझीलंडच्याच वुमन्स टीमसमोर संपूर्ण दक्षिण आफ्रिकेने गुडघे टेकले. न्यूझीलंडने कॅप्टन अमेलिया केर हीने केलेल्या शतकाच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेवर




पाचव्या आणि अंतिम टी २० सामन्यात एकतर्फी विजय मिळवला. न्यूझीलंड वुमन्स क्रिकेट टीमने अशाप्रकारे ही मालिका ४-१ अशा फरकाने नावावर केली. अमेलिया केर न्यूझीलंडच्या विजयाची नायिका ठरली.न्यूझीलंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका बुधवारी २५ मार्च रोजी आमनेसामने होते. दक्षिण आफ्रिकेने या पाचव्या सामन्यात टॉस जिंकून न्यूझीलंडला बॅटिंगसाठी भाग पाडलं. न्यूझीलंडने २० ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावून १९४ धावा केल्या. न्यूझीलंडला या धावसंख्येपर्यंत पोहचवण्यात अमेलियाने प्रमुख योगदान दिलं. अमेलियाने ५५ बॉलमध्ये १०५ रन्स केल्या. अमेलियाने या खेळीत १९ चौकार आणि १ षटकार लगावला.

# आयपीएल: नव्या सिझनमध्ये भारतीय कर्णधारांमध्ये भिडंत!



**नवी दिल्ली: दि. २६ वृत्तसंस्था**

**आयपीएल २०२६ लवकरच येत आहे. मागील हंगामाप्रमाणेच, यातही १० संघ सहभागी होत आहेत. ही स्पर्धा २८ मार्च रोजी सुरू होईल. पहिला सामना आरसीबी आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाईल. आयपीएलच्या १९ व्या हंगामात नऊ भारतीय कर्णधार सहभागी होत आहेत. पॅट कमिन्स हा या लीगमध्ये एकमेव परदेशी कर्णधार आहे. तर, पाहूया यापैकी कोणता कर्णधार विजेतेपद पटकावेल आणि कोणामध्ये सर्वाधिक क्षमता आहे.**

### रजत पाटीदार (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू)

आपल्या १८ व्या हंगामात पाटीदार यांना कर्णधार बनवण्यात आले: त्यांनी शांतपणे आपल्या सर्वोत्तम संघाचे नेतृत्व केले आणि अखेरीस, आपले पहिले विजेतेपद जिंकणे जवळजवळ निश्चित वाटू लागले. तेव्हापासून, त्यांनी सेंट्रल झोनला दुलीप ट्रॉफीचे विजेतेपद मिळवून दिले आणि सर्व फॉरमॅटमध्ये मध्य प्रदेशचे कर्णधार म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

### रुतुराज गायकवाड (चेन्नई सुपर किंग्स)

आयपीएल २०२४ च्या आधी एम.एस. धोनीने कर्णधारपदाची सूत्रे गायकवाडकडे सोपवली होती, तेव्हा गायकवाडने सीएसकेला पाचव्या स्थानावर पोहोचवले होते. गेल्या वर्षी, दुखापतीमुळे तो पाच सामन्यांनंतर संघाबाहेर गेला आणि सीएसके तळाशी राहिली. सॅमसनला संघात घेतल्यानंतरही कर्णधारपद कायम ठेवण्यासाठी सीएसकेने त्याला पाठिंबा दिला आहे.

### श्रेयस अय्यर (पंजाब किंग्स)

गेल्या वर्षीच्या दमदार स्पर्धेत त्याने पंजाब किंग्सचे नेतृत्व केले होते, ज्याचे उत्तम उदाहरण म्हणजे क्वालिफायर २ मध्ये पंजाब किंग्सने २०४ धावांचे लक्ष्य गाठताना ४१ चेंडूंमध्ये केलेली त्याची नाबाद ८७ धावांची खेळी. अंतिम सामना ते हरले आणि त्यानंतर ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियात अय्यरला प्लीहेची दुखापत झाली. आता तो पुन्हा पंजाब किंग्सचे नेतृत्व करताना दिसणार आहे.

### हार्दिक पांड्या (मुंबई इंडियन्स)

गेल्या वर्षी मुंबई इंडियन्सला प्लेऑफमध्ये नेल्यानंतर, २०२० नंतर पहिल्यांदाच त्यांना अंतिम फेरीत पोहोचवण्याचे त्याचे ध्येय असेल. पण मोठे प्रश्न अजूनही कायम आहेत: तो नवीन चेंडू हातात घेईल का, आणि तो अँकरची भूमिका बजावेल की पुन्हा आपल्या फिनिशिंगच्या भूमिकेत परत येईल?

### शुभमन गिल (गुजरात टायटन्स)

आयपीएलमध्ये आपल्या ओळखीच्या मैदानावर परतलेल्या गिलसाठी अहमदाबादमधील सपाट खेळपट्ट्या त्याच्या फलंदाजीसाठी आदर्श असतील, पण जेव्हा संघाला त्याची गरज असेल तेव्हा तो परिस्थितीशी जुळवून घेऊ शकतो हे त्याला दाखवून द्यायचे असेल.

### अक्षर पटेल (दिल्ली कॅपिटल्स)

गेल्या वर्षी अक्षरने खेळलेला सर्व टी क्रिकेट भारतासाठी होता, पण कर्णधार म्हणून त्याच्या पहिल्याच हंगामात डीसी संघ प्लेऑफच्या किती जवळ पोहोचला होता हे त्याला आठवत असेल: सुरुवातीला चार विजय, त्यानंतर शेवटच्या सहा सामन्यांमध्ये फक्त एक विजय.

### ईशान किशन (सनरायझर्स हैदराबाद)

सुरुवातीच्या काही सामन्यांसाठी पॅट कमिन्सचा कर्णधार म्हणून इशान किशनची नियुक्ती करण्यात आली आहे. तो संघाचा तात्पुरता कर्णधार असून, त्यामुळे लीगमध्ये भारतीय कर्णधारांची एकूण संख्या नऊ झाली आहे. पॅट कमिन्स हा एकमेव परदेशी कर्णधार आहे. एसआरएचचा नियमित कर्णधार पॅट कमिन्स सुरुवातीचे काही सामने खेळू शकत नसल्याने, किशनला आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोचण्याची संधी मिळाली आहे.

### ऋषभ पंत (लखनौ सुपर जायंट्स)

पंतसाठी गेल्या वर्षीचा आयपीएल हंगाम खराब गेला, त्याने १४ डावांमध्ये केवळ २६९ धावा केल्या त्यापैकी बहुतेक धावा लीग टप्प्याच्या शेवटी केलेल्या शानदार नाबाद ११८ धावांमध्ये होत्या. आता तो नव्या सिझनसाठी सज्ज झाला आहे.

### अजिंक्य रहाणे (कोलकाता नाईट रायडर्स)

आयपीएलमध्ये रहाणेसाठी ही शेवटची संधी असू शकते. गेल्या हंगामात केकेआरला १४ सामन्यांमध्ये फक्त पाच विजय मिळवता आले होते आणि वयाच्या ३७ व्या वर्षी वेळ त्याच्या बाजूने नाही. तरीही, सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमधील त्याच्या यशस्वी कामगिरीमुळे१६१.५७ च्या स्ट्राइक रेटने ३९१ धावात्याला आणखी एक संधी मिळाली आहे. नव्या रहाणेसाठी इराद्याची समस्या राहिलेली नाही; गेल्या आयपीएलमधील त्याच्या ३९० धावा १४७.७२ च्या स्ट्राइक रेटने आल्या होत्या.

### रियान पराग (राजस्थान रॉयल्स)

पराग हा राजस्थान रॉयल्ससाठी खूप काळापासून एक प्रकल्प राहिला आहे, जो एका प्रतिभावान खेळाडूपासून एका नव्या युगाचा चेहरा बनला आहे. गेल्या हंगामात संजू सॅमसनच्या अनुपस्थितीत त्याला कर्णधार म्हणून आजमावण्यात आले होते आणि आता तो पूर्णवेळ कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारत आहे.

## घसरणीनंतर पुन्हा वधारले सोन्याचे भाव, चांदीही महागली!

**नवी दिल्ली:** भारतात २५ मार्च रोजी २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १४,२९० रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १३,०९९ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १०,७१८ रुपये आहे. भारतात २५ मार्च रोजी २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३०,९९० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,४२,९०० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,०७,१८० रुपये आहे. भारतात २५ मार्च रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम २३५.१० रुपये आणि प्रति किलोग्रॅम २,३५,१०० रुपये आहे.भारतात २४ मार्च रोजी २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १३,५६४ रुपये, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १२,४३४ रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅमचा दर १०,१७३ रुपये होता. भारतात २४ मार्च रोजी २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,२४,३४० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३५,६४० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,०१,७३० रुपये होता. भारतात २४ मार्च रोजी चांदीचा भाव प्रति ग्रॅम २२९.९० रुपये आणि प्रति किलोग्रॅम २,२९,९०० रुपये होता.मुंबई, पुणे आणि कोलकाता या शहरांमध्ये आज २२ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,३०,९९० रुपये, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,४२,९०० रुपये आणि १८ कॅरेट सोन्याच्या प्रति १० ग्रॅमचा दर १,०७,१८० रुपये आहे.

# हॉर्मुझनंतर बाब अल-मंदेब बंद करण्याचा दिला इशारा

### भारतासह इतर देशांना तेल टंचाईचा करावा लागेल सामना

**नवी दिल्ली: दि. २६ वृत्तसंस्था**

इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष सुरू झाल्यापासून, जागतिक चर्चेत 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' हा विषय चर्चेत राहील. कारण हा एक अत्यंत महत्त्वाचा जलमार्ग असून ज्यातून जगातील २० टक्के कच्च्या तेलाची आणि लाखो टन नैसर्गिक वायूची वाहतूक होते. भारताचाही ऊर्जेच्या गरजांचा मोठा भाग याच मार्गाद्वारे पूर्ण केला जातो; मात्र, इराणने सध्या या मार्गावर कडक नाकेबंदी लागू केली आहे. हॉर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे निर्माण झालेल्या परिणामांशी आशियाई आणि




आखाती देश आधीच झगडत असताना, इराण आता आणखी एका मार्गावर अडथळे निर्माण करण्याची तयारी करत आहे. ज्यामुळे अनेक देशांसमोर तेलाचे तीव्र संकट उभे राहू शकते.

हॉर्मुझनंतर इराणची नजर आता 'बाब अल-मंदेब' या सामुद्रधुनीवर खिळलेली आहे. जर अमेरिका आणि त्याचे मित्र देश त्यांच्यावर लष्करी हल्ले करणे सुरूच ठेवणार असतील किंवा आणखी दबाव टाकण्याचा प्रयत्न करत असतील, तर या मार्गाची नाकेबंदी करण्याचा अधिकार इराणकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. इराणवर कोणत्याही स्वरूपाचे अतिक्रमण किंवा हल्ला झाला, तर त्याला प्रत्युत्तर म्हणून हा इशारा देण्यात आला आहे.इराणच्या चे असे म्हणणे आहे की, 'बाब अल-मंदेब' सामुद्रधुनीसाठी मोठा धोका निर्माण करण्याची पूर्ण क्षमता इराणकडे आहे. ज्याप्रमाणे इराणने हॉर्मुझ सामुद्रधुनीवर अत्यंत कडक नियंत्रण आणि पाळत ठेवली आहे, त्याच पातळीचे नियंत्रण आणि पाळत ते 'बाब अल-मंदेब'वरही




ठेवू शकतात. हा मार्गही जागतिक बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात तेल आणि वायूचा पुरवठा करण्यासाठी एक अत्यंत महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतो. हॉर्मुझ बंद झाल्यामुळे जग आधीच संकटात सापडलेले असताना, जर 'बाब अल-मंदेब'वरही नाकेबंदी लादली गेली, तर अनेक देशांना तेल आणि वायूच्या पुरवठ्याची तीव्र टंचाई भेडसावेल.

'बाब अल-मंदेब' हा जलमार्ग 'तांबडा समुद्र' आणि 'एडनचे आखात' यांना 'अरबी समुद्रा'शी जोडतो. हे येमेन आणि 'हॉर्न ऑफ आफ्रिका' मधील दोन राष्ट्रे जिबूती आणि एरिट्रिया यांच्या दरम्यान वसलेले असून जगातील एकूण सागरी तेल आणि वायू व्यापारापैकी १२ टक्के व्यापार दरवर्षी पार पडतो. जर हा जलमार्ग देखील रोखला, तर त्याचा परिणाम जागतिक तेल आणि वायू पुरवठ्याच्या ३० टक्क्यांवर होईल. जर इराणने हा मार्ग बंद केला तर जहाजांना लांबचा प्रवास करावा लागेल. ज्याने केवळ प्रवासाचा कालावधीच वाढणार नाही, तर मालवाहतुकीच्या खर्चातही वाढ होईल.

## इथेनॉल उद्योगाला दरवर्षी ९० लाख टन तांदळाचा पुरवठा

**नवी दिल्ली: दि. २६ वृत्तसंस्था**

सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) अंतर्गत वितरित होणाऱ्या धान्यातील तुटलेल्या तांदळाचा वाटा २५ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकार मंत्रिमंडळासमोर ठेवण्याच्या तयारीत आहे. अन्न सचिव संजय चोप्रा यांनी मंगळवारी सांगितले की, त्यामुळे इथेनॉल उद्योगाला दरवर्षी अंदाजे ९० लाख टन तुटलेला तांदूळ उपलब्ध होईल. गेल्या तीन आठवड्यांत जागतिक कच्च्या तेलाच्या किमतीत जवळपास ४० टक्क्यांनी वाढ झाली असतानाच हा निर्णय घेण्यात आला आहे.



चोप्रा म्हणाले की, पेट्रोलमधील इथेनॉलचे मिश्रण २०१३ मधील १.५ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत आधीच वाढले आहे. यामुळे २०१४ पासून देशाच्या परकीय चलनात १.६३ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक बचत झाली आहे आणि कच्च्या तेलाची आयात २७७ लाख मेट्रिक टनांनी कमी झाली आहे. सरकार आता केवळ पुरवठा वाढवण्याऐवजी बाजारात अधिक इथेनॉल उपलब्ध करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. याअंतर्गत, २० टक्क्यांपेक्षा अधिक मिश्रणास परवानगी देणे, डिझेलमध्ये इथेनॉल मिसळणे आणि फ्लेक्स-फ्यूएल वाहनांना (पेट्रोल आणि इथेनॉलच्या मिश्रणावर चालणारी इंधने) प्रोत्साहन देणे यांसारख्या पर्यायांवर सक्रियपणे विचार केला जात आहे.लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे.

## युरोपियन युनियन आणि ऑस्ट्रेलियाचा ऐतिहासिक करार

**नवी दिल्ली: दि. २६ वृत्तसंस्था**

जागतिक अर्थव्यवस्था आणि धोरणात्मक समीकरणे नव्याने घडवण्याच्या क्षमतेची एक महत्त्वपूर्ण घडामोड म्हणून, ऑस्ट्रेलिया आणि युरोपियन युनियन यांनी मंगळवारी एका ऐतिहासिक व्यापार करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या कराराचा मुख्य उद्देश, 'महत्त्वपूर्ण खनिजे' आणि 'दुर्मिळ मृदा' यांच्या पुरवठ्यासाठी चीनवरील अवलंबित्व कमी करणे हा आहे. जवळपास आठ वर्षांच्या सखोल वाटाघाटी आणि विचारविमर्शानंतर हा करार अंतिम करण्यात आला. सध्या, महत्त्वपूर्ण खनिजांच्या जागतिक पुरवठा साखळ्यांवर



चीनचे वर्चस्व आहे आणि 'दुर्मिळ मृदा'च्या प्रक्रिया क्षमतेपैकी सुमारे ९० टक्के क्षमतेवर चीनचे नियंत्रण आहे. इलेक्ट्रिक कार, लिथियम-आयन बॅटरी, एलईडी टेलिव्हिजन आणि कॅमेरा लेन्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या निर्मितीसाठी ही खनिजे अत्यंत अपरिहार्य आहेत.ऑस्ट्रेलियाच्या संसदेला संबोधित करताना, युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन यांनी स्पष्ट केले की, ''आपण कोणत्याही एकाच पुरवठादारावर अति-अवलंबून राहू शकत नाही.'' त्यांनी यावर भर दिला की, चीनसोबत एक धोरणात्मक समतोल राखणे ही युरोप आणि ऑस्ट्रेलिया या दोघांसाठीही एक अत्यावश्यक बाब आहे; आणि ही भागीदारी त्यांच्या यशासाठी अत्यंत निर्णायक ठरेल.

या करारानुसार, ऑस्ट्रेलियातून युरोपियन युनियनला निर्यात केल्या जाणाऱ्या जवळपास सर्व महत्त्वपूर्ण खनिजांवरील आयात शुल्क () रद्द केले जाईल. एका पत्रकार परिषदेत बोलताना, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी नमूद केले की, या करारामुळे ऑस्ट्रेलियाला दरवर्षी सुमारे १० अब्ज ऑस्ट्रेलियन डॉलर्स (७ अब्ज अमेरिकन डॉलर्स) इतका आर्थिक लाभ मिळण्याची अपेक्षा आहे.



# जय श्रीरामच्या गजराने अवघी नगरी भक्तीत न्हाली!



अकोला: दिवंगत आमदार गोवर्धन शर्मा यांच्या संकल्पनेतून आणि विहिप-रामनवमी शोभायात्रा समितीच्या पुढाकाराने अकोल्यात ऐतिहासिक आणि विराट शोभायात्रा उत्साहात पार पडली. स्थानिक श्री राजराजेश्वर मंदिरापासून पालकमंत्री आकाश फुंडकर व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत या यात्रेचा प्रारंभ झाला. या शोभायात्रेत थोर पुरुषांच्या वेशातील अश्वारूढ बालके आणि भजनी दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या हजारो भाविकांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. राजराजेश्वर मंदिर ते गांधी चौक अशा मुख्य मार्गावरून निघालेल्या या यात्रेत जय श्रीरामच्या जयघोषाने संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते. विविध सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून ही यात्रा शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाली.























सर्व छायाचित्रे: संजय ताथूरकर, सजावट व मांडणी:अक्षय जायले

अजिंक्य भारत
# आपलं अकोला

अकोला, शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

## सुट्टीवर आलेल्या जवानावर मित्रांचाच जीवघेणा हल्ला

**अकोला :** शहरातील जुने शहर पोलीस ठाणे हद्दीत एक धक्कादायक घटना समोर आली असून, सुट्टीवर आलेल्या आर्मीतील जवानावर त्याच्याच मित्रांनी जीवघेणा हल्ला केल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिलीप दयाराम तेलगोटे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचा मुलगा, जो आर्मीमध्ये कार्यरत आहे, तो सुट्टीवर अकोल्यात आला होता. दरम्यान, काल रात्री तो आपल्या मित्रांसोबत बाहेर गेला असता, त्याच मित्रांनी त्याच्यावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, जखमी जवानावर उपचार सुरू असल्याची माहिती आहे. या प्रकरणी जुने शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# ‘जय श्रीराम’च्या जयघोषाने आसमंत दुमदुमला!

## भक्तिमय वातावरणात रामजन्मोत्सव साजरा; विलोभनीय देखाव्यांनी दुमदुमली नगरी

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २६ :** दिवंगत आमदार गोवर्धन शर्मा यांच्या संकल्पनेतून आणि विहिप-रामनवमी शोभायात्रा समितीच्या पुढाकाराने अकोला महानगरात रामनवमीनिमित्त अतिशय उत्साहात आणि भक्तीभावात विराट शोभायात्रा काढण्यात आली. स्थानिक श्री राजराजेश्वर मंदिरातून या शोभायात्रेचा प्रारंभ पालकमंत्री आकाश फुंडकर, आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, माजी आमदार बबनराव चौधरी, माजी महापौर मदन भरगड, विजय अग्रवाल, श्रीरंग पिंजरकर, नितीन ताकवाले, हरीश आलिमचंदानी, पवन महल्ले आणि विहिप-रामनवमी शोभायात्रा समितीचे स्थायी अध्यक्ष कृष्णा शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. राजेश्वर महाराज व रामललाच्या पूजन आणि आरतीने या सोहळ्याला सुरुवात झाली. यावेळी समिती अध्यक्ष अरुण शर्मा, विहिप महानगर अध्यक्ष राजू मंजुळकर, राहूल राठी, समितीचे मार्गदर्शक अशोक गुप्ता, वसंत बाछुका, माजी अध्यक्ष रामप्रकाश मिश्रा, शैलेश खरोटे, विलास अनासाने, ब्रिजमोहन चिंतलांगे, शैलेंद्र गणेश काळकर, प्रकाश घोगलिया, जयंतराव मसने, सुहासिनी धोत्रे, मंजुषा सावरकर, अर्चना शर्मा आणि पुष्पा वानखडे यांची उपस्थिती होती.

ही शोभायात्रा राजराजेश्वर मंदिरातून निघून जयहिंद चौक, सिटी कोतवाली, मोठे राम मंदिर, टिळक रोड, जुने कापड बाजार, गांधी चौक मार्गे मार्गक्रमण करत पुन्हा सिटी कोतवाली परिसरात सामूहिक आरतीने संपन्न झाली.

या यात्रेत बाल शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, जिजामाता, झाशीची राणी, कुश-लव, अहिल्याबाई होळकर आणि महाराणा प्रताप अशा थोर पुरुषांच्या वेशातील बालकांनी घोड्यावर स्वार होऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हजारो महिला आणि पुरुषांनी भजनी दिंड्यांमध्ये सहभागी होऊन जय श्रीरामचा जयघोष केला, ज्यामुळे संपूर्ण वातावरण राममय झाले होते. या संपूर्ण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मनीष बाछुका, नितीन जोशी, संदीप वाणी, बाळ बिडवई, मनोज खंडेलवाल, विजय तोष्णीवाल, विनीत बियाणी, नगरसेवक प्रशांत अवचार, संतोष डोंगरे, आणि जानकी वल्लभो मातृशक्तीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. जुन्या कापड बाजार परिसरात राम सेना परिवाराच्या वतीने भक्तांना टरबूज ज्यूसचे वाटप करून जल्लोषात स्वागत करण्यात आले.

### पालकमंत्र्यांनी घेतले प्रभू श्रीरामाचे दर्शन



श्रीरामनवमीनिमित्त अत्यंत उत्साही वातावरणात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी या शोभायात्रेत प्रत्यक्ष सहभागी होऊन मोठे श्रीराम मंदिरात प्रभू रामचंद्रांचे मनोभावे दर्शन व पूजन केले. या यात्रेची सुरुवात ग्रामदैवत श्री राजराजेश्वर मंदिर परिसरातून झाली. मिरवणुकीत विविध संघटनांचे चित्ररथ, ढोलताशा पथके आणि भजनी मंडळांसह हजारो भाविकांनी सहभाग नोंदवला.

### उत्सवाचा प्रारंभ आणि धार्मिक विधी

उत्सवाची सुरुवात सामाजिक समरसतेच्या भावनेने झाली. सकाळी मोठ्या राम मंदिरात विनोद खवेकर आणि संगीता खवेकर (पूजेचे मानकरी) यांच्या हस्ते पूजन. समिती आणि जानकी वल्लभो मातृशक्ती समितीच्या वतीने जुन्या शहरातील विठ्ठल मंदिरातही विधीवत पूजन पार पडले.

### सामाजिक व शैक्षणिक उपक्रम

विद्यार्थ्यांवर संस्कार व्हावेत या हेतूने राबवलेला अर्चना शर्मा व पुष्पा वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगर व जिल्हा परिषदेच्या ८ शाळांमधील १० हजार गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचा निर्णय घेण्यात आला. हे साहित्य लवकरच प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन वितरित केले जाणार आहे.

### शोभायात्रेतील मुख्य आकर्षणे

श्रीराम मंदिर हरिहर संस्थानची पालखी आणि विहिप समितीची श्रीराम-जानकी युगल पादूका. किन्नर समाजाची अर्धनारीनटेश्वर झाकी आणि वीर महाबली ग्रुपचा अयोध्या रामलला मंदिर देखावा. वाल्मिकी सेना मंडळाची महर्षी वाल्मिक कुटिया आणि हनुमान बस्तीचा श्रीराम दरबार. युवाशक्ती बाबा अमरनाथ मंडळाचा सामाजिक संदेश देणारा रथ. राणी सती धाम, खंडेलवाल समाज (संत सुंदरदास महाराज), अक्कलकोट मित्र परिवार (खाटू श्याम), भारत माता क्रांती आश्रम (भारत माता झाकी) आणि अण्णाभाऊ साठे नगरचा बाल शिवाजी देखावा.

### भक्तीचा जागर (भजनी मंडळे)

शोभायात्रेत विविध भजनी मंडळांच्या सहभागामुळे भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. साईनाथ भजन मंडळ, पंचमुखी हनुमान, नम्रता नवयुवक मंडळ. यासह ज्ञानेश्वरी, राधे राधे, श्री संत गजानन, जयदुर्गा, अन्नपूर्णा, विठ्ठल आणि आई रेणुका भजन मंडळांनी भजनांच्या सुरांनी आसमंत भारावून टाकला या महिला मंडळांचा सहभाग होता.

# तिसरीच्या विद्यार्थिनीला अमानवीय शिक्षा; शहरातील नामांकित शाळेतील प्रकार

## पोलिस आणि शिक्षण विभागाकडे तक्रार

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २६ :** शहरातील बिर्ला कॉलनी परिसरातील स्कूल ऑफ स्कॉलर्स या नामांकित इंग्रजी माध्यम शाळेत तिसरीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीला दिलेल्या कथित अमानवीय शिक्षेचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी विद्यार्थिनीचे वडील राहुल प्रकाश पाटील यांनी शाळेच्या संबंधित शिक्षिकेविरुद्ध कारवाईची मागणी रामदास पेठ पोलिसांसह जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कु. रक्षिता राहुल पाटील ही तिसरीत शिक्षण घेत असून दिनांक १७ मार्च २०२६ रोजी मराठी विषयाची वार्षिक परीक्षा सुरू होती. पेपर पूर्ण झाल्यानंतर तिने मागे बसलेल्या मैत्रिणीला ‘‘तुझा पेपर झाला का?’’ एवढाच साधा प्रश्न विचारला. मात्र, वर्गात उपस्थित असलेल्या क्रीडा (स्पोर्ट्स) शिक्षिकेने यावर संताप व्यक्त करत तिला एका पायावर उभे राहून दोन्ही कान पकडण्याची शिक्षा दिली. ही शिक्षा तब्बल २० ते ३० मिनिटे चालू ठेवण्यात आली. त्यामुळे विद्यार्थिनीच्या पायाला तीव्र वेदना सुरू झाल्या. वेदना होत असल्याचे सांगूनही शिक्षिकेने कठोर शब्दांत तिला झापल्याचा आरोप करण्यात आला आहे. एवढ्यावरच न थांबता, तिचा पेपर शेवटी जमा करून घेत सर्व विद्यार्थ्यांनंतरच वर्गाबाहेर जाऊ दिले. दरम्यान, विद्यार्थिनीची आई तिला घ्यायला शाळेत पोहोचली असता रक्षिता व्यवस्थित चालू शकत नव्हती. ती पाय घासत चालत असल्याचे व रडत असल्याचे दिसून आले. यावेळी शाळेतील वरिष्ठ शिक्षिका यांनी ‘‘शिक्षेला सकारात्मक घ्या, इतर विद्यार्थ्यांना धडा मिळतो’’ असे म्हणत पालकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे.

यानंतर शाळेतील डॉक्टरांनी प्राथमिक उपचार म्हणून मलम लावून दिले. मात्र, विद्यार्थिनीच्या पायातील वेदना वाढत गेल्याने तिला खासगी डॉक्टरांकडे नेण्यात आले. पुढे अस्थिरोग तज्ज्ञांकडे तपासणी केली असता, ‘‘एका पायावर दीर्घकाळ उभे राहिल्यामुळे पायावर ताण येऊन सूज व वेदना निर्माण झाली’’ असे निदान करण्यात आले.

विशेष म्हणजे, विद्यार्थिनीला आधीपासून व्हायरल इन्फेक्शन असल्याची माहितीही वर्ग शिक्षिकेला होती, असे पालकांनी सांगितले.

२४ मार्च रोजी पालकांनी शाळेच्या प्राचार्या डॉ. श्वेता दीक्षित यांची भेट घेतली असता, त्यांनी विद्यार्थिनीशी फोनवर बोलताना ‘‘पेपरच्या वेळी बोलणे चूक आहे’’ असे सांगत उलट विद्यार्थिनीचीच चूक असल्याचे सूचित केले. त्यामुळे शिक्षिका व प्रशासन या दोघांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे पालकांमध्ये संतापाची लाट उसळली असून, संबंधित शिक्षिकेवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच लहान मुलांवर अशा प्रकारची शारीरिक व मानसिक शिक्षा देणाऱ्या शाळांवर नियंत्रण ठेवण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

❑ आमच्या शाळेत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची अमानवीय किंवा अनुचित शिक्षा दिली जात नाही आणि भविष्यातही दिली जाणार नाही. संबंधित प्रकरणाबाबत काही पालकांमध्ये गैरसमज निर्माण झाल्याचे दिसते. या संदर्भात विद्यार्थ्यांसमोर वस्तुस्थिती स्पष्ट करण्याबाबत पालकांशी चर्चा देखील करण्यात आली होती; तथापि त्यांचे पूर्ण समाधान झाले नसावे.

- **श्वेता दीक्षित,** मुख्याध्यापिका, स्कूल ऑफ स्कॉलर्स, बिर्ला गेट

❑ माझ्या मुलीसोबत शाळेत अमानवीय वागणूक झाल्याचा गंभीर प्रकार घडला आहे. या संदर्भात शाळा व्यवस्थापनाकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्याकडे कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. संबंधित घटनेची सत्यता पडताळण्यासाठी शाळेतील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात यावे, तसेच पोलिस आणि शिक्षण विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी करावी. माझ्या मुलीसोबत घडलेला प्रकार भविष्यात इतर कोणत्याही विद्यार्थ्यासोबत घडू नये, हीच आमची रास्त मागणी आहे.

-**राहुल पाटील,** पालक

## अकोला-मलकापूर बसमध्ये वृद्धाचा मृत्यू; प्रवासादरम्यान घडली धक्कादायक घटना

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २६ :** अकोला येथून मलकापूरकडे जाणाऱ्या राज्य परिवहन बसमध्ये एका वयोवृद्ध प्रवाशाचा अचानक मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली असून या घटनेमुळे प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोला येथील मुख्य बस स्थानकावरून मलकापूर डेपोची बस नेहमीप्रमाणे मलकापूरकडे रवाना झाली होती. याच बसमध्ये मंगरूळपीर तालुक्यातील चिंचोळा येथील रहिवासी एकनाथ तात्या पवार (वयोवृद्ध) हे प्रवासासाठी चढले होते. बस स्थानकातून बाहेर पडल्यानंतर काही अंतरावर जात असताना एकनाथ पवार हे अचानक त्यांच्या सीटवर कोसळले. ही घटना लक्षात येताच बस वाहकाने तत्काळ त्यांना उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र, कोणतीही हालचाल न झाल्यामुळे बसमधील इतर प्रवाशांमध्ये घबराट पसरली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून बस चालकाने बस थेट खदान पोलीस ठाण्यात नेली. पोलीसांनी प्राथमिक पाहणी करून तत्काळ संबंधित व्यक्तीस सर्वोपचार रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला. त्यानुसार बस पुन्हा रुग्णालयाकडे नेण्यात आली. मात्र, तेथे डॉक्टरांनी तपासणीअंती एकनाथ पवार यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे बसमधील प्रवासी तसेच स्थानक परिसरात मोठी खळबळ उडाली. अचानक झालेल्या या घटनेमुळे अनेक प्रवासी भयभीत झाले होते. प्राथमिक अंदाजानुसार हृदयविकाराच्या झटक्यामुळे त्यांचा मृत्यू झाला असावा, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. तथापि, अधिकृत कारण पोस्टमॉर्टेम अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

या संदर्भात बस वाहक व एका प्रवाशाने सांगितले की, ‘‘पवार हे बसमध्ये चढल्यानंतर काही वेळातच अचानक कोसळले. आम्ही त्यांना शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे तातडीने पोलिसांची मदत घेण्यात आली.’’

दरम्यान, पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरू असून घटनेचा अधिक तपास करण्यात येत आहे.

# अकोला-महान महामार्गाचा वनवास संपला

## २९८ कोटींच्या कामाची निविदा ५ एप्रिलला उघडणार

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २६ :** जिल्ह्याच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि गेल्या अनेक दिवसांपासून विविध तांत्रिक कारणांमुळे लालफितीत अडकलेला अकोला ते महान या मार्गाच्या कामाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या प्रकल्पासाठीची निविदा प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आली असून, येत्या ५ एप्रिल रोजी या कामाचे टेंडर उघडले जाणार आहे. सुमारे २९८ कोटी रुपयांचा प्रकल्प मार्गी लागणार आहे. आता या कामातील सर्व मुख्य तांत्रिक अडचणी दूर झाल्या असल्याने लोकप्रतिनिधींनी याकडे विशेष लक्ष देऊन हे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अकोला ते महान हा मार्ग जिल्ह्याच्या दक्षिण भागाला जोडणारा मुख्य दुवा आहे. मात्र, गेल्या काही काळापासून हा प्रकल्प रेल्वे विभाग, वनविभाग आणि रेल्वेच्या ट्रॅकिंग विभागाच्या अंतर्गत तांत्रिक परवानगीच्या पेचामुळे रखडला होता. रेल्वे पूल आणि वनविभागाच्या हद्दीतील जमीन संपादन तसेच पर्यावरण विषयक परवानग्या यामुळे या प्रकल्पाची गती मंदावली होती. हा तांत्रिक पेच सोडवण्यासाठी प्रशासकीय स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू होता. अखेर या सर्व विभागांमधील अडचणी आता दूर झाल्या आहे. या ३० किलोमीटर अंतराच्या रस्त्याच्या कामाचे नियोजन करण्यात आले आहे.

शहरालगतच्या सिंधी कॅम्प ते खडकी या अत्यंत वर्दळीच्या दरम्यान हा मार्ग चार पदरी करण्यात येणार आहे. यामुळे शहरातील वाहतूक कोंडीची समस्या कायमस्वरूपी सुटण्यास मदत होईल. तसेच खडकी ते महान या उर्वरित पट्ट्यात रस्त्याची रुंदी वाढवून तो तीन मीटरने अधिक रुंद केला जाणार आहे. निविदा उघडल्यानंतर त्याची प्रक्रिया पूर्ण करून अंतिम मान्यतेसाठी हा प्रस्ताव तत्काळ शासनाकडे पाठवण्यात येईल. शासनाकडून हिरवा कंदील मिळताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. अकोला ते महान हा रस्ता केवळ वाहतुकीसाठीच नाही, तर या भागातील व्यापार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठीही महत्त्वाचा आहे. या रस्त्यावरून दररोज हजारो वाहनांची ये-जा असते. मात्र, रस्त्याची दुरवस्था आणि रखडलेल्या कामामुळे वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता.

❑ या संदर्भात अधिक माहिती देताना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे उप कार्यकारी अभियंता वानखेडे यांनी स्पष्ट केले की, या प्रकल्पातील ९० टक्के तांत्रिक अडचणी आता पूर्णपणे दूर झाल्या असून, ५ तारखेला टेंडर उघडले जाईल आणि लवकरच प्रत्यक्ष रस्ते बांधणीला सुरुवात होईल.

- **वानखेडे,** उप कार्यकारी अभियंता, एनएचआय

महत्त्वाचे

## अकोल्यात सिंधी समाज बांधवांकडून रामभक्तांसाठी जलसेवा



**अकोला :** श्रीराम नवमी महोत्सवाच्या निमित्ताने अकोला शहरात निघालेल्या भव्य शोभायात्रेतील रामभक्तांसाठी सिंधी समाजातील व्यापाऱ्यांच्या वतीने जलसेवा (प्याऊ) उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक टिळक रोड परिसरात या उपक्रमाद्वारे हजारो भाविकांना थंड पाणी आणि पेय उपलब्ध करून देण्यात आले. या सेवाकार्याचा प्रारंभ सिंधी समाजाचे आराध्य दैवत श्री झुलेलाल साईं यांच्या मनोभावे पूजनाने करण्यात आला. समाजातील मान्यवरांच्या हस्ते आरती झाल्यानंतर ही जलसेवा भाविकांसाठी खुली करण्यात आली. भर उन्हात निघालेल्या या यात्रेतील भाविकांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला. याप्रसंगी समाजसेवक मनोहर पंजवानी, जितेंद्र कोटवानी, राजकुमार हेमनानी, अनिल राजपाल, महेश सचदेव, विनोद आडवाणी, मोहन नागवानी, रवी आनंदानी, गणेश राजपाल, जनकराज गुरुजी यांच्यासह सिंधी समाजातील व्यापारी आणि प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिंधी समाजाच्या वतीने दरवर्षी अशा प्रकारे सामाजिक आणि धार्मिक उपक्रम राबवून एकोप्याचा संदेश दिला जातो.

## श्रीराम नवमीनिमित्त महाआरती व योगसाधकांचा मेळावा

**अकोला :** प्रत्येकाच्या हृदयात आत्मारूपी राम निवास करतो. त्या अंतर्मनातील रामाला व्यक्त करणे, हीच खरी रामाची पूजा ठरेल, असे प्रतिपादन योगगुरू मनोहर इंगळे यांनी केले. श्रीराम नवमीनिमित्त शिवतेज प्रतिष्ठानद्वारे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मनोहर व अनुराधा इंगळे यांच्या हस्ते श्रीराम प्रतिमेचे पूजन व महाआरती करण्यात आली. इंगळे पुढे म्हणाले की, संसारातील अविश्वासामुळे निर्माण होणारे मानसिक दुःख शरीरात आजार वाढवत आहे; अशा स्थितीत आनंदी राहण्यासाठी आत्म्याला ओळखून व्यक्त होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड. वामन चौधरी, पुरुषोत्तम गुप्ता, वसंत रावणकर, अतुल पळसपगार, ओम येवूतकर, मुकेश खंडेलवाल, संजय मनतकार, लता वाघेला, प्रा. विद्या ठाकरे, सरला कागलीवाल, शालिनी राठोड यांनी परिश्रम घेतले. संचालन व आभार बाळासाहेब काळे यांनी मानले. शांती पाठाने सोहळ्याची सांगता झाली.

# अकोटच्या प्रभाग १ मध्ये पाण्यासाठी टाहो; महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अल्टिमेटम

## पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास १ एप्रिलपासून घागर मोर्चा व उपोषणाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २६ :** शहरातील प्रभाग क्र. १ मधील पाणीपुरवठ्याचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजीप्रा) विस्कळीत आणि भेदभावपूर्ण कारभाराविरोधात नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. ''येत्या सात दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करा, अन्यथा १ एप्रिलपासून कार्यालयावर घागर मोर्चा काढून आमरण उपोषण छेडू,'' असा थेट इशारा नगरसेविका रेश्मा परवीन मोहम्मद अजीम यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाला दिला आहे.



शहरातील इतर प्रभागांना दर तिसऱ्या दिवशी पुरेसा पाणीपुरवठा होत असताना, प्रभाग १ मध्ये मात्र केवळ सकाळी ६ ते दुपारी २ या मर्यादित वेळेतच पाणी दिले जाते. सिंधी कॅम्प, पोपटखेड रोड, हरी कॉलनी, शाहीन कॉलनी, बाबा रामदेव नगर, अमीनपुरा यांसारख्या विस्तीर्ण भागाला एवढ्या कमी वेळात पाणी पुरवणे अशक्य असल्याने गेल्या चार वर्षांपासून नागरिक पाण्यासाठी वणवण भटकत आहेत. विशेष म्हणजे, २०२४ मध्ये प्रशासनाने लेखी आश्वासन देऊनही परिस्थिती 'जैसे थे' असल्याने मजीप्राच्या आश्वासनांची पोलखोल झाली आहे.

> **या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी जिल्हाधिकारी, आमदार प्रकाश भारसाकळे आणि पोलीस प्रशासनालाही निवेदनाच्या प्रती सादर करण्यात आल्या आहेत. वारंवार तक्रारी करूनही अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने आता नागरिक रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. आंदोलनादरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीला प्रशासनच जबाबदार राहील, असा सज्जड इशाराही देण्यात आला आहे.**

## एसटी कष्टकरी जनसंघाच्या वतीने विभाग नियंत्रक स्मिता सुतवणे यांचा सत्कार



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** अकोला येथील एसटी महामंडळाच्या विभाग नियंत्रक कार्यालयात नवनियुक्त विभाग नियंत्रक स्मिता सुतवणे यांचा एसटी कष्टकरी जनसंघाच्या वतीने सोमवारी जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी एसटी बँकेचे संचालक अजित मगरे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला.

एसटी कष्टकरी जनसंघाच्या वतीने स्मिता सुतवणे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. सत्कार सोहळ्यानंतर संघटना आणि विभाग नियंत्रक यांच्यात विविध कर्मचारी प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. यामध्ये प्रामुख्याने कर्मचाऱ्यांना सलग सेवा लागू करण्याबाबत आग्रही मागणी करण्यात आली. या संदर्भात संघटनेच्या वतीने त्यांना सविस्तर निवेदनही सादर करण्यात आले. विभाग नियंत्रक सुतवणे यांनी कर्मचाऱ्यांच्या रास्त समस्या प्राधान्याने सोडविण्याचे आश्वासन यावेळी दिले. याप्रसंगी एसटी कष्टकरी जनसंघाचे पदाधिकारी सचिन हाताळकर, अमोल वैद्य, आशिष निकाळजे, शिवानंद तराळे, समाधान अंभोरे, देवेंद्र पवार, सुरेश सानप, देवेंद्र बिहाडे, सुधीर वाहोकार आणि विठ्ठल बोरसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## पोहरादेवीत भक्तीचा महासागर; लाखो भाविकांच्या उपस्थितीत रामनवमी सोहळा संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २६ :** बंजारा समाजाचे अढळ श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे गुरुवारी श्रीरामनवमी उत्सव लाखो भाविकांच्या उपस्थितीत अभूतपूर्व उत्साहात साजरा करण्यात आला. कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगणा, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश आणि दिल्लीसह देशभरातून आलेल्या भाविकांनी संत सेवालाल महाराजांच्या चरणी नतमस्तक होत भक्तीचा महासागर उसळवला. संत सेवालाल महाराज की जय आणि रामराव बापू महाराज की जय या जयघोषाने अवघा पोहरादेवी परिसर दणाणून गेला होता.



जगदंबादेवी मंदिर, संत सेवालाल महाराज मंदिर, तपस्वी संत डॉ. रामराव महाराज समाधी स्थळ, दानशूर संत बाबनलाल महाराज मंदिर आणि भक्तीधाम येथे जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा झाला. सकाळी ११ वाजता मुख्य मंदिरात भोग-भंडारा अर्पण करून आरदास (आरती) करण्यात आली. बापू आश्रमात बंजारा धर्मगुरू आमदार बाबूसिंग महाराज, जगदंबा माता मंदिरात कबिरदास महाराज, तर समाधीस्थळी मुख्य पुजारी देवीभक्त शेखर महाराज, भक्तराज महाराज, राहुल महाराज व संजय महाराज यांच्या हस्ते विधी पार पडले. बाबनलाल महाराज मंदिरात महंत सुनील महाराज व महंत अनिल महाराज, तर भक्तीधाम येथे महंत जितेंद्र महाराज यांनी आरती केली. या उत्सवात सामाजिक बांधिलकीचे दर्शनही घडले. बाबनलाल महाराज अन्नछत्राच्या वतीने महंत अनिल महाराज, देवेंद्र महाराज व जितेंद्र महाराज यांनी भाविकांना अन्नदान केले. वसंतनगर येथे विशाल प्रकाश राठोड व कंत्राटदार भिकासिंग चव्हाण यांनीही महाप्रसादाचे वाटप केले. भक्तीधाम येथे महंत जितेंद्र महाराज, किसन राठोड, ॲड. पंडित राठोड आणि प्रा. पी. टी. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या पाच दिवसांपासून भाविकांच्या निवास व भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती.

## लोहारा येथे बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना सोहळा उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २६ :** तालुक्यातील लोहारा येथे २५ मार्च रोजी विश्वशांती बुद्ध विहारात तथागत भगवान बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना व ऐतिहासिक धम्म सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पूज्य भिक्खू शान्तरक्षितजी महाथेरो (कोठळी) आणि भिक्खू करुणानंद थेरो (छत्रपती संभाजीनगर) यांच्या उपस्थितीत विधीवत पूजन व धम्म देशना पार पडली. सकाळी ७ वाजता भगवान बुद्धांच्या भव्य धम्म रॅलीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. ९ वाजता ध्वजारोहण व त्रिशरण-पंचशील ग्रहण केल्यानंतर १० वाजता मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी समता सैनिक दलाचे लेझीम पथक आणि आखाडा भांबेरी यांचे सादरीकरण विशेष लक्षवेधी ठरले. या सोहळ्याला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, महासचिव मिलिंद इंगळे, नगरसेवक संजय उमाळे, राजू मोरे, बुलढाणा जिल्हाध्यक्ष हिवराळे, बबलू सिरसाट, राहुल इंगळे, सुभाष तायडे, संजय बावणे, नारायण मोरे, मधुकर मोरे, दिलीप घ्यारे, तानाजी मोरे, सुनील मोरे यांच्यासह जिल्ह्यातील उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




उरळचे ठाणेदार पंकज कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार राजाभाऊ बचे, कवळकार मेजर, संतोष भोजने, शुभम बोडखे व ज्ञानेश्वर इंदोरे यांनी चोख बंदोबस्त ठेवला. सायंकाळी मनोजराजा गोसावी यांचा ही रात्र निळ्या पाखरांची हा गीतांचा कार्यक्रम पार पडला.

### मनमोहक रूप...



**बाभुळगाव जहागीर येथील श्रीराम मंदिरात रामनवमीनिमित्त सजलेला प्रभू श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण यांचा दरबार. आकर्षक फुलांची सजावट आणि अलंकारांनी मढलेल्या मूर्तींचे हे विलोभनीय रूप पाहताच भाविक नतमस्तक झाले.**

## शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालयात पदवीदान सोहळा उत्साहात

### आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे शिक्षण काळाची गरज– हेमंतभाऊ काळमेघ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २६ :** येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित व नॅकतर्फे अ मानांकन प्राप्त श्री शिवाजी अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, बाभुळगाव येथे पदवी वितरण सोहळा संपन्न झाला. संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंतभाऊ काळमेघ अध्यक्षस्थानी होते, तर बुलढाण्याचे प्राचार्य डॉ. नितीन चांगुले मुख्य अतिथी होते. यावेळी डॉ. पी. एस. वाटाणे, रामेश्वर वाकडे, डॉ. खांडेकर, प्रकाश गावंडे व संजय श्रावगी यांची विशेष उपस्थिती होती.




प्राचार्य डॉ. प्रशांत थोरात यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या प्रगतीचा गोषवारा मांडला. अध्यक्षीय भाषणात हेमंतभाऊ काळमेघ यांनी पदवी प्राप्त केल्यानंतर विद्यार्थ्यांनी कृत्रिम प्रज्ञा सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेऊन डॉ. पंजाबराव देशमुखांचा आदर्श समोर ठेवावा, असे प्रतिपादन केले. सोहळ्यात अमरावती विद्यापीठ गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच २५ विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती व इंडियन प्लास्टिक इन्स्टिट्यूटतर्फे १ लाख रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

व्यासपीठावर डॉ. गोपाल झामरे, डॉ. श्रीकांत सातारकर, डॉ. सुधीर ढोमणे, डॉ. संजय मकवाना, डॉ. अभिनंदन गुप्ता व प्रा. गजानन भारसाकळे उपस्थित होते. संचालन व आभार डॉ. रश्मी टाले यांनी केले. सोहळ्याच्या यशस्वितेसाठी डॉ. सतीश खेडकर, डॉ. एम. एस. पाटील, डॉ. अमित गावंडे, प्रा. आनंद पांडे, प्रा. गुल्फाम शेख, प्रा. शाहू चोरे, प्रा. शशिकांत ठाकरे, प्रा. रजनीकांत जाधव, प्रा. सुधीर ढोमणे, प्रा. कल्याणी बारब्दे, प्रा. ऋतुजा देशमुख, प्रा. वासंती गौड, प्रा. अमर टोलमारे, प्रा. दुष्यंत झामरे, प्रा. संदीप अवचार, प्रा. दुर्गेश वेले, विठ्ठल ढोबळे, मिलिंद आखरे, गोकुळ कोठाले, रमेश गेबड तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.

चौकशीची मागणी | सरपंच पतीकडून आर्थिक मागणीचा ग्रामस्थांचा आरोप

# बेलुरा ग्रामपंचायतीचा कारभार वादाच्या भोवऱ्यात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २६ :** तालुक्यातील बेलुरा ग्रामपंचायतीचा कारभार सध्या चर्चेचा विषय ठरला असून, रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळवून देण्यासाठी काही घटकांकडून आर्थिक मागणी केली जात असल्याचा खळबळजनक आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकारामुळे दलित वस्तीतील नागरिकांमध्ये संतापाची लाट असून, प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.



### घरकुल योजनेत गोंधळ?

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या कल्याणासाठी शासनाने रमाई आवास योजना राबवली आहे. मात्र, बेलुरा येथे या योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. येथील अनेक गरजू लाभार्थी आजही कच्च्या झोपड्यांमध्ये राहत असून, पावसाळ्यात त्यांचे प्रचंड हाल होतात. अशा परिस्थितीत घरकुलाचा लाभ मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधींशी संबंधित व्यक्तींकडून पैशांची मागणी होत असल्याचा दावा वसंत यशवंत पचांग या ग्रामस्थाने एका व्हिडिओद्वारे केला आहे. पात्र लाभार्थ्यांना डावलून अपात्र लोकांना लाभ दिला जात असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे.

या गंभीर आरोपांमुळे अकोट तालुक्यात खळबळ उडाली असून, जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची दखल घेऊन सत्यता पडताळावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, या आरोपांमुळे प्रशासनाच्या पारदर्शक कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित यंत्रणा आता काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> ❑ आमचे संपूर्ण आयुष्य कच्च्या झोपडीत गेले. घरकुलासाठी विनंती केली असता, संबंधित यंत्रणेकडून पैशांची विचारणा केली जाते. आमच्याकडे पैसे नसल्यामुळे आणि आम्ही त्यांना मतदान केले नसल्याचे कारण सांगत आम्हाला लाभापासून वंचित ठेवले जात असल्याचा आमचा आरोप आहे. शासनाने या प्रकरणाची चौकशी करून आम्हाला न्याय द्यावा.
>
> **- वसंत यशवंत पचांग,** ग्रामस्थ, बेलुरा.

> ❑ ग्रामपंचायतीमार्फत कोणत्याही प्रकारे पैशांची मागणी केली जात नाही. ज्या ग्रामस्थांकडे आवश्यक कागदपत्रे नसतात, त्यांना तांत्रिक कारणास्तव लाभ मिळत नाही. या प्रकरणातील कागदपत्रांची पुन्हा पडताळणी करून पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार घरकुलाचा लाभ निश्चितपणे दिला जाईल.
>
> **- दीपिका राम मंगळे,** सरपंच व
> **- राम मंगळे,** सरपंच पती, बेलुरा.

## महानमध्ये ईद मिलन कार्यक्रमातून जोपासली एकात्मता



**महान :** पवित्र रमजान ईदनिमित्त महान येथे अनिस शेख यांच्या निवासस्थानी २५ मार्च रोजी सायंकाळी ईद मिलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या छोटेखानी उपक्रमात हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत शिरखुरम्याचा आस्वाद घेतला आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडवले.या कार्यक्रमाला पिंजर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी पोलीस पाटील गणेश पाटील नानोटे, अमोल भांगे, डॉ. धनंजय धानोरे, शिवाजीराव, अब्दुल सादिक, रवी महागावकर, अशोक साळोकार, दशरथ साळुंखे, गजानन नानोटे, सुनील जानुनकर, राजेश गायकवाड, काळे वेल्डर, ॲड. निलेश ठोंबरे, मनोज पाठक, गणेश काकणे, अब्दुल नसीम, सुरेश शेवलकर, गोकुळ जानुनकर, गणेश सरोदे, माजी सरपंच सुनील जाणोरकार, राजेश वाघमारे, उमेश हातोलकर, विपुल ढाकोलकर, बंटी, प्रतीक खरात, विनोद भडांगे, शेखर जानुनकर, निळकंठ नानोटे, लोखंडे, मिलिंद सुपनेर, खांडेकर, सत्तार शाह, उज्वल काळे, आमीर खान, नासिर कंपाउंडर, शेख नदीम, मोहम्मद हरमेन, लुमान खान, हाफिज इनायत खान, सोहेल खान, साकिब खान आणि तनवीर शहा यांची उपस्थिती होती. ठाणेदार दराडे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी मोहम्मद अरशान, शेख मुद्दस्सिर, खिझर अहमद, बाबा व फैजल शाह यांनी परिश्रम घेतले. अनिस शेख यांनी सर्वांचे आभार मानले.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, शुक्रवार, दि.२७ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



## जनगणनेची अचूकता हाच देशाच्या विकासाचा पाया- कुंभेजकर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २६ :** ''जनगणना ही केवळ लोकसंख्येची आकडेवारी गोळा करण्याची तांत्रिक प्रक्रिया नसून, देशाच्या आगामी काळातील सर्वांगीण विकासाची धोरणे आखण्यासाठीचा तो एक महत्त्वपूर्ण वैज्ञानिक आधार आहे. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने नियमावलीचे काटेकोर पालन करून अचूक, पारदर्शक आणि विश्वासार्ह माहिती संकलित करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे,'' असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय आणि जनगणना संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात गुरुवारी (दि. २६) या शिबिराचा शुभारंभ झाला.

कार्यक्रमाला परिविक्षाधीन आयएएस अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, जनगणना संचालनालयाचे सहायक संचालक प्रवीण भगत, जिल्हा समन्वयक ऋषीकेश पाथरे आणि शशांक रुखने यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की, ''जनगणना प्रक्रियेत वेळ आणि अचूकता या दोन गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मागील तीन महिन्यांपासून या मोहिमेची पूर्वतयारी युद्धपातळीवर सुरू आहे. प्रत्यक्ष क्षेत्रात काम करताना त्रुटी राहू नयेत, यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याने इन्स्ट्रक्शन मॅन्युअलचा सखोल अभ्यास करावा. संकलित केलेली माहिती ही गोपनीय आणि सुरक्षित ठेवणे ही प्रशासकीय जबाबदारी आहे. प्रास्ताविक करताना निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी आगामी जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेतला. ''प्रशासकीय यंत्रणेतील सर्वोच्च अधिकाऱ्यांपासून ते प्रत्यक्ष मैदानावर काम करणाऱ्या गणनाकर्त्यांपर्यंत सर्वांसाठी हे प्रशिक्षण अनिवार्य आहे. डिजिटल साधनांचा वापर आणि मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण या शिबिरातून केले जाणार आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

या तीन दिवसीय शिबिरात माहितीच्या अचूकतेसाठी डेटा एंट्री, डिजिटल साधनांचा प्रभावी वापर आणि गोपनीयतेचे नियम यावर तज्ज्ञांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. केवळ सैद्धांतिक माहिती न देता, प्रत्यक्ष फील्ड वर्क दरम्यान येणाऱ्या संभाव्य समस्या आणि त्यावरील उपाययोजनांबाबत प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन वाघ यांनी केले, तर सहायक महसूल अधिकारी अतुल देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले. या शिबिराला जिल्ह्यातील तहसीलदार, मुख्याधिकारी, नायब तहसीलदार, तांत्रिक सहाय्यक, गणनाकर्ते आणि पर्यवेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महत्त्वाचे

## कोंडोलीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहात



**कोंडोली:** येथील श्री पितांबर महाराज संस्थान (गुरु श्री गजानन महाराज संस्थान) मध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीराम नवमीचा उत्सव मोठ्या भक्तीभावात साजरा करण्यात आला. २६ एप्रिल रोजी दुपारी ठीक १२ वाजता प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव सोहळा पार पडला. जन्मोत्सवाच्या वेळी उपस्थित भाविकांनी जय श्रीरामचा जयघोष केल्याने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. त्यानंतर महिला मंडळाने पाळणा गीत गायन करून प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव साजरा केला. या मंगल प्रसंगी प्रभूंच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या सोहळ्याला संस्थानचे सर्व विश्वस्त मंडळ, भजनी मंडळ तसेच कोंडोली गावासह परिसरातील महिला, पुरुष आणि बालगोपाळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विठोलीचे मुख्याध्यापक लोंढे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार



**मानोरा :** तालुक्यातील पी एम श्री जिल्हा परिषद केंद्रीय शाळा, विठोली येथील मुख्याध्यापक अर्जुन लोंढे यांना ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचा सन २०२५-२६ चा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. पुणे येथील निगडी येथील ग. दि. माडगूळकर सभागृहात २९ मार्च रोजी या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. राज्याचे मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते लोंढे यांना हा सन्मान प्रदान केला जाईल.

## अल्पवयीन युवतीची आत्महत्या

**रिसोड :** शहरातील कदम मळा परिसरात १७ वर्षीय अल्पवयीन युवतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवार, २४ मार्च रोजी सायंकाळी उघडकीस आली. प्रियंका रमेश पवार (वय १७) असे मृत युवतीचे नाव आहे. घटनेच्या वेळी प्रियंका ही घरात एकटीच होती, तर कुटुंबीय कामानिमित्त बाहेर गेले होते. याच दरम्यान, तिने घरातील अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच, रिसोड पोलिस ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह ग्रामीण रुग्णालयात पाठविला.

## इंधन तुटवड्याच्या अफवेने उडाली धांदल; पेट्रोल पंपांवर रांगा



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**शिरपूर जैन, दि. २६ :** आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, शिरपूर जैन शहरात पेट्रोल आणि डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याची अफवा पसरली. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन गुरुवारी शहरातील पेट्रोल पंपांवर इंधन भरण्यासाठी वाहनधारकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे पाहायला मिळाले.

अफवेमुळे नागरिकांची धाव इंधनाचा तुटवडा भासणार या चर्चेमुळे दुपारपासूनच पेट्रोल पंपांवर गर्दी होण्यास सुरुवात झाली. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर इंधन साठा करण्यासाठी धाव घेतल्याने शहरातील एका पंपावरील साठा संपल्याची माहिती समोर आली. उर्वरित पंपावरही प्रचंड गर्दी झाल्याने काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी पेट्रोल पंप चालकांना पोलीस प्रशासनाची मदत घ्यावी लागली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहनधारकांना शांत करत रांगा शिस्तबद्ध केल्या.

प्रशासनाचे आवाहन सद्यस्थितीत इंधनाचा कोणताही अधिकृत तुटवडा नसून केवळ अफवेमुळे ही गर्दी वाढल्याचे सांगण्यात येत आहे. नागरिकांनी कोणत्याही चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये आणि घाबरून न जाता सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## लेकीच्या भविष्यासाठी लागणारी महागडी लस आता अगदी मोफत!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**एचपीव्ही लसीकरणाबाबत महत्त्वाची माहिती:**
**पात्रता :** प्रामुख्याने १४ ते १५ वयोगटातील मुलींसाठी ही एचपीव्ही लस सर्वाधिक गुणकारी ठरते.
**कुठे मिळेल:** वाशिम जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये आणि नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात
**खर्च :** खाजगीत हजारो रुपये मोजावे लागणारी ही लस सरकारी केंद्रांवर पूर्णपणे मोफत.

**वाशिम, दि. २६ :** महिलांमध्ये वाढणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करण्यासाठी अत्यंत प्रभावी मानली जाणारी एचपीव्ही लस आता सर्वसामान्य कुटुंबांतील मुलींसाठी विनामूल्य उपलब्ध झाली आहे. खाजगी रुग्णालयांत हजारो रुपये किंमत असलेली ही महागडी लस वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये शासनामार्फत मोफत दिली जात आहे.

बाजारामध्ये गार्डासिल सारख्या नामांकित कंपन्यांच्या एचपीव्ही लसींची किंमत सामान्यांच्या बजेटबाहेर आहे. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक मुली या जीवनरक्षक कवचापासून वंचित राहत होत्या. हीच दरी सांधण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने ही लस सरकारी दवाखान्यांत उपलब्ध करून दिली आहे. ही एचपीव्ही लस पूर्णपणे सुरक्षित असून तिचे कोणतेही गंभीर दुष्परिणाम नाहीत, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांच्या मृत्यूचे एक मोठे कारण आहे. वेळेवर घेतलेली ही एचपीव्ही लस भविष्यातील हा जीवघेणा धोका कायमचा टाळू शकते. वाशिम जिल्ह्यातील पालकांनी आपल्या लेकींच्या सुरक्षित आरोग्यासाठी या मोहिमेत हिरीरीने सहभागी व्हावे. असे आवाहन केले आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी आपला एक हृदयस्पर्शी अनुभव मांडला. ते म्हणाले, ''काही वर्षांपूर्वी ही एचपीव्ही लस शासकीय स्तरावर उपलब्ध नव्हती. त्यावेळी माझ्या मुलीच्या भविष्यातील आरोग्याची काळजी म्हणून मी स्वतः खासगी बाजारातून ही महागडी लस विकत घेतली होती. मात्र, आज तीच महागडी आणि दर्जेदार लस शासन विनामूल्य देत आहे.'' ''ही लस पूर्णपणे सुरक्षित असून तिचे कोणतेही गंभीर दुष्परिणाम नाहीत. त्यामुळे पालकांनी कोणताही संकोच न बाळगता, मनातील भीती काढून टाकावी.

## जनगणना प्रक्रियेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्ष स्थापन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २६ :** जिल्ह्यातील जनगणना प्रक्रियेवर चोख नियंत्रण ठेवण्यासाठी आणि विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तळमजल्यावर 'जिल्हास्तरीय जनगणना कक्ष' कार्यान्वित करण्यात आला आहे. या नवीन कक्षाचे उद्घाटन २६ मार्च रोजी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते पार पडले. आगामी जनगणनेचे कामकाज अत्यंत क्लिष्ट आणि तांत्रिक स्वरूपाचे असल्याने, त्याचे नियोजनबद्ध निरीक्षण करण्यासाठी या स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. या माध्यमातून जिल्ह्यातील माहिती संकलनाच्या कामाला गती मिळणार असून पारदर्शकता जपली जाणार आहे. तसेच, क्षेत्रस्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अडचणींचे निवारण याच केंद्रातून केले जाईल.

यावेळी आयएएस परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, तहसीलदार निलेश पळसकर, प्रतीक्षा तेजनकर यांच्यासह जनगणना संचालनालयाचे सहाय्यक संचालक प्रवीण भगत व अन्य अधिकारी उपस्थित होते.

## प्रवाशांसाठी शीतल जल; मुंदडा विद्यालय पतसंस्थेचा पुढाकार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मालेगाव, दि. २६ :** वाढत्या उन्हाळ्याची दाहकता लक्षात घेऊन, प्रवाशांची तहान भागवण्यासाठी ना. ना. मुंदडा विद्यालय पगारदार सेवकांच्या पतसंस्थेच्या वतीने मालेगाव येथील गांधी चौक परिसरात पाणपोई सुरू करण्यात आली आहे. बुधवार, २५ मार्च रोजी या सामाजिक उपक्रमाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले.

उन्हाळ्याच्या दिवसांत लांबचा प्रवास करणाऱ्या नागरिकांना पिण्याचे शुद्ध आणि शीतल पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही पाणपोई कार्यान्वित करण्यात आली आहे. सामाजिक बांधिलकी जपत पतसंस्थेने हा उपक्रम हाती घेतला असून, गांधी चौकातील गजबजलेल्या ठिकाणी याचा प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.

या उद्घाटन प्रसंगी ना. ना. मुंदडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष रामचंद्र मुंदडा, सचिव आशिष मुंदडा, नगराध्यक्ष ओम खुरसडे, संचालक जगदीशराव बळी, मुंढे गुरुजी, प्रेमरतन भुतडा, श्रीकिसन मानधने, प्रवीण काबरा, कचरूलाल वर्मा, प्राचार्य दिनेशकुमार उंटवाल, गजानन पाटील यांची उपस्थिती होती.

तसेच पतसंस्थेचे अध्यक्ष अनिल काळे, सचिव अंतराव गायकवाड, उपाध्यक्ष संदीप सावले, संचालक अश्विनी बैस, सविता क्षीरसागर, संजय साबळे, अरविंद पिंपळकर, राजेश कराळे आणि गजानन घुगे यांची उपस्थिती होती.

## अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासाठी माहिती सादर करा

**वाशिम:** सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समायोजनासाठी आवश्यक माहिती तातडीने सादर करण्याचे निर्देश माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले आहेत. यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व खासगी शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष, सचिव आणि मुख्याध्यापकांना सोमवारी (दि. २३ मार्च) स्मरणपत्र पाठवून ही माहिती तातडीने देण्यास बजावण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या नियमांनुसार, जिल्ह्यातील मराठी, उर्दू आणि हिंदी माध्यमाच्या अनुदानित, अंशतः अनुदानित तसेच नगरपरिषद माध्यमिक शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणे अनिवार्य आहे. संबंधित संस्थांनी प्रथम आपल्या संस्थांतर्गत रिक्त पदांवर शिक्षकांचे समायोजन करून, त्याबाबतचे प्रस्ताव १६ मार्चपर्यंत सादर करणे अपेक्षित होते. मात्र, अनेक शाळांनी अद्याप अतिरिक्त शिक्षक आणि रिक्त पदांची माहिती कार्यालयाला दिली नसल्याने प्रशासकीय प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला आहे.

## आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांच्या तत्परतेने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान टळले



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**इंझोरी, दि. २६ :** इंझोरी ते धामणी रस्त्यावरील शेतामध्ये गहू पिकाची काढली झालेल्या शेतामध्ये अचानक आग लागली. लागलेल्या आगीला नियंत्रित करण्याकरिता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने तात्काळ अग्निशामन दल पाठविल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान टळले.

आग लागल्याची माहिती शेतकऱ्यांनी आपदा मित्र यांना दिली असता त्यांनी तात्काळ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिली. त्यांनी तात्काळ कारंजा वरून अग्निशमन दलाला इंझोरी येथे पाचारण केले. यावेळेस हवेचा वेग जास्त असल्याने आगीने उग्ररूप धारण केले. या आगीमुळे आजूबाजूला असणाऱ्या शेतकऱ्यांचा काढणीला आलेला गहू जळून खाक होण्याची भीती निर्माण झाली होती . मात्र वेळेवर अग्निशमन दल जागेवर पोहोचल्याने होणारा मोठा अनर्थ टळला. आग आटोक्यात आल्याने शेजारी असलेल्या आठ ते दहा एकर जमीन मधील पिकाचे नुकसान टळले.

### संतापजनक कारभार | मुक्या जनावरांचे आरोग्य रामभरोसे!

## कुलूपबंद दवाखाना: पशुवैद्यकीय विभागाची दांडीबहाद्दर यंत्रणा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**मानोरा, दि. २६ :** तालुक्यातील मुख्य केंद्र असलेल्या मानोरा येथील शासकीय पशुवैद्यकीय दवाखाना सध्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे चर्चेत आला आहे. हक्काचा दवाखाना असूनही वेळेवर उपचार मिळत नसल्याने, आजारी गुरांना घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांवर आल्यापावली परत जाण्याची वेळ येत आहे. ''दवाखाना असून उपयोग काय?'' असा संतप्त सवाल आता मानोरा परिसरातील पशुपालक विचारत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मानोरा शहर आणि परिसरातील अनेक गावांसाठी हा दवाखाना आधारस्तंभ आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून येथील स्थानिक पशुधन विकास अधिकारी सुट्टीवर आहेत. नियमानुसार ज्यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त प्रभार सोपवण्यात आला आहे, ते अधिकारीदेखील मुख्यालयात उपस्थित राहत नसल्याचे समोर आले आहे. २३ आणि २४ मार्च रोजी सलग दोन दिवस शेतकरी आपल्या आजारी जनावरांना घेऊन दवाखान्यात आले असता, त्यांना दवाखान्याला टाळे ठोकलेले दिसले.

या गोंधळात धक्कादायक बाब म्हणजे, सामान्य शेतकऱ्यांनी येथील डॉक्टर रोम यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. मात्र, एका स्थानिक राजकीय पदाधिकाऱ्याने फोन करताच ''मी रजेवर आहे'' असे उत्तर डॉक्टरांकडून देण्यात आले. दुसरीकडे, प्रभार असलेल्या अधिकाऱ्याशी संपर्क साधला असता, त्यांनी आपण पोहरादेवी येथे असल्याचे सांगितले. शासकीय कामात पारदर्शकता ठेवण्याऐवजी केवळ पुढाऱ्यांना उत्तरे द्यायची आणि शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडायचे, असा प्रकार येथे सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. हवामानातील बदलामुळे सध्या जनावरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत पशुवैद्यकीय दवाखाना बंद राहणे म्हणजे मुक्या प्राण्यांच्या जिवाशी खेळण्यासारखे आहे. पत्रकारांनी या विषयावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बाजू जाणून घेण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याकडूनही प्रतिसाद मिळाला नसल्याने या प्रकरणातील साटंलोटं उघड होत आहे. या गंभीर प्रकाराची दखल घेऊन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तांनी संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

❑ मी सोमवारी २३ मार्च रोजी दुपारी ३ वाजता आणि मंगळवारी २४ मार्च रोजी सकाळी ८ ते ९:३० या वेळेत दवाखान्यात गेलो होतो. मात्र, तिथे कोणीही उपस्थित नव्हते. पत्रकारांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन लावूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही. अशा बेजबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई करण्यात यावी.

**- विजय इंगळे महाराज**
पीडित पशुपालक

## बंजारा संस्कृती जपणे ही सामूहिक जबाबदारी – संजय राठोड

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २६ :** राज्यात बंजारा समाजाची लोकसंख्या मोठी असतानाही दीर्घकाळ हक्काच्या अकादमीचा अभाव होता. मात्र, निरंतर पाठपुराव्यानंतर बंजारा अकादमीला मंजुरी मिळाली असून, आता साहित्यिक व कवींना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. ही समृद्ध संस्कृती जपणे आणि ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे, ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे,'' असे प्रतिपादन माजी मंत्री संजय राठोड यांनी केले.

सांस्कृतिक कार्य विभाग आणि बंजारा विरासत यांच्या संयुक्त विद्यमाने पोहरादेवी येथे भव्य भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात राज्यभरातून तब्बल ३७५ भजनी मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या सर्व मंडळांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

धार्मिक विधींनी सोहळ्याचा प्रारंभ २५ मार्च रोजी सिंगद रोडवरील गुरुद्वारा मैदानावर हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद बंजारा धर्मगुरू बाबूसिंग महाराज यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते विधिवत पूजन व भोग विधी झाल्यानंतर आरदास करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बंजारा समाजाची लोककला, परंपरा आणि आध्यात्मिक वारसा भजनांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यात आला. व्यासपीठावर डॉ. टी. सी. राठोड, महंत कबीरदास महाराज, सुनील महाराज, जितेंद्र महाराज, शेखर महाराज, रायसिंग महाराज, प्रेमसिंग राठोड, प्रा. वीरा राठोड, कवी सुरेश राठोड, भक्तराज महाराज आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# अकोटमध्ये इंधन टंचाईच्या अफवेने मोठी खळबळ

## पेट्रोल पंपांवर वाहनधारकांच्या लांबलचक रांगा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २६ :** अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन आणि घरगुती गॅसचा मोठा तुटवडा निर्माण होणार असल्याच्या अफवा पसरल्याने अकोट शहरात बुधवारी मोठी खळबळ उडाली. या अफवांना बळी पडलेल्या नागरिकांनी पेट्रोल पंपांवर एकाच वेळी गर्दी केल्याने शहरात वाहनांच्या लांबलचक रांगा पाहायला मिळाल्या. प्रत्यक्षात प्रशासनाने आणि इंधन वितरकांनी शहरात पेट्रोल, डिझेल आणि गॅसचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले असून, नागरिकांनी घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. सोशल मीडिया आणि तोंडी चर्चेतून ''इंधन व गॅसचा साठा संपणार'' अशा चुकीच्या बातम्या वाऱ्यासारख्या पसरल्या. यामुळे भविष्यात इंधन मिळणार नाही, या भीतीने वाहनधारकांनी गरजेपेक्षा अधिक पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी पंपांकडे धाव घेतली. काही पेट्रोल पंपांवर तर ही गर्दी इतकी वाढली की, वाहतुकीची कोंडी निर्माण होऊन किरकोळ वादावादीचे प्रकारही घडले.



### अफवा पसरवणाऱ्यांवर लक्ष!

अकोट शहरातील इंधन टंचाईच्या अफवा पूर्णपणे निराधार आहेत. नागरिक पॅनिक बाइंग करत असून त्यामुळे कृत्रिम टंचाई भासू शकते. सोशल मीडियावर चुकीची माहिती पसरवणाऱ्यांवर प्रशासनाचे बारीक लक्ष असून, अफवा पसरवणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत पोलीस प्रशासनाने दिले आहेत. नागरिकांनी संयम राखावा.

केवळ पेट्रोलच नव्हे, तर गॅस सिलिंडरच्या बाबतीतही अशीच भीती पसरली आहे. अतिरिक्त सिलिंडर साठवून ठेवण्याच्या उद्देशाने काही नागरिकांनी थेट गॅस एजन्सीकडे धाव घेतल्याचे चित्र दिवसभर पाहायला मिळाले. अकोट तालुक्यातील पेट्रोल पंप चालकांनी स्पष्ट केले की, इंधनाचा कोणताही तुटवडा सध्या नाही आणि कंपन्यांकडून येणारा पुरवठाही नियमित आहे. गॅस वितरकांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑनलाइन बुकिंगनंतर २ ते ३ दिवसांत घरपोच वितरण सुरळीत सुरू आहे. इराण-अमेरिका वादाचा स्थानिक पुरवठ्यावर कोणताही परिणाम झालेला नाही. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून अनावश्यक साठा करू नये आणि विनाकारण घबराट निर्माण करू नये, असे आवाहन प्रशासकीय यंत्रणेने केले आहे.

---

## महत्त्वाचे

### पातूरमध्ये शाहबाबू उर्सनिमित्त रंगणार कव्वालीची मैफल



**पातूर :** हजरत शाह अब्दुल अजीज उर्फ शाहबाबू (र.अ.) यांच्या ८०० व्या ऐतिहासिक उर्सनिमित्त ३० मार्च रोजी दुपारी ४ ते १० या वेळेत शाहबाबू मैदानात भव्य कव्वालीचे आयोजन करण्यात आले आहे. हाजी सय्यद कमरोद्दीन यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात अजमेरचे प्रसिद्ध साबरी सुफी ब्रदर्स (दिलशाद-इरशाद साबरी) आपली कला सादर करतील. यावेळी मप्रकाँचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार नितीन देशमुख, आमदार साजीद खान पठाण, प्रकाश तायडे, अशोक अमानकर आणि माजी नगराध्यक्ष हिदायत खान उर्फ इद्दु पैलवान यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेल्या या कार्यक्रमात साबरी बंधू ताज वाले व तुम बडे गरीब नवाज हे सुफी कलाम सादर करतील. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक हाजी सय्यद कमरोद्दीन व पातूर शहर काँग्रेस अध्यक्ष मुख्तार शेख अहमद यांनी केले आहे.

### युवाशक्तीला बळ द्या, स्वयंरोजगार योजनांचा विस्तार करा!

**अकोला :** ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या युवाशक्तीला चालना देण्यासाठी केंद्र सरकारने विविध योजनांचा विस्तार करावा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कर्जप्रक्रिया सुलभ करावी, अशी आग्रही मागणी अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांनी लोकसभेत केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या योजना प्रभावी असल्या तरी, त्यातील त्रुटी दूर करून युवकांना अधिक संधी देण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. लोकसभेत बोलताना खासदार धोत्रे म्हणाले की, केंद्र सरकारने फेरीवाल्यांसाठी सुरू केलेली स्वयंरोजगार योजना अत्यंत स्तुत्य आहे. मात्र, बदलत्या काळानुसार या योजनेचा विस्तार करून त्यातील आर्थिक मदतीची राशी वाढवणे आवश्यक आहे. मुद्रा लोन आणि मातृशक्ती-युवाशक्तीसाठी असलेल्या योजनांचा लाभ देशातील कोट्यवधी जनतेला होत आहे. यामुळे सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होत असून गरिबी निर्मूलनाच्या दिशेने हे सरकारचे योग्य पाऊल आहे.
परंतु, छोटे उद्योजक आणि फ रीवाल्यांना कर्ज घेताना अनेक तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या अडचणी दूर करून तळागाळातील नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी सभागृहात केली.

### निधन वार्ता

#### राम हागे



**हिवरखेड :** येथील रहिवासी राम सूर्यभानजी हागे (वय ७८) यांचे बुधवार, २५ मार्च २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने हिवरखेड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. राम हागे हे मनमिळावू स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, सहा मुले, सुना, नातवंडे असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

---

## पातूरमध्ये भीषण पाणीटंचाई; दोन संतांच्या जत्रेमुळे मागणीत वाढ




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. २६ :** पातूर शहरात सध्या पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असून, नागरिकांना आठवड्यातून केवळ एकदाच पाणीपुरवठा केला जात आहे. ही वेळ वाढवून आठवड्यातून किमान दोन वेळा पाणीपुरवठा करावा, या मागणीसाठी एमआयएम युनिटच्या वतीने तहसीलदारामार्फत अकोला जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. सध्या पातूर शहरात हजरत शाह बाबू बाबा यांचा उर्स आणि श्री सीदाजी महाराज यांची जत्रा सुरू आहे. या धार्मिक उत्सवांमुळे शहरात भाविकांची मोठी गर्दी असून पाण्याची गरजही वाढली आहे. मात्र, नगर परिषदेच्या जलपुरवठा विभागाकडून केवळ आठवड्यातून एकदाच पाणी मिळत असल्याने नागरिकांचे आणि व्यापाऱ्यांचे हाल होत आहेत. वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.
या गंभीर समस्येवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी एमआयएमचे शेख शकील, फिरोज खान, तौसिफ खान, शेख नईम, सय्यद फराज, शुभम वानखेडे, मोहम्मद अहील, सय्यद कबीर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला.

---

## पिंपळखुटा संगम येथे संत भायजी महाराज यात्रोत्सवाची सांगता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. २६ :** पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेल्या संत भायजी महाराज तीर्थक्षेत्र, पिंपळखुटा संगम येथे श्रीराम नवमीनिमित्त आयोजित महोत्सवाची गुरुवारी मोठ्या उत्साहात सांगता झाली. यानिमित्त आयोजित महाप्रसादाचा हजारो भाविक भक्तांनी लाभ घेतला.
संत भायजी महाराज यांनी १३२ वर्षांपूर्वी अडाण व मडाण या नद्यांच्या संगमावर श्रीराम नवमी महोत्सवाची सुरुवात केली होती. यावर्षी १९ ते २६ मार्च दरम्यान राम कृष्ण विठ्ठल हरी नारायण नामाचा अखंड जयघोष करण्यात आला. गुरुवारी सकाळी ६ वाजता काकड आरती व शोभायात्रा काढण्यात आली. त्यानंतर संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ (चांभई) यांचा भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राम तर्हाळकर, नरेंद्रभाऊ हेटे व प्रकाश महाराज गावंडे यांच्या हस्ते श्रीराम, सीता, लक्ष्मण मूर्तीसह संत भायजी महाराज व इतर महाराजांच्या समाधीचे पूजन करण्यात आले. दुपारी पद्माकर तर्हाळकर यांच्या वाणीतून श्रीराम कथा व जन्मोत्सव साजरा झाला. दुपारी ३ वाजता दहीहंडी व ४ वाजेपासून महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. या सोहळ्याला हभप प्रकाश महाराज गावंडे, वैराग्यमूर्ती आकाशपुरी महाराज व हभप संजयनाथ महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. उत्सवात भाविकांनी पाणीपुरवठा व इतर सेवा विनामूल्य पुरवल्या. तसेच आरोग्य निदान व रक्तदान शिबिराचेही यशस्वी आयोजन करण्यात आले होते.



---

## रामनवमीच्या पर्वावर मूर्तिजापुरात पाणपोईचे लोकार्पण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**मूर्तिजापूर, दि. २६ :** कडाक्याच्या उन्हात तहानलेल्यांची तृष्णा भागवणे हीच खरी ईश्वरसेवा आहे, हा विचार जोपासत नागवान परिवाराच्या वतीने शहरात भव्य पाणपोईचे लोकार्पण करण्यात आले. स्वर्गीय जुगलकिशोरजी नागवान व कौशल्यादेवी नागवान यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, रामनवमीचे औचित्य साधून आमदार हरीश पिंपळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.
येथील रुग्णालयीन भागात येणारे रुग्ण, त्यांचे नातेवाईक आणि वाटसरूंची पाण्याची सोय व्हावी, या उदात्त हेतूने भाजपचे उपाध्यक्ष अमित नागवान यांनी या पाणपोईची संकल्पना मांडली होती. या सुविधेचे उद्घाटन नगराध्यक्ष हर्षल साबळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी अमित नागवान यांच्या वतीने आमदार हरीश पिंपळे व मान्यवरांचे शाल, श्रीफळ आणि दुपट्टा देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक सचिन देशमुख, उपाध्यक्ष रोहित अवलवार, भाजप तालुकाध्यक्ष राऊत, डॉ. निरंजन साबू, अशोक नागवान, संजय नागवान, भूषण कोकाटे, चेतन नागवान, विजय, सुमित व अथर्व नागवान, अश्विन पचेरीवाल, पप्पू मुळे, उज्ज्वल अग्रवाल यांची उपस्थिती होती. तसेच संदीप जळमकर, राम कांबे, तेजस लडके, तुषार जोगदंड, छोटू मानकर, प्रमोद शिरभाते, हर्षल लोहपुरे, सागर व पवन अग्रवाल, नगरसेविका पूनम माळकर, रवी माळकर, सुनीता, सविता, नेहा व पायल नागवान, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर कुरुममध्ये पोलिसांचा रूट मार्च

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २६ :** आगामी रामनवमी, महावीर जयंती आणि हनुमान जयंती या सणांच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी माना पोलिसांनी कंबर कसली आहे. याच अनुषंगाने ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी, २५ मार्च रोजी सायंकाळी कुरुम ग्रामपंचायत क्षेत्रात जोरदार रूट मार्च काढण्यात आला.
सायंकाळी ५:५० वाजता सुरू झालेला हा रूट मार्च मुख्य बाजारपेठ आणि संवेदनशील भागातून ६:३० वाजेपर्यंत सुरू होता. यामध्ये ३ पोलीस अधिकारी, १५ पोलीस अंमलदार आणि १८ होमगार्डच्या जवानांनी सहभाग घेतला. पोलिसांच्या या संचलनामुळे ग्रामस्थांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, समाजकंटकांना चाप बसण्यास मदत होणार आहे. आगामी सण शांततेत, समन्वयाने आणि उत्साहात साजरे करावेत, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये,'' असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून यावेळी करण्यात आले. संचलन मार्गावर नागरिकांनी पोलिसांच्या या शिस्तबद्ध संचलनाचे स्वागत केले.



---

## शेलू वेताळात रामजन्मोत्सवाचा उत्साह; महाप्रसादाची ऐतिहासिक परंपरा कायम

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २६ :** तालुक्यातील शेलू वेताळ येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही प्रभू श्रीराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या गावात राम मंदिर, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि हनुमान मंदिर ही भाविकांची प्रमुख श्रद्धास्थाने असून, रामनवमीचा उत्सव येथे मोठ्या परंपरेने आणि उत्साहात साजरा केला जातो.

शेलू वेताळ येथील राम मंदिराच्या स्थापनेचा इतिहास अत्यंत रंजक आहे. गावामध्ये प्रभू श्रीरामांच्या मंदिराची स्थापना करण्याचा निर्णय झाला, तेव्हा सर्व गावकऱ्यांनी एकत्र येत नारळ फोडून एक शुभ संकल्प केला होता. ''गावात श्रीराम आणि सीतामाता यांची मूर्ती प्रतिष्ठापना करून दरवर्षी रामनवमीला भव्य महाप्रसाद देऊया,'' असा तो सामूहिक निर्धार होता. तोच शब्द प्रमाण मानून आजही सर्व गावकरी ही परंपरा अतिशय निष्ठेने आणि श्रद्धेने पाळत आहेत.

यावर्षीही रामनवमीच्या दिवशी परंपरेनुसार महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक राजू सरदार असून, त्यांना गावातील सर्व मित्र परिवार आणि समस्त गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. भक्ती आणि शक्तीचा संगम असलेल्या या उत्सवात केवळ शेलू वेताळच नव्हे, तर परिसरातील भाविकही मोठ्या संख्येने दर्शनासाठी आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजेरी लावतात.यानिमित्त मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली असून, सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. गावकऱ्यांच्या एकजुटीतून हा ऐतिहासिक सोहळा पार पडत असून, प्रभू श्रीरामांच्या आशीर्वादाने ही परंपरा आम्ही अखंडपणे पुढे नेत आहोत,असे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले.



---

**तक्रार** | ७ दिवसांत मूलभूत सोयी न मिळाल्यास तीव्र निदर्शने

## थार ग्रामपंचायतीचा ढिसाळ कारभार; संतापलेल्या ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. २६ :** तालुक्यातील मौजे थार येथील ग्रामपंचायत प्रशासनाच्या निष्क्रिय आणि ढिसाळ कारभाराविरोधात ग्रामस्थांनी एल्गार पुकारला आहे. गावातील मूलभूत सुविधांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने संतापलेल्या नागरिकांनी पंचायत समितीकडे तक्रार दाखल करत, येत्या ७ दिवसांत सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलनाचा सज्जड इशारा दिला आहे.
ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार, गावातील बहुतांश पथदिवे गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहेत. रात्रीच्या वेळी संपूर्ण गाव अंधारात बुडत असल्याने चोरी आणि अपघातांच्या घटनांमध्ये वाढ होण्याची भीती निर्माण झाली आहे. केवळ पथदिवेच नव्हे, तर गावातील स्मशानभूमीची अवस्थाही अत्यंत दयनीय झाली आहे. स्मशानभूमी परिसरात वाढलेली काटेरी झुडपे, पसरलेली अस्वच्छता आणि तुटलेल्या कठड्यांमुळे अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. याठिकाणी पिण्याच्या पाण्याची साधी सोयही नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. गावातील सांडपाण्याच्या नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने दुर्गंधी पसरली असून आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नाल्यांचे निकृष्ट दर्जाचे बांधकाम आणि कचऱ्यामुळे पावसाळ्यात परिस्थिती अधिक बिकट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दखल घेत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.
यावेळी मनोज पाटील फोकमारे, ओम पाटील फोकमारे, वाल्मिक फोकमारे, गोपाल फोकमारे, अक्षय फोकमारे, गणेश गावंडे, अनिल फोकमारे, माधव फोकमारे, राजू हेरोडे, अभिषेक काळे, पप्पू फोकमारे, दीपक फोकमारे, गणेश जगन्नाथ फोकमारे, संतोष फोकमारे, नकुल फोकमारे, भानुदास फोकमारे, पिंटू हिरोडे, गणेश गजानन फोकमारे आणि नरेंद्र फोकमारे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



---

## पातूर तहसीलमध्ये ग्राहक सभा; ग्राहक हक्कांवर झाले सविस्तर मार्गदर्शन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. २६ :** जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून पातूर तहसील कार्यालयाच्या नूतन इमारतीतील सभागृहात २५ मार्च रोजी विशेष ग्राहक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी निवासी नायब तहसीलदार विश्वजीत खंदारे होते. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी पुरवठा निरीक्षक शीतल दांदळे-मोरखडे, पातूर तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष देवानंद गहिले, तालुका महिला अध्यक्ष प्रा. करुणा गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. तहसील प्रशासनाच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सभेमध्ये ग्राहकांचे हक्क, समस्या आणि फसवणूक टाळण्याचे उपाय यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. देवानंद गहिले व प्रा. करुणा गवई यांनी ग्राहकांनी जागरूक राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात विश्वजीत खंदारे यांनी स्वस्त धान्य दुकानदार आणि सेवा पुरवठादारांनी पारदर्शक व्यवहार ठेवावेत, जेणेकरून ग्राहकांना त्रास होणार नाही, असे स्पष्ट केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक शीतल दांदळे-मोरखडे यांनी केले. संचालन बाळापूरचे कनिष्ठ लिपिक जगदीश ढगे यांनी केले, तर आभार सचिन परदेशी यांनी मानले. या सभेला पराग खंडारे, अक्षय गोरे, दिपाली चौरे, दुलेखान युसूफ खान, पंडितराव देशमुख यांच्यासह पातूर व बाळापूर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार, विविध विभागांचे कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



# बुलडाणा जिल्हा परिषदेचा ४१.२३ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**बुलडाणा दि. २६ :** मिनी मंत्रालय म्हटल्या गेलेल्या जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला आहे. ग्रामीण विकासाला डोळ्यासमोर ठेवून सदर अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. विविध योजनांपासून जिजाऊ जन्मोत्सवापर्यंत अनेक घटकांसाठीची तरतूद जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

सन २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ चा रु. ४१ कोटी २३ लाखांचा मूळ अर्थसंकल्प सामान्य सभेत मंजूर करण्यात आला. मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांनी अर्थसंकल्प सादर केला असून मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक गुलाबराव खरात यांनी त्यास मंजुरी दिली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन, प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) कोल्हे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, शिवशंकर भारसाकळे, प्रमोद एंडोले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, जिल्हा कृषी विकास अधिकारी अंगाईत, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. हा अर्थसंकल्प मुद्रांक शुल्क अनुदान, जमीन महसूल अनुदान, गुंतवणुकीवरील व्याज व इतर उत्पन्न यांचा विचार करून तयार करण्यात आला असून, जिल्हा परिषदेच्या गुंतवणुकीवरील व्याजातून उत्पन्नात वाढ झाल्याने यंदाचा अर्थसंकल्प वाढीव आहे. शासन नियमांनुसार खर्चात समाज कल्याणासाठी २० टक्के, महिला व बाल कल्याणासाठी १० टक्के, देखभाल-दुरुस्ती २० टक्के, दिव्यांग कल्याण ५ टक्के, शाळा दुरुस्ती ५ टक्के, समृद्ध पंचायत अभियान १० टक्के व ई-गव्हर्नन्ससाठी ०.५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे.

**विभागनिहाय तरतूद पुढीलप्रमाणे :** बांधकाम विभाग ६.७३ कोटी, शिक्षण ३.५८ कोटी, सार्वजनिक आरोग्य ५९ लाख, ग्रामीण पाणीपुरवठा ४.०५ कोटी, महिला व बाल कल्याण १.१२ कोटी, समाज कल्याण २.०६ कोटी, दिव्यांग कल्याण ८५ लाख (अनुशेष २.०८ कोटी), कृषी ८१ लाख, पशुसंवर्धन ६४ लाख, सामान्य प्रशासन २.९० कोटी, वित्त ७१ लाख, पंचायत ४.३१ कोटी, लघु पाटबंधारे १.८१ कोटी.

**ठळक योजना :** 'सीईओ संग्राम योजना' अंतर्गत १०० संवेदनशील ग्रामपंचायतींसाठी ५१ लाखांचे प्रोत्साहन. 'मिशन ' अंतर्गत गुणवंत विद्यार्थ्यांसाठी ५० लाखांची तरतूद; १०० विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशासाठी कोचिंग. विधवा, परित्याक्ता व एकल महिलांसाठी सहाय्य अनुदान योजनेसाठी ५० लाख; सुमारे १००० महिलांना लाभ. बायोगॅस योजनेसाठी ४० लाख; १३ तालुक्यांतील सुमारे १३० लाभार्थ्यांना फायदा. २९३ अर्धवेळ स्त्री परिचारिकांसाठी गणवेश व भाऊबीज भेटीसाठी ६ लाखांची तरतूद. दिव्यांग कल्याणासाठी ८५ लाख तर मागील अनुशेषासाठी २.०८ कोटींची तरतूद. तसेच राजमाता जिजाऊ जयंती, संत चोखामेळा जयंती, पातुर्डा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्श सोहळा, सैलानी यात्रा आदी सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांसाठीही निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या अर्थसंकल्पाद्वारे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# शेंदुर्जनमध्ये हिंदुत्वाचा महाकुंभ! विशाल हिंदू संमेलनात हजारो बांधवांचा हुंकार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**शेंदुर्जन दि. २६ :** तालुक्यातील शेंदुर्जन येथे बुधवार, २५ मार्च रोजी आयोजित विशाल हिंदू संमेलन अभूतपूर्व उत्साहात संपन्न झाले. हिंदू समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आणि सनातन संस्कृतीच्या रक्षणासाठी आयोजित या संमेलनाला जनसागराचे स्वरूप प्राप्त झाले होते. जय श्रीराम, हर हर महादेव आणि भारत माता की जयच्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण परिसर भगवामय झाला होता.

संतांच्या भूमीवर परकीय आक्रमणे अपयशी: माधवराव धुंदाळे कार्यक्रमाचे मुख्य वक्ते तथा विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री माधवराव धुंदाळे यांनी आपल्या धारदार भाषणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. ते म्हणाले, ''भारत ही संतांची भूमी आहे. इस्लामी राजवटीने शेकडो वर्षे सत्ता गाजवली, ५०० वर्षे संघर्ष झाला, तरीही ते आपले साम्राज्य पूर्णतः प्रस्थापित करू शकले नाहीत, कारण हिंदूंच्या रक्तात प्रभू रामचंद्रांचा आदर्श आणि प्रतिकारशक्ती आहे. आज संपूर्ण जग अणुबॉम्बच्या टोकावर उभे असताना केवळ भारतीय संस्कृतीच जगाला शांततेचा मार्ग दाखवू शकते.'' धुंदाळे यांनी सामाजिक जबाबदारीवरही भाष्य केले. ''आपण प्लास्टिकचा वापर करून नाल्या तुबवतो आणि ग्रामपंचायतीला दोष देतो. पाणी जपून वापरणे आणि वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे,'' असे परखड मत त्यांनी व्यक्त केले. तसेच पाश्चात्या कपडे सोडून स्वदेशी पेहराव (धोती-कुर्ता) वापरण्याचे आवाहनही त्यांनी केले.

लव्ह जिहादची भीषणता आणि मातांची जबाबदारी: साध्वी त्रिवेणीताई संभाजीनगर येथील प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प. साध्वी त्रिवेणीताई देशमुख यांनी लव्ह जिहादच्या वाढत्या धोक्यावर ताशेरे ओढले. त्या म्हणाल्या, ''गेल्या तीन महिन्यांत ३० ते ३५ मुली लव्ह जिहादच्या जाळ्यात अडकल्या आहेत. ज्या मुली आपल्या जन्मदात्या आई-वडिलांना ओळखायला तयार नाहीत, त्यांना रोखण्यासाठी घराघरांत जिजाऊ निर्माण होणे आवश्यक आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या मैत्रीवर, मोबाईलवर आणि वागण्यावर बारीक लक्ष ठेवावे, आई-वडिलांचा सांभाळ करा अन्यथा भविष्यात वृद्धाश्रमांची संख्या वाढल्याशिवाय राहणार नाही.

**'राष्ट्रनिर्माणासाठी संघशक्ती :** खुशाल महाराज यावेळी ह.भ.प. खुशाल महाराज शिंगणे मनोगत व्यक्त करताना भावूक झाले. ''राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा जातीचा नसून तो केवळ हिंदू जनजागृती आणि राष्ट्रनिर्माणासाठी समर्पित आहे.

## महत्त्वाचे

## अवैध दारूसह आरोपी जाळ्यात

**खामगाव :** अवैध दारू वाहतुकीच्या किटवर शहर पोलिसांनी मंगळवारी दुपारी जोरदार धडक देत एकाला रंगेहात पकडले. खामगाव-शेगाव मार्गावरील शर्मा टर्निंग परिसरात टाकलेल्या सापळ्यात आरोपी आडकला असून त्याच्याकडून हजारो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विश्वसनीय माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक गणेश कोल्हे यांच्या पथकाने नियोजनबद्ध कारवाई करत परिसरात जाळे पसरवले होते. हालचाली संशयास्पद वाटताच नारायण शंकर अवचार (३३) रा. पारखेड याला अडवण्यात आले. चौकशीदरम्यान तो बेकायदेशीररीत्याा दारू वाहतूक करत असल्याचे उघड झाले. पोलिसांनी केलेल्या झडतीत आरोपीकडून देशी-विदेशी बनावटीच्या एकूण १६ दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या.

## भरधाव दुचाकीची धडक; वृद्धाचा मृत्यू

**खामगाव :** शहरातील जलंब नाका-वाडी रोड परिसरात भरधाव व निष्काळजीपणे दुचाकी चालवल्यामुळे झालेल्या अपघातात एका ७० वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना २५ मार्च रोजी दुपारी घडली. या प्रकरणी खामगाव शहर पोलीस ठाण्यात अल्पवयीन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, राम धन दशरथ ताठे (७०) रा. कोक्ता, ता. खामगाव हे दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास जलंब नाका-बाडी रोडवरून जात असताना, नवाज शाह रफिक शाह (१७) रा. बड़े प्लटि, खामगाव याने त्याच्या ताब्यातील (क्र. एमएच-२८ के-९०५०) ही दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालचत ताठे यांना जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या ताठे यांचा मृत्यू झाला. या घटनेबाबत गणेश मनोहर ताठे (३८) व्यवसाय शेती, रा. कोक्ता यांच्या फिर्यादीवरून खामगाव शहर पोलीस ठाण्यात कायमी अप क्र. १७७/२०२६ अंतर्गत कलम २८१, १२५ (ख), १०६ बीएनएस तसेच मोटार वाहन कायदा कलम ३/१८१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.

## खामगावात श्रीराम नवमी निमित्त भव्य शोभायात्रा

**खामगाव :** विश्व हिंदू परिषद व श्रीराम जन्मोत्सव समिती, खामगाव यांच्या वतीने चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) ते श्रीराम नवमी या कालावधीत श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील धर्मप्रेमी नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. उत्सव काळात दररोज सकाळ व सायंकाळी विविध समाजबांधवांच्या हस्ते समरसता आरतीचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार २६ मार्च २०२६ रोजी श्रीराम नवमी निमित्त दुपारी ५ वाजता श्री प्रल्हाद महाराज राम मंदिर येथून प्रभू श्रीरामांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ही शोभायात्रा केला नगर, मोठी विहीर, देशमुख प्लॉट, शाळा क्र. ६ परिसर, एकबोटे चौक, अग्रसेन चौक, महाबीर चौक, फरशी मार्गे महावीर भवन येथे पोहोचून मुक्तेश्वर आश्रम येथे समारोप करण्यात आला. शहरातील विविध चौकांमध्ये सडा-रंगोळी, पारंपरिक स्वागत तसेच रामायण, महाभारत आणि श्रीराम श्रीकृष्ण जन्मावरील झांकी सादर करण्यात आले, आयोजकांनी नागरिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन केले होते.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २०५० - २१५० |
| गहू | १७०० - २२७५ |
| तुर | ४६२५ - ८०२५ |
| हरभरा | ४२०० - ५२०० |
| सोयाबीन | ४५०० - ५४६० |
| उडीद | ३५०० - ६००० |
| मुग | ४८०० - ४८०० |
| मका | ११०० - १६०० |

# रिक्त ग्रा.प. सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२६ :** राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार मोताळा तालुक्यांतील तीन ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये तालखेड, गुळभेली, गोतमारा, असे तिन रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे. या ग्रामपंचायतींमध्ये आचारसंहिता लागू असून निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन मोताळा तहसिलदार तथा ग्रामपंचायत निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे : निवडणूकीची अधिसूचना सोमवार दि. ३० मार्च २०२६ रोजी संबधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणुकीकरीता नाम निर्देशनपत्र दि. ७ ते १३ एप्रिल २०२६ पर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे. नामनिर्देशन पत्र छाननी बुधवार दि. १५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजूपासून छाननी संपेपर्यंत. दि. १७ एप्रिल २०२६ रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायं ५.३० वाजेपर्यंत होणार असून मतमोजणी बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# जि.प. हायस्कूल संग्रामपूर यांचा शिष्यवृत्ती परीक्षेत डंका

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**संग्रामपूर दि.२६ :** ''यशाची परंपरा आणि गुणवत्तेचा ध्यास'' हे ब्रीद वाक्य सार्थ ठरवत पीएम.श्री. जिल्हा परिषद हायस्कूल संग्रामपूर येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेतमध्ये पुन्हा एकदा बाजी मारली आहे नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात शाळेचे तब्बल १४ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन त्यांनी आपल्या शाळेच्या शिरेपेचात मानाचा तुरा रोवला आहे महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धात्मक परीक्षा घेतली जाते त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना पुढील पाच वर्षासाठी प्रति वर्ष १२ हजार असे एकूण ६० हजार रुपये शिष्यवृत्ती मिळते, दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत शाळेची मागील पंधरा वर्षाची यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे. यशवंत विद्यार्थ्यांची नामावली - कोमल गोमासे, साक्षी भोपळे, अंकित गोतमारे, सुपेश सरदार, रोशनी वानखडे, पायल मोरखडे, पूर्वी हागे, ज्ञानेश्वरी पोफळणारे, गौरी वेरूळकर, विराज बारब्दे, शिवम उमाळे, श्रेया पुंडे, आचल डामरे, आणि सोहम उमाळे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत मुख्याध्यापक यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या या यशाकरिता सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून या यशामागे शाळेतील मुख्याध्यापक तथा सर्व शिक्षक वृंद व शाळा व्यवस्थापन समिती यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# विद्यार्थ्यांनी रागाचे व्यवस्थापन करावे - कल्पना कांबळे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.२६ :** राग ही नैसर्गिक भावना असून त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. रागामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी त्याचे व्यवस्थित व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. तसेच राग टाळण्यासाठी विविध तंत्र आत्मसात करावे असे प्रतिपादन नाशिक येथील प्रथीतयश समुपदेशक कल्पना कांबळे यांनी आज भारत विद्यालय बुलढाणा येथे वर्ग पाच ते नऊच्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन करताना केले.

तसेच मोबाईल गेम व सोशल मीडिया यांचा आपल्या मनावर विपरीत परिणाम होत असून त्यापासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे व आपल्या भावनांचं व्यवस्थितपणे शेअरिंग करायला शिकावे असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. समाजामध्ये आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे असे ही त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. भारत विद्यालय बुलढाणा येथे सातत्याने विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी विविध तज्ञ मार्गदर्शकाचे मार्गदर्शन आयोजित केल्या जात आहे. त्याच उपक्रमातील एक भाग म्हणून प्रख्यात समुपदेशक कल्पना कांबळे यांना निमंत्रित करण्यात आले होते.

# चिखली तालुका संवाद दौरा बैठक उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.२६ :** माजी आमदार दिवंगत बाबुराव पाटील, उत्तमराव पाटील यांचा नातू असल्यामुळे जुन्या विचारांशी, पक्षाशी मी पुन्हा जुळलो. मला लोक विचारतात की, तुम्ही आता जिल्हाध्यक्ष होणार का? मी सर्वांना ठामपणे सांगत आहे, प्रदेशाध्यक्ष. हर्षवर्धन दादा सपकाळ व जिल्हाध्यक्ष राहुलभाऊ बोंद्रे यांच्या आदेशाने मी संवाद यात्रा सुरु केली असून मला कुठल्याही पदाची अपेक्षा नाही, फक्त काँग्रेस पक्ष वाढीसाठीच अहोरात्र झटणार, असल्याचा निर्धार काँग्रेसनेते संदिप दादा शेळके यांनी व्यक्त केला.

बुधवार दि. २५ मार्च रोजी चिखली येथील हिरकणी महिला अर्बनमध्ये तालुकानिहाय बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना संदिपदादा शेळके म्हणाले की, लोक मला विचारत आहेत, तुमच्या बँका आहेत, त्रास होणार नाही का? तर मी त्यांना सांगतो की, आमच्या पूर्वजांनी इंग्रज राजवटी सारखा कठीण त्रास सोसला. आता तर सर्व सुविधा आहेत. त्यामुळे जेलमध्ये जावे लागले, तरी चालेल... पण काँग्रेस विचार सोडणार नाही. यावेळी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष रामभाऊ जाधव, न.प.विरोधी पक्षनेते डॉ. मोहमंद इसरार, सचिन बोंद्रे, अतहरोद्दीन काझी, पर्यावरण सेलचे विजु पाटील शेजोळ, नगरसेवक गोपाल देव्हडे, जक्का भाई, गोकुळ शिंगणे, रतदिप शिनगारे, प्रशांत भटकर, समाधान सुपेकर, पांडुरंग पाटील भुतेकर, खलील बागवान, शेख खैरू, ईश्वराव इंगळे, जिवनबापु देशमुख, शिवराज पाटील, शेषराव अंभोरे, अशोक झगरे, रामधन मोरे, कापडसिंग पाटील, गणेश जवंजाळ, संजुकाका बाहेकर, रूपेश घोलप, विजय महाजन, श्रीकृष्ण अंभोरे यांच्यासह शेकडो काँग्रेस पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# पंतप्रधान आवास योजनेच्या घरकुल लाभार्थ्यांची फरफट सुरुच

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याहस्ते होणार होते वितरण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**अंढेरा दि.२६ :** पंतप्रधान आवास योजना राबविताना मोठ्या गाजावाजात टप्पा एक व दोन अंतर्गत पात्र घरकुल लाभार्थ्यांना हप्ते वितरण प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते 'एक क्लिक'द्वारे महाराष्ट्रातील लाभार्थ्यांना ऑनलाईन जोडण्यात आले होते.

विविध गावांतील शाळांमध्ये तसेच सार्वजनिक ठिकाणी प्रोजेक्टरच्या माध्यमातून हा कार्यक्रम दाखवून लाभार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्यात आली होती. मात्र, या घोषणेला तब्बल बारा महिने उलटूनही अनेक लाभार्थ्यांना प्रत्यक्षात एकही हप्ता मिळालेला नाही. घरकुल बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही ''आज जमा होईल'', ''आठ दिवसांत होईल'' अशा आश्वासनांवर लाभार्थ्यांची सतत दिशाभूल होत असल्याचा आरोप आहे. आधार अपडेट, बँक खाते केवायसी, नवीन पोस्ट खाते उघडणे अशा विविध प्रक्रियांची पूर्तता करूनही लाभार्थ्यांना हप्त्यांची प्रतीक्षा करावी लागत आहे. पाडळी शिंदे येथील घरकुल लाभार्थ्यांनी २४ मार्च रोजी पंचायत समिती देऊळगाव राजा येथे गटविकास अधिकारी यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. घरकुल बांधकाम पूर्ण होऊनही एकही हप्ता न मिळाल्याने संतप्त झालेल्या लाभार्थ्यांनी १० एप्रिलपर्यंत रक्कम जमा न झाल्यास आत्मदहनाचा इशारा दिला आहे. दरम्यान, तालुक्यातील इतर गावांतील लाभार्थीदेखील पंचायत समितीकडे वारंवार चकरा मारत असून, एनआयसीमार्फत खाते पडताळणी व केवायसी प्रक्रिया प्रलंबित असल्याने निधी वितरणात अडथळे निर्माण होत असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून लाभार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

**संकल्प** जि.प.शाळांच्या नवपरिवर्तनासाठी 'झेप' उपक्रमाची सुरुवात

# शिक्षकांची उपक्रमशीलता म्हणजे सृजनशील संशोधन- खरात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि. २६ :** जिल्हा परिषद शिक्षकांची नाविन्यपूर्ण उपक्रमशीलता ही सृजनशील संशोधनाचेच एक रूप असून, या माध्यमातून आगामी शैक्षणिक सत्रात जिल्हा परिषद शाळांमध्ये आमूलाग्र बदल घडेल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी व्यक्त केला.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा नियोजन सभागृहात ''झेप या अभिनव संकल्पनेतून जिल्ह्यातील १५० नाविन्यपूर्ण शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, शिक्षणाधिकारी डॉ. वैशाली ठग, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. मारुती गायकवाड, व्याख्याते गजानन राऊत, उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर, शेख अकिल आदी मान्यवर उपस्थित होते. गुलाब खरात पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद शिक्षक विविध प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. मात्र या उपक्रमांना व्यापक व्यासपीठ मिळत नाही. ''झेप'' उपक्रमाच्या माध्यमातून अशा उपक्रमांचे आदानप्रदान करून एका शाळेतील चांगले प्रयोग दुसऱ्या शाळेत पोहोचवण्याची व्यवस्था निर्माण केली जाणार आहे. प्रास्ताविकात प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरू असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतला. प्रशासन शिक्षकस्नेही राहील, तर शिक्षकांनी विद्यार्थीस्नेही बनून शाळांचा पट वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. जगराम भटकर यांनी मार्गदर्शन केले, तर गजानन राऊत यांनी प्रेरणादायी उद्बोधन केले. कार्यशाळेत निवडक शिक्षकांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे यांनी केले, तर आभार उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.



## महत्वाचे

### गळफास घेवून इसमाची आत्महत्या

**संग्रामपूर :** तालुक्यातील सोनाळा येथे प्रविण हिरा राठोड या ४५ वर्षीय इसमाने भाड्याने राहत असलेल्या खोलीत गळफास घेवून आत्महत्याा केल्याची घटना काल सायंकाळी घडली. शेख इक्बाल शेख हुसेन रा. सोनाळा यांनी पोलिसात तक्रार दिली की, मृतक हा भाड्याने खोली करुन एकटाच राहत होता. त्याने दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या केली. पोलिसांनी मर्ग नोंदविला असून पुढील तपास पोहेकॉ रमेश खरात हे करीत आहेत.

### उद्योजक इंगळे यांचा ग्राम गीता ग्रंथ देऊन सत्कार

**खामगाव :** येथील उद्योजक राम दास नामदेव इंगळे यांनी माटरगाव बुद्रुक येथील स्मशानभूमीतील दहनक्रियेसाठी लोखंडी कास्टिंगचा स्टॅन्ड दिल्या प्रित्यार्थ श्री मुक्ती धाम सुधार समिती माटरगाव बुद्रुक यांच्या वतीने २४ मार्च २६ रोजी त्यांचा श्री गुरुदेव प्रार्थना मंदिरात पार पडलेल्या एका कार्यक्रमात ग्रामगीता ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला इंगळे बंधूंना संस्कार प्रदीप भेट देऊन त्यांचे सदर स्वागत करण्यात आले स्टॅन्ड दहन ओट्यावर बसविण्यात आला आहे या सत्कार प्रसंगी अशोक निखाडे गजानन बाजारे राजेश इंगळे गुलाब इंगळे निलेश इंगळे संजय इंगळे विजय इंगळे ज्ञानेश्वर लोड रामदादा देशमुख संजय मोरे यांच्यासह श्री मुक्ती धाम सुधार समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### युवक बेपत्ता

**मलकापूर :** तालुक्यातील ग्राम निपाणा येथील सतीश बळीराम तांदुळकर हा ३० वर्षीय माझ्या मोठ्या भावाचा मुलगा सासरवाडीला जातो, असे म्हणून २३ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता घरुन गेला होता. मात्र सासुरवाडी येथे न पोहचता तो कुठेतरी बेपत्ता झाल्याची तक्रार संतोष सिताराम तांदुळकर यांनी पोलिसात दिली. मलकापूर ग्रामीण पोलिसांनी काल २५ मार्च हरविल्याची नोंद घेतली असून पुढील तपास महिला पोहेकॉ सविता मोरे ह्या करीत आहेत.

### अज्ञात वाहन पायीवारीत घुसले; विद्यार्थ्याचा मृत्यू

**खामगाव :** तालुक्यातील संभापूर ते लासुरा दरम्यान श्री संत नगरी शेगावकडे जाणाऱ्या वारीत अज्ञात वाहन घुसल्याने घडलेल्या अपघातात १७ वर्षाचा भाविक विद्यार्थी हर्षल गजानन फाडके रा. बाहाळा बु. ता. पातुर जि. अकोला याचा दुदैवी मृत्यू झाल्याची घटना काल रात्री १२.३० वाजताच्या सुमारास घडली. हर्षल हा आबेटाकळी येथे इयत्ता दहावीमध्ये शिकत होता. त्याच्यासोबत असलेले वारीतील सहकारी शंकर अशोक ठाकरे व धनंजय शिवनारायण सिरसाट दोघे रा. वाहाळा बु. यांना गंभीर दुखापत झाली आहे. दोघांवर अकोला येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. रामनवमीनिमित्त निघालेल्या वारीत अज्ञात ट्रक घुसला व अपघात करुन घटनास्थळावरुन पळून गेला. खामगाव ग्रामीण पोलिसांनी उमेश संजय फरकाळे याच्या फिर्यादवरुन आज २६ मार्च रोजी अज्ञात पिकअप वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास पोहेकों गणेश जाधव हे करीत आहेत.

### ओळखीचा फायदा घेत अत्याचार; अल्पवयीन मुलगी गर्भवती

**बुलडाणा :** शहरातील १६ वर्षीय मुलगी, १० व्या वर्गात शिक्षण घेत आहे, तिचा परिचय भीम नगर भागातील आदर्श नरवाडे (वय १९ वर्षे) याच्याशी बालपणापासून होता. याच ओळखीचा फायदा घेत आदर्शने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. गेल्या वर्षी १३ नोव्हेंबर २०२५ रोजी, आरोपीने पीडितेची भेट घेऊन तिला एका निर्जन घरात नेले आणि तिच्या इच्छेविरुद्ध तिच्यावर बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. कोवळ्या वयातील त्या मुलीला या संकटाची भीषणता उमजली नाही, मात्र जेव्हा तिला उलट्यांचा त्रास सुरू झाला आणि प्रकृती खालावली, तेव्हा तिला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले आणि एकच खळबळ उडाली. पीडितेच्या तक्रारीवरून बुलडाणा शहर पोलिसांनी तत्काळ पावले उचलली आहेत. आरोपी आदर्श नरवाडे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला

# डिझेल-पेट्रोलसाठी झुंबड; काही पेट्रोल पंप 'ड्राय'

## अफवांमुळे अवघ्या सहा तासांत हजारो लिटर इंधन विक्री

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि. २६ :** आखाती देशांतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधनटंचाईची शक्यता वर्तवली जात असल्याने खामगाव तालुक्यात अचानक भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या अफवांचा परिणाम स्थानिक पातळीवरही दिसून आला असून आंबेटाकळी येथील पेट्रोल पंपावर मंगळवारी शेतकरी व वाहनधारकांची मोठी गर्दी उसळली. पेट्रोल-डिझेल मिळणार नाही या भीतीने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात इंधन भरण्यासाठी धाव घेतली आणि एकच झुंबड उडाली.

अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यातील वाढत्याा तणावामुळे जागतिक स्तरावर इंधन पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर खामगाव तालुक्यात इंधन टंचाई निर्माण होणार असल्याच्या अफवा वेगाने पसरल्या. या अफवांमुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली आणि अनेकांनी गरजेपेक्षा जास्त इंधन साठवण्याचा प्रयत्न केला. आंबेटाकळी येथील पेट्रोल पंपावर सकाळपासूनच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्याा. दुचाकी, चारचाकी तसेच शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या ट्रॅक्टर आणि इतर वाहनांची मोठी गर्दी झाली होती. काही ठिकाणी किरकोळ वादही झाल्याचे समोर आले. नागरिकांना




तासन्तास रांगेत थांबावे लागले, तर अनेकांना इंधन न मिळताच परतावे लागले. या अनपेक्षित वाढलेल्या मागणीमुळे अवघ्या सहा तासांत सुमारे १५ हजार लिटर इंधनाची विक्री झाली. परिणामी, संबंधित पेट्रोल पंप पूर्णपणे 'ड्राय' झाला. इतक्या कमी वेळेत इतकी मोठी विक्री होणे ही अपवादात्मक घटना मानली जात असून यामुळे इंधन साठ्याच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, शेतकरी वर्गात विशेष चिंता व्यक्त केली जात आहे. सध्या शेतीच्या विविध कामांसाठी डिझेलची मोठ्या प्रमाणात गरज असते. अशा परिस्थितीत डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्यास शेती कामांवर थेट परिणाम होऊ शकतो, अशी भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. पेट्रोल पंप चालकांनी मात्र नागरिकांना दिलासा देत लवकरच इंधन पुरवठा सुरळीत होईल, असा विश्वास व्यक्त केला आहे. तसेच प्रशासनाकडूनही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तथापि, सध्याच्या परिस्थितीमुळे ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून इंधन टंचाईचा प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी वाहनधारक व शेतकरी वर्गाकडून जोर धरत आहे.

# आशियाई लेक्रॉस स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या भारतीय संघाचा केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडून सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२६ :** सौदी अरेबियातील रियाध येथे संपन्न झालेल्या आशियाई लेक्रॉस स्पर्धेत अजिंक्यपद मिळवून देशाचा तिरंगा फडकवणाऱ्या भारतीय संघाचा आज केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गौरव केला. नवी दिल्ली येथील त्यांच्या शासकीय निवासस्थानी हा सत्कार सोहळा पार पडला.

भारताची ऐतिहासिक कामगिरी सौदी अरेबियातील रियाध येथे १ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान आशियाई लेक्रॉस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने इराकविरुद्ध ९-२ अशा मोठ्या फरकाने विजय मिळवत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या संघात देशभरातील १८ गुणवंत



खेळाडूंचा समावेश होता. विजेत्या संघाला आपल्या दिल्ली येथील निवासस्थानी आमंत्रित करून प्रतापराव जाधव यांनी सर्व खेळाडूंशी जिव्हाळ्याने संवाद साधला.

यावेळी त्यांनी खेळाडूंच्या मेहनतीचे आणि जिद्दीचे कौतुक केले. याप्रसंगी बोलताना प्रतापराव जाधव म्हणाले की, आज भारत देश सर्वच क्षेत्रांत जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहे. खेळ क्षेत्रात तुम्ही केलेली ही कामगिरी भारतीयांसाठी अत्यंत अभिमानास्पद आणि बहुमोलाची आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे नाव रोशन करणाऱ्या तुमच्यासारख्या खेळाडूंमुळेच भारताची मान उंचावते. केंद्रीय मंत्र्यांनी यावेळी संपूर्ण संघाचे अभिनंदन करून त्यांना भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुवर्णपदक विजेत्या या संघात विविध राज्यांतील खेळाडूंचा समावेश असून, त्यांच्या या यशाबद्दल देशभरातून कौतुक होत आहे.

# दिल्लीत टीबी विरोधी राष्ट्रीय कार्यशाळेत बुलडाण्याचा सुमित वाकोडे चमकणार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लाखनवाडा दि.२६ :** इंडिया आणि 'फास्ट ट्रॅक द क्युअर बाय टीबी अलायन्स' यांच्या संयुक्त विद्यमाने २७ व २८ मार्च २०२६ रोजी नवी दिल्ली येथे युवकांसाठी ''भारतातील टीबी आणि औषध-प्रतिरोधक टीबी (-) ला जलद प्रतिसाद देण्यासाठी युवा नेत्यांना सक्षम करणे'' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या महत्वपूर्ण कार्यशाळेत बुलढाणा जिल्ह्यातून ग्रीन योद्धा जिल्हा युवा पुरस्काराने सन्मानित तसेच पर्यावरण संवर्धन क्षेत्रात कार्यरत 'माय भारत' समन्वयक सुमित वाकोडे यांची निवड झाली असून ते या कार्यशाळेत सक्रिय सहभाग नोंदवणार आहेत.



सुमित वाकोडे यांनी यापूर्वीही भारत सरकारच्या विविध सामाजिक व युवकविषयक कार्यक्रमांमध्ये उल्लेखनीय सहभाग नोंदवला असून त्यांच्या कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली जात आहे. या कार्यशाळेमध्ये देशभरातील युवा नेत्यांना एकत्र आणून टीबी आणि विशेषतः औषध-प्रतिरोधक टीबी (-) विरुद्ध प्रभावी उपाययोजना, जनजागृती आणि नेतृत्व विकासावर मार्गदर्शन केले जाणार आहे.

# मेहकर तालुक्यात पेट्रोल पंपावर लांबच लांब रांगा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.२६ :** जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम आता ग्रामीण भागातही जाणवू लागला असून मेहकर तालुक्यातील पेट्रोल पंपांवर नागरिकांची मोठी गर्दी उसळलेली दिसून येत आहे.

पेट्रोल भरण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केल्याने अनेक ठिकाणी लांबच लांब रांगा लागल्या आहेत. अचानक निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे पेट्रोलचा तुटवडा भासेल या भीतीने वाहनधारकांनी पेट्रोल पंपांकडे धाव घेतली आहे. त्यामुळे सकाळपासूनच दुचाकी व चारचाकी वाहनांच्या रांगा किलोमीटरपर्यंत वाढलेल्या दिसत आहेत. काही ठिकाणी नागरिकांमध्ये किरकोळ वादविवाद झाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. दरम्यान, संबंधित प्रशासनाकडून नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करण्यात येत असून पेट्रोलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात आहे. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून नागरिक मोठ्या प्रमाणावर इंधन साठवण्याचा प्रयत करत असल्याचे चित्र आहे.



पेट्रोल पंप चालकांनाही वाढत्याा गर्दीमुळे व्यवस्थापन करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी काही ठिकाणी पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला आहे. नागरिकांनी घाबरून न जाता शांतता राखावी व आवश्यक तेवढेच इंधन भरून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शेतकरी संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी विठ्ठल वानखडे तर सचिवपदी विजय बडे यांची निवड



**नांदुरा दि.२६ :** शेतकरी संघटना ( शरद जोशी प्रणित) ची तालुका कार्यकारिणी जिल्हा अध्यक्ष दामोदर शर्मा यांनी जाहिर केली. यामध्ये तालुका अध्यक्षपदी विठ्ठल वानखडे तर सचिवपदी विजय बडे यांची निवड करण्यात आली. इतर कार्यकारणीत उपाध्यक्ष मोहन रोहनकर, संघटक सुरेश सपकाळ, युवा अध्यक्ष प्रकाश बाबाराव देशमुख, युवा उपाध्यक्ष मोहम्मद परवेज मोहम्मद अजीज युवा सचिव राजू हिवराळे, युवा संघटक विष्णू हागे, अल्पसंख्यांक अध्यक्ष अब्दुलन्याय अब्दुल मजीद, उपाध्यक्ष सलीम खान इलियास खान ,सचिव शेख जाहीर, संघटक मोहम्मद परवेज शेख जाकीर इत्यादींचा समावेश आहे. ह्यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष दामोदर शर्मा, रंजीत डोसे, बाबुराव पाटील सुनील करांगळे, नंदू बारस्कर, विकास शास्त्री, भाऊराव काकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# सिद्धिविनायक कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप जागरूकता कार्यक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२६ :** वसुंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अंतर्गत सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगाव येथे दिनांक २६ मार्च २०२५ रोजी ''प्रचलित तंत्रज्ञानाविषयी जागरूकता आणि आयटीआर (इंटर्नशिप) ची मूलभूत माहिती'' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी जळगाव येथील पॅशन सॉफ्टवेअर सोल्यूशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.मनोज कुमावत यांना प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सदर व्याख्यानामध्ये अभियांत्रिकी पदविका द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना आधुनिक



तंत्रज्ञानातील नव्या घडामोडी तसेच आयटीआर (इंटर्नशिप) संदर्भातील मूलभूत माहिती देण्यात आली आहे. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील अद्ययावत ज्ञान मिळवून देणे व त्यांना इंटर्नशिपचा प्राथमिक समज निर्माण करून देणे हा आहे. मान्यवरांचा अनुभव व मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ होईल अशी अपेक्षा संस्थेचे अध्यक्ष मा.सागर दादा फुंडकर यांनी व्यक्त केली आहे.सदर कार्यक्रम महाविद्यालया मध्ये घेणाकरिता तसेच विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष आकाशदादा फुंडकर कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच अकोला जिल्हा पालकमंत्री यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत जी. कुलकर्णी , तंत्रनिकेतन विभागाच्या प्राचार्या प्रा.प्रीती चोपडे, तंत्रनिकेतनचे अधिष्ठाता प्रा.एस.व्ही. इंगळे, अभियांत्रिकीचे अधिष्ठाता डॉ. डी .जी. वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्यावतीने ज्योती पाटोळे व कोटकर सन्मानित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव राजा दि.२६:** तालुका सेवा निवृत्त कर्मचारी संघटना , सहकार महर्षी भास्करराव शिंगणे सार्वजनिक वाचनालय देऊळगाव राजा, जनसेवा सामाजिक संघटना, व जेष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने पोलिस दलात नुकतीच निवड झालेल्या पिंपळनेर येथील कुमारी ज्योती शेषराव पाटोळे तसेच पत्रकार मुशिरखान कोटकर यांना राज्यस्तरीय पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल विरंगुळा भवन येथे भावपूर्ण सत्कार करण्यात आला.




यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष बळीराम मापारी तर प्रमुख पाहुणे म्हणून के.पी.खांडेभराड, विनायकराव कुळकर्णी, गोविंदराव अहिरे होते, प्रमुख पाहुणे तसेच शांतिलाल निरफळे, प्रा.विजयकुमार रायमल यांनी सत्कारमूर्ती च्या कार्याचा गौरव केला, व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगीप्रा.अशोक डोईफोडे, घनश्याम भंडारे, बाबुलाल शिवरकर, अरुण सपाटे, प्रकाश दत्तवाल, विठ्ठल पाटोळे, लक्ष्मण हिवराळे. तथा इतर उपस्थित होते. संचलन प्रकाश अहिरे तर आभार प्रदर्शन सचिव गोविंद बोरकर यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.सदर कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. तर यावेळी संस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थि होते.

**उत्सव** श्रीराम जन्मोत्सव उत्साहात एकूण ९५२ भजनी दिंड्यांचा सहभाग

# श्री गजानन महाराज संस्थानचा श्रीरामनवमी उत्सव भक्तिभावात संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२६ :** श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव यांच्या वतीने आयोजित १३२ वा श्रीरामनवमी उत्सव दि. १९ मार्च ते २६ मार्च २०२६ या कालावधीत पारंपरिक धार्मिक विधी व भक्तिभावात संपन्न झाला.

उत्सवादरम्यान दररोज सकाळी ६.०० ते ६.४५ काकडा, ७.१५ ते ९.१५ गाथा भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.१५ ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० श्रीहरी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहात विविध मान्यवर कीर्तनकारांनी रामजन्मोत्सवाच्या निमित्ताने प्रभावी कीर्तन सादर केले. तसेच श्री अध्यात्म रामायण स्वाहाकाराचा प्रारंभ चैत्र शुद्ध ५ रोजी होऊन चैत्र शुद्ध ९ रोजी सकाळी १० वाजता



यागाची पूर्णाहुती करण्यात आली. दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सवाचे श्रीहरी कीर्तन पार पडले. नामस्मरण, टाळ-मृदंग, नगारे व मंगलवाद्यांच्या गजरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. यावर्षी उत्सवात एकूण ९५२ भजनी दिंड्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी नियम पूर्ण केलेल्या ११९ नवीन दिंड्यांना टाळ, वीणा, मृदंग तसेच संत वाङ्मयश्री ज्ञानेश्वरी, श्री तुकाराम गाथा, श्री एकनाथी भागवतआणि माऊली पताका वितरीत करण्यात आली. जुन्या दिंड्यांना भजनी साहित्य दुरुस्तीसाठी सानुग्रह मदत देण्यात आली. उत्सवासाठी आलेल्या वारकऱ्यांसाठी विसावा संकुल येथे भोजनप्रसाद व प्रथमोपचार केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच शेगाव सह पंढरपूर, आळंदी, त्र्यंबकेश्वर, ओंकारेश्वर आदी शाखांमध्येही श्रीरामनवमी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. एकूण १,३०,००० हून अधिक भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. श्रींच्या कृपेने वारकरी व भाविकांची सेवा करण्याची संधी लाभल्याची माहिती संस्थानतर्फे देण्यात आली.

# टीईटी उत्तीर्ण शिक्षकांची तात्पुरती ज्येष्ठता यादी प्रसिद्ध; आज विशेष कार्यशाळेचे आयोजन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२६ :** वसुंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या अंतर्गत सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगाव येथे दिनांक २६ मार्च २०२५ रोजी ''प्रचलित तंत्रज्ञानाविषयी जागरूकता आणि आयटीआर (इंटर्नशिप) ची मूलभूत माहिती'' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी जळगावयेथीलपॅशनसॉफ्टवेअर सोल्यूशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.मनोज कुमावत यांना प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. सदर व्याख्यानामध्ये अभियांत्रिकी पदविका द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानातील नव्या घडामोडी तसेच आयटीआर (इंटर्नशिप) संदर्भातील मूलभूत माहिती देण्यात आली आहे . या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील अद्ययावत ज्ञान मिळवून देणे व त्यांना इंटर्नशिपचा प्राथमिक समज निर्माण करून देणे हा आहे. मान्यवरांचा अनुभव व मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ होईल अशी अपेक्षा संस्थेचे अध्यक्ष मा.सागर दादा फुंडकर यांनी व्यक्त केली आहे. सदर कार्यक्रम महाविद्यालया मध्ये घेणाकरिता तसेच विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष आकाशदादा फुंडकर कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच अकोला जिल्हा पालकमंत्री यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत जी. कुलकर्णी, तंत्रनिकेतन विभागाच्या प्राचार्या प्रा.प्रीती चोपडे, तंत्रनिकेतन चे अधिष्ठाता प्रा.एस. व्ही.इंगळे, अभियांत्रिकीचे अधिष्ठाता डॉ. डी.जी. वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रावणी बोंडफळे या विद्यार्थिनी ने केले आणि आभार प्रदर्शन प्रा.प्रिती मार्के यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वीतेकरिता ट्रैनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी प्रा.संदीप गाडेकर, प्रा.श्रीकृष्ण ढोले, प्रा. निखिल निंबाळकर, प्रा. श्याम महारखेडे व इतर प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# जालना जिल्ह्यात दुचाकीस्वारांना दोनशे तर चारचाकींना दोन हजार रुपयांच्या पेट्रोलची मर्यादा

## गर्दीवर नियंत्रणासाठी प्रशासनाचा आदेश





**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २६ :** जालना जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही समाजमाध्यमांवर पसरलेल्या अफवांमुळे नागरिकांकडून पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होत असून, ठिकठिकाणी लांबच लांब रांगा लागल्या आहेत. त्यामुळे मागणी व पुरवठा यामध्ये तात्पुरता असमतोल निर्माण झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर, सार्वजनिक हित लक्षात घेऊन व इंधनाचा सुरळीत पुरवठा कायम राखण्यासाठी जिल्हा पुरवठा अधिकारी, जालना यांनी जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून तातडीचे निर्बंध लागू केले आहेत.

नवीन आदेशानुसार, दुचाकी वाहनांसाठी जास्तीत जास्त २०० रुपयांपर्यंतच इंधन देण्यात येणार असून, तीनचाकी व चारचाकी वाहनांसाठी ही मर्यादा २००० रुपये निश्चित करण्यात आली आहे. तसेच कॅन, बाटल्या किंवा ड्रममध्ये इंधन देण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

प्रशासनाने नागरिकांना अनावश्यक गर्दी टाळून केवळ आवश्यकतेनुसारच इंधन घेण्याचे आवाहन केले आहे. रुग्णवाहिका व अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांना प्राधान्याने इंधन पुरवठा करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

याशिवाय, प्रत्येक पेट्रोल पंपावर दररोज उपलब्ध साठा, प्राप्त साठा व मागणी केलेला साठा याची माहिती दर्शनी भागात फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व पेट्रोल पंप चालकांनी या आदेशाचे काटेकोर पालन करणे आवश्यक असून, उल्लंघन करणाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

सदर आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून, पुढील आदेशापर्यंत तो लागू राहणार आहे.






**आज गुरुवारी रोजी रामनवमी निमित्त जालना शहरातील संभाजी उद्यान या ठिकाणाहून रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली कचेरीरोड, शनिमंदिर, गांधी चमन, मुथा बिल्डिंग, पाणीवेस, शिवाजी पुतळा मार्गे श्रीराम मंदिर या ठिकाणी विसर्जित करण्यात आली. या रॅलीत तरुण-तरुणींसह अबालवृद्धांनीही मोठ्या उत्साहात सहभाग घेतला होता. (छायाचित्र : किरण खानापुरे )**

# ऑनलाइन बुकिंग नंतर पंधरा दिवसांची 'वेटींग'

## घरपोच सेवा कोलमडली; एजन्सी धारकांची मनमानी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. २६ :** गेल्या काही दिवसांपासून गॅस टंचाईने हैराण झालेले नागरिक सिलिंडरसाठी गॅस एजन्सीसमोर सकाळी सात वाजेपासूनच रांगा लावताना दिसत आहेत. दुसरीकडे ऑनलाइन गॅस बुकिंग झाल्यानंतर वितरकांकडून घरापर्यंत गॅस घेऊन जाण्यास आढेवेढे घेतले जात आहेत. त्यामुळे नागरिकांना नाईलाजाने उन्हातान्हात भटकंती करावी लागत आहे. एजन्सीकडून बुकिंग केल्यानंतर सिलिंडरचे पेमेंट करून स्वतःच गोदामावरून सिलिंडर घरी घेऊन जावे लागत आहे. अशाही परिस्थितीत काही नागरिक ऑनलाइन गॅस बुकिंग करत असून त्यांना पंधरा दिवसानंतर गॅस सिलिंडर घरपोच मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे बुकिंग झाल्यावर ग्राहकांना ओटीपी आल्यानंतर सिलिंडर वितरकामार्फत घरपोच गॅस येतो. मात्र, शहरातील अनेक भागांत गॅस वितरकांकडून घरपोच सिलिंडर सेवा देण्याऐवजी त्यांना सरळ गोदामावर जाण्याचा सल्ला दिला जात आहे. त्यामुळे ग्राहक मेटाकुटीला आला आहे.

# नावावर शेती करताच मुलांचा पित्याला सांभाळायला नकार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

## मुलांविरुध्द पोलिस ठाण्यात तक्रार

**जालना, दि. २६ :** आयुष्यभर कष्ट करून पोटच्या पाच मुलांसाठी १२ एकर शेती कमावली, म्हातारपणी आधार मिळेल, या आशेने ती मुलांच्या नावावरही केली. मात्र, आता दोन मुलांनी वडिलांनाच वाऱ्यावर सोडून दिले आहे. केवळ सांभाळ करण्यास नकारच दिला नाही, तर उदरनिर्वाहासाठी शेतीचा वाटा मागितला असता, जीवे मारण्याची धमकी दिल्याची धक्कादायक घटना बदनापूर तालुक्यातील सागरवाडी येथे उघडकीस आली. या प्रकरणी ७४ वर्षीय वृद्ध पिता खुशालसिंग गुंडुसिंग खोकड यांनी बदनापूर पोलिस ठाण्यात दोन मुलांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार खुशालसिंग खोकड आणि त्यांची पत्नी कासाबाई हे सागरवाडी शिवारात वास्तव्यास आहेत. त्यांच्या नावावर १२ एकर शेती होती, त्यांनी ही शेती मुले रंजितसिंग, अंजितसिंग, उदयसिंग, पदमसिंग आणि चरणसिंग यांच्या नावावर वाटणी करून दिली होती. या वाटणीच्यावेळी सर्व मुलांनी आई-वडिलाच्या उदरनिर्वाहाची आणि देखभालीची जबाबदारी स्वीकारली होती. खुशालसिंग यांनी दिलेल्या जबाबाप्रमाणे, अजितसिंग, उदयसिंग आणि चरणसिंग हे त्यांचा सांभाळ करत आहेत. मात्र, रंजितसिंग आणि पदमसिंग हे विनाकारण आई-वडिलांना शिवीगाळ करून मानसिक त्रास देत आहेत. पैसे देण्यास या दोन्ही मुलांनी नकार दिला आहे.

# जाफराबाद शहरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट

## पोलिस प्रशासनाची निष्क्रियता चर्चेत

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जाफराबाद, दि. २६ :** जाफराबाद शहर व तालुक्यात अवैध धंद्यांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाल्याचे चित्र समोर येत आहे. सट्टा मटका, अवैध देशी दारू, जुगार अड्डे तसेच इतर बेकायदेशीर व्यवसाय खुलेआम सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील विविध भागांमध्ये सट्टा मटका अड्डे दिवसाढवळ्या चालू असून तरुण पिढी यामध्ये मोठ्या प्रमाणावर ओढली जात आहे. यासोबतच अवैध देशी दारू विक्रीही मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. काही ठिकाणी जुगाराचे अड्डेही बिनधास्तपणे चालत असल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे. विशेष म्हणजे, या सर्व प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या पोलिस प्रशासनाकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी याकडे दुर्लक्ष करत असल्याने अवैध धंदे करणाऱ्यांचे मनोबल वाढले आहे.

नागरिकांनी संबंधित पोलीस अधीक्षकांनी या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेऊन जाफराबाद शहर व तालुक्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा येणाऱ्या काळात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अधिक बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**आरोग्य** बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याचे प्रश्न गंभीर

# बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २६ :** बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे. व्यक्तीचे नियमित जीवन मोठ्या प्रमाणात बदलून गेले आहे. समाजातील एकूणच सामाजिक गुंतागुंत आणि आरोग्याचे प्रश्न क्लिष्ट झाले आहेत. स्पर्धात्मक वाटचालीत मानसिक स्वास्थ्य आपण हरवून बसलो आहे. प्रत्येक व्यक्तीला काही ना काही तरी आजाराने ग्रासलेले दिसून येते त्यातून तो बाहेर पडण्याचा प्रयत्न करताना दिसून येतो. असे असले तरी परिस्थितीनुसार आपण आपल्या जीवनशैलीत बदल करणे गरजेचे आहे. जीवनशैलीतील बदलामुळे अनेक आजार निर्माण होत आहेत. आपल्या शरीराची मेटॅबोलिक डिसऑर्डर वाढली की, विविध आजार डोके वर काढतात. आरोग्य संपन्न राहण्यासाठी आपण स्वतः कडे अधिकाधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपली रोगप्रतिकारक क्षमता वाढली पाहिजे. आपल्या सवयी निकोप आणि शिस्तशीर असल्या पाहिजे. सुदृढ आरोग्याबद्दलची जागृती वाढली पाहिजे. असे प्रतिपादन सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र गाडेकर यांनी केले.

बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात आज अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन कक्षाद्वारे, आरोग्य समिती व जिल्हा सामान्य रुग्णालय जालना यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे, माजी प्राचार्य डॉ. कविता प्राशर, डॉ. कल्याण कुंभार, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे डॉक्टर्स व नर्स यांची टीम उपस्थित होती.

हेल्थ व फिटनेस कोच डॉ. सुरेखा गाडेकर म्हणाल्या की, आरोग्य संपन्न जीवन जगण्यासाठी विविध प्रकारचे व्यायाम, योग, झुंबा, चालणे अशा प्रकारचे वर्कआउट करणे गरजेचे आहे. संतुलित आहाराला आपण महत्व देणे गरजेचे आहे. विविध प्रकारची कडधान्य आणि पालेभाज्या यांचा समावेश आपल्या आहारात असायला हवा. स्वतःला आनंदी बनविण्यासाठी आपला माईंड सेट बदलला पाहिजे. कुटुंबातील प्रेम आणि परस्पर संबंध सुदृढ बनविण्याकडे लक्ष दिले पाहिजे.

या शिबिरात उच्च रक्तदाब, रक्तातील साखरेची पातळी, सीबीसी, लिपिड प्रोफाइल, विटामिन बी १२, विटामिन डी ३, एचबीएवनसी अशा विविध प्रकारच्या चाचण्या करण्यात आल्या. याप्रसंगी बारवाले महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागाचे माजी विद्यार्थी श्री. अश्विन भास्करराव आंबेकर याची जालना महानगरपालिका स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या महाविद्यालयातील संस्कारामुळे माझी जडणघडण खऱ्या अर्थाने झाली असून येथील शिस्तप्रिय आणि शैक्षणिक वातावरण हे विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभर मार्गदर्शन करणारे आहे असे ते म्हणाले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आरोग्य समितीचे प्रा. डॉ. पवन देशमुख, प्रा. डॉ. स्वाती पुरी, प्रा. वर्षा वानखेडे यांनी प्रयत्न केले. यावेळी प्रा. संतोष इप्पर, प्रा. राहुल वाकडे, प्रा. शेख आफरीन, श्री. सुरेश खरात, श्री. नरेंद्र देशमुख, श्री. विनोद पवार, श्री. काशिनाथ खलसे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुधीर देशपांडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ.पवन देशमुख यांनी मानले.

# चक्रवर्ती सम्राट अशोक जयंती साजरी



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २६ :** जालना शहरातील मस्तगड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे चक्रवर्ती सम्राट अशोक यांची २३३० वी जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर राजा सम्राट अशोक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा राज्यसंस्कार प्रमुख दादाराव लहाने, राज्यसदस्य छायाताई हिवाळे, मराठवाडा विभागीय महासचिव भास्कर घेवंदे, जालना जिल्हाध्यक्ष संजय हेरकर, महासचिव राजकुमार दांडगे, कोषाध्यक्ष सतिश वाहुळे, संघटक कांताबाई रत्नपारखे, राजेंद्र पवार, संस्कारप्रमुख लक्ष्मीबाई काकडे यांची उपस्थिती होती.

## महत्त्वाचे

### एक एप्रिलपासून स्वस्त धान्य दुकानदार जाणार संपावर

**जालना :** राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांना शासनाकडून मिळणारे मार्जिन कमिशन वेळेत न मिळाल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ३१ मार्चपर्यंत थकीत रक्कम अदा न झाल्यास १ एप्रिलपासून राज्यव्यापी संपावर जाण्याचा इशारा स्वस्त धान्य दुकानदार संघटनांनी दिला आहे.

महाराष्ट्रातील स्वस्त धान्य दुकानदार हे प्रतिक्विंटल १७० रुपये मार्जिन कमिशनवर लाभार्थ्यांना मोफत धान्य वितरणाचे काम करतात. मात्र, हे कमिशन दरमहा न मिळाल्याने दुकानदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, ऑक्टोबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीतील मार्जिन कमिशन अद्यापही थकीत आहे. अनेकवेळा पाठपुरावा करूनही शासनाकडून रक्कम अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे राज्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या संघटना, फेडरेशन व महासंघ यांनी एकत्र येत ३१ मार्चपर्यंत थकीत कमिशन न मिळाल्यास १ एप्रिलपासून संपावर जाण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे. संपादरम्यान धान्य वितरण पूर्णतः बंद ठेवणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे. या संपात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष जगन्नाथ थोटे यांनी केले आहे.

### ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत कारवाई

**जालना :** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील रेल्वे सुरक्षा बलाने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी राबविण्यात येणाऱ्या ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत विविध ठिकाणी यशस्वी कारवाया करून पुन्हा एकदा आपली तत्परता सिद्ध केली आहे. पहिल्या घटनेत, दिनांक २५.०३.२०२६ रोजी सुमारे १२:३० वाजता परभणी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर कार्यालयाजवळ प्रवाशांच्या सामान चोरी प्रकरणांवर देखरेख करत असताना सहाय्यक उपनिरीक्षक अमोल वावळे यांनी एका संशयित व्यक्तीला प्रवाशांचे सामान चोरण्याचा प्रयत्न करताना पाहिले. तत्काळ कारवाई करत त्या व्यक्तीस पकडण्यात आले. सदर आरोपीचे नाव अजय असून तो मध्य प्रदेशातील बुरहानपूर जिल्ह्याचा रहिवासी आहे. यानंतर आरोपीस शासकीय रेल्वे पोलिस, परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले असून त्याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ६७/२०२६ अन्वये महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ११० व ११७ अंतर्गत दिनांक २५.०३.२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या घटनेत, त्याच दिवशी हनुमान मीणा, तसेच कॉन्स्टेबल/ आर. के. मीणा आणि के. के. मीणा हे ट्रेन क्रमांक १७२०८ एक्सप्रेसमध्ये छत्रपती संभाजीनगर लासूर दरम्यान नियमित गस्त घालत असताना, -०८ डब्याच्या दरवाजाजवळ एक संशयित व्यक्ती आढळून आला.

### आज रोजगार मेळाव्याचे आयोजन

**जालना :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि हुतात्मा जनार्दनमामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरी इच्छुक महिला व पुरुष उमेदवारांनी

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, शुक्रवार, २७ मार्च २०२६

## थोडक्यात

### युवकावर चाकूने प्राणघातक हल्ला

अमरावती : थंड पेय पिण्यासाठी दुकानात आलेल्या चार परिचित युवकांनी मोबाईलवर स्टेटस ठेवण्याच्या कारणावरून फिर्यादी किशन जगमोहन दिवाकर (२८, रा. महादेवखोरी) याच्या भावासोबत वाद घालता. सोबतच त्याच्यावर हल्ला करण्याच्या उद्देशाने चाकू काढला. फिर्यादीने तो वार स्वत:वर झेलला. त्यांनी फिर्यादीसह त्याच्या भावाला शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. सोबतच दुकानातील सामानाची तोडफोड देखील केली. ही घटना यशोदा चौकातील सखा मंगलम् कार्यालयाजवळ घडली. फिर्यादीच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### युवकाला तिघांची मारहाण

अमरावती : जुना वाद आपसात मिटवण्याच्या उद्देशाने तिन मित्रांनी युवकाला गुणवंत वाडी येथील हनुमान मंदिराजवळ बोलावले. तो दुचाकीने मित्रासोबत तेथे गेला. मात्र, वाद मिटवण्याऐवजी त्यांच्यावर तिघांनी चाकूने प्राणघातक हल्ला केला. त्यापैकी फिर्यादीची प्रकृती ठिक असून त्याच्या मित्राची तब्येत मात्र गंभीर आहे. नांदगाव पेठ पोलिसांनी तिघांविरुद्ध प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा नोंदवला.

### जुन्या वादातून प्राणघातक हल्ला

अमरावती : संतोषीनगर परिसरातील गार्डन मध्ये २४ मार्च रोजी तीन युवकांवर तिघांनी अचानक हल्ला केला. त्यापैकी दोघे जीव वाचवून पळाले, तर एक गंभीर जखमी झाला. आजच विषय संपव म्हणत तिघांनी हा प्राणघातक हल्ला केला. शोमेश जुगानी विश्वकर्मा (२०, रा. जुना कॉटन मार्केट) याच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला गेला असून, पुढील तपास सुरू आहे.

### दोन अज्ञातांनी हिसकाविला मोबाईल

अमरावती : रात्री जेवण करून नेहमीप्रमाणे फोनवर बोलत प्रथमेश हेमंत जाने (२४, रा. प्रभात कॉलनी, शिलांगण रोड) परिसरात शतपावली करीत होता. तेवढ्यात मागून दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात युवकांनी त्याचा फोन हिसकावून पळ काढला. ही घटना कुशल बजाज गल्ली, शारदा नगर येथे घडली. त्याची अंदाजे किंमत २५ हजार रुपये आहे. राजापेठ पोलिसांनी दोन अज्ञात युवकांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### जीवनाश्यक साहित्याची चोरी

अमरावती : घरी कुणी नसल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घरफोडी करीत ७ हजारांचे संसारोपयोगी साहित्य चोरून नेले. त्यात तीन घरगुती वापराचे गॅस सिलेंडर व पितळी कोटी यांचा समावेश आहे. ही घटना खापर्डे बगिच्यात घडली. अजय लालचंद मिश्रा (३१, रा. सरस्वती नगर) यांनी कोतवाली पोलिसात घटनेबाबत फिर्याद दिली.

### दोन अपघात इसम जखमी

अमरावती : शहरात झालेल्या दोन वेगवेगळया अपघातात दोन दुचाकींचे नुकसान झाले, तर एक जण जखमी झाला. त्यापैकी एक घटना गाडगे नगर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या बियाणी चौकातील एसबीआय बँकेच्या गेटसमोर, तर दुसरी बडनेरा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्यामाळेगाव फाट्याजवळ घडली. याबाबत प्रवण सतीश हरणे (३६, रा. केडिया नगर) यांनी गाडगे नगर, तर जितेश बाबा चव्हाण (३८, रा. भानखेडा खु.) यांनी बडनेरा पोलिसात तक्रार दिली.

# 'क्युआरटी' जवानाची स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या!

## पोलीस आयुक्तालयात गोळीबारचा थरार | आत्महत्येचे कारण अस्पष्ट

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि.२६ :** शहर पोलीस आयुक्तालयाच्या परिसरात गुरुवारी सकाळी एक अत्यंत धक्कादायक घटना घडली. आयुक्तालयात कार्यरत असलेल्या शीघ्र कृती दलाच्या एका जवानाने स्वत:वर गोळी झाडून घेऊन जीवनयात्रा संपवली. विजय नागापुरे असे मृत जवानाचे नाव असून, या घटनेमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी ९.३० च्या सुमारास ही घटना उघडकीस आली. पोलीस आयुक्तालय परिसरातील क्युआरटी कार्यालयातच विजय नागापुरे यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. गोळीबाराचा आवाज होताच परिसरातील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाकडे धाव घेतली, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे यांच्यासह अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. भरदिवसा आणि थेट आयुक्तालयाच्या वास्तूत ही घटना घडल्याने सर्वत्र शांतता पसरली आहे.

कर्तव्यावर असताना विजय नागापुरे यांनी इतका टोकाचा निर्णय नेमका का घेतला, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. वरिष्ठ पोलीस अधिकारी या प्रकरणाचा तपास करत असून, घटनास्थळाचा पंचनामा करण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे पोलीस वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे.

### फोरेन्सिक चमू, श्वान पथक दाखल

पोलिस आयुक्त कार्यालयात गुरूवारी सकाळी क्युआरटी कक्षात विजय नागापुरे स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केली. घटनेची माहिती होताच पोलिस आयुक्त, पोलिस उपायुक्त दाखल झाले. तसेच फोरेन्सिक टीम व श्वान पथकाला सुध्दा पाचारण करण्यात आले. विजय नागपुरे हा २०१४ मध्ये पोलिस खात्यात दाखल झाला होता. आत्महत्येआधी त्याने त्याच्या भावाला फोन केला होता. आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले नसले तरी लवकरच पोलिस कारण शोधणार आहे. तसेच विजय नागापुरे याच्यावर त्याच्या गावात शासकीय पध्दतीने अंत्यसंस्कार केले जाणार असल्याचे पोलिस आयुक्त यांनी सांगितले.

## परतवाड्यात व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२६ :** परतवाडा शहरातील गजबजलेल्या गुजरी बाजार परिसरात मंगळवारी एका माथेफिरूने व्यापाऱ्यावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला केला, ज्यामुळे संपूर्ण व्यापारी वर्गात खळबळ उडाली. या घटनेत राज बुक डेपो चे संचालक खंडेलवाल बंधू आणि त्यांचा एक कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत.

मिळाल ल्या माहितीनुसार, २४ मार्च रोजी मंगळवारी आरोपी हातात लोखंडी रॉड घेऊन राज बुक डेपोमध्ये शिरला आणि दुकानात प्रवेश करताच संचालक खंडेलवाल यांच्यावर सपासप वार करण्यास सुरुवात केली. मध्ये आलेल्या कर्मचाऱ्यावरही त्याने हल्ला केला. सुमारे १५ मिनिटे आरोपीने दुकानात धुडगूस घालून साहित्याची तोडफोड केली. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात मोठी दहशत निर्माण झाली. जखमींवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचा निषेध करण्यासाठी अचलपुर तहसील ऑल ट्रेडर्स असोसिएशन आणि स्थानिक व्यापारी संघटना रात्रीच परतवाडा पोलीस ठाण्यात एकत्र जमल्या. व्यापाऱ्यांनी आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आणि बाजार परिसरात सुरक्षेचे उपाय वाढवण्याची मागणी केली. अजय अग्रवाल, अध्यक्ष, व्यापारी असोसिएशन, परतवाडा म्हणाले, भरदिवसा दुकानात घुसून व्यापाऱ्यांवर हल्ला होणे ही गंभीर बाब आहे. आम्ही या घटनेचा तीव्र निषेध करतो.

## चोरीची दुचाकी विकताना आरोपी अटकेत

### गुन्हे शाखा पोलिसांची कारवाई

अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**अमरावती, दि.२६ :** चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी निर्धास्तपणे निघालेल्या तरुणाचा प्लॅन गुन्हे शाखेने अक्षरश: उधळून लावला. पोलिसांनी गुप्त माहितीवरून चलेल्या सापळयात आरोपीला रंगेहात ताब्यात घेण्यात आले. सुफीयान युसुफअली शाहा (वय २४, रा. साबनपुरा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून दुचाकी जप्त करण्यात आली आहे. शहरात वाढत्या दुचाकी चोरींना लगाम घालण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशावरून गुन्हे शाखा ॲक्शन मोडमध्ये आली आहे. त्याच मोहिमेअंतर्गत गाडगे नगर पोलीस ठाण्यातील एका चोरीच्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना २५ मार्च रोजी मोठी माहिती पोलिसांच्या हाती लागली. एक इसम चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी बस डेपोकडून सुंदरलाल चौकाच्या दिशेने निघाल्याची खबर मिळताच गुन्हे शाखेने पोलीस मुख्यालय मैदानासमोर सापळा रचला. काही वेळातच संशयित तेथे येताच पोलिसांनी झडप घालत त्याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपले नाव मोहम्मद सुफीयान युसुफ अली शाहा (वय २४, रा. साबनपुरा) असे सांगितले. त्याच्याकडील एमएच २७ एक्यू ९०५२ क्रमांकाची दुचाकी चोरीची असल्याचे स्पष्ट झाले. पुढील चौकशीत त्याने पंचवटी चौक येथील पी.डी.एम.सी. हॉस्पिटलसमोरून सुमारे २० दिवसांपूर्वी ही गाडी लंपास केल्याची कबुली दिली. पोलिसांनी तात्काळ सुमारे २० हजार रुपये किंमतीची मोटारसायकल जप्त करत आरोपीला गाडगे नगर पोलिसांच्या ताब्यात दिले. सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि अमोल कडु, पोलीस अंमलदार-पोहेकॉ संभाजी केन्दे, गजानन ढेवले, नापोका विकास गुडधे, नाझीमोदीन सैयद, पोका सागर ठाकरे, निखिल गेडाम, योगेश पवार यांनी केली.

## गुन्हे शाखेत काम करण्यास पोलिस निरीक्षक चव्हाण अपात्र

■ आ.संजय खोडके यांचा विधानसभेत हल्लाबोल ■ पोलीस महासंचालकांच्या मार्गदर्शक सुचना

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि.२६ :** राज्यात पोलीस विभागाची कामगिरी सुधारत असून गुन्हेगारीला पायबंद घालण्यासाठी गृहविभागाचे चांगल्या पद्धतीने काम सुरु आहे. त्यादृष्टीने अमरावती शहर पोलीस विभाग हा आयुक्तालय दर्जाचे असूनही येथील वरिष्ठ पोलीस अधिकारी हे एम.डी ड्रग्स विरोधी व अंमली पदार्थ विक्री संदर्भात कारवाई करण्याबाबत हतबल दिसून येत आहे. एकट्या गुन्हे शाखेला कारवाई करण्याचे अधिकार दिले असल्याने याबाबत सारशंका उपस्थित होत आहे. गुन्हे शाखेने पीआय संदीप चव्हाण हे गुन्हे शाखेत पीआय म्हणून काम करण्यासाठी पोलीस महासंचालकांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोणत्याही पात्रतेत बसत नसून ते तात्पुरते पीआय असल्याने त्यांच्या कामकाजावर सारशंका उपस्थित करून आ.संजय खोडके यांनी अमरावतीच्या गुन्हे शाखेचे पीआय चव्हाण यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी विधान परिषदेतून केली आहे.

आज बुधवार दिनांक २५ मार्च रोजी राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधान परिषदेमध्ये अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावतीच्या कायदा व सुवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने सभागृहात महत्वाचे मुद्दे उपस्थित करतांना अमरावती शहरात अंमली पदार्थ विक्रीचे प्रमाण वाढत असल्याने अमरावती शहर हे एम.डी. तस्करीचे हब बनत असल्याबाबत चिंता व्यक्त केली. या संदर्भात मागील आठवड्यात अधिवेशनात मुद्दा उपस्थित केल्या नंतर दोन दिवसांनी गुन्हे शाखेच्या वतीने धाडी टाकून कारवाई करण्यात आली. तो पर्यंत कोणतीही कारवाई झाली नसून आता सर्व कार्यवाया गुन्हे शाखेच्या वतीने करण्यात आल्या. ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये एम. डी.ड्रग्स सारखे अंमली पदार्थ आढळून आले आहेत . तिथे गुन्हे शाखेच्या वतीने धाडी टाकून कारवाही केली. मात्र संबधित पोलीस स्टेशन चे अधिकारी व आयुक्तालयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी याबाबत कारवाईला घेऊन हतबल असल्याबाबत आ.संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले.

त्यांनी गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या कामकाजावर देखील सारशंका व्यक्त करून ते तात्पुरते पोलीस निरीक्षक असल्याचे सांगितले. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक म्हणून काम करण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या काही मार्गदर्शक सुचना आहेत, सर्वप्रथम सदर अधिकारी बी प्लस वर्गवारीतील असावा , व किमान दोन पोलीस स्टेशनमध्ये त्यांनी पोलीस निरीक्षक म्हणून काम केल्याचा अनुभव महत्वाचा आहे. त्यांच्या विरोधात कुठलीही चौकशी चालू नसावी तसेच गुन्हा दाखल नसावा. अशी व्यक्ती गुन्हे शाखेत पोलीस निरीक्षक म्हणून काम करण्यासाठी पात्र ठरत असते. मात्र अमरावती शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण हे या पात्रतेत बसत नसून त्यांना ६ महिने कैद झाली असून अँटी करप्शनच्या जाळयात सुद्धा ते अडकले होते. अशा वादग्रस्त व्यक्तीला अमरावती मध्ये पदोन्नतीवर गुन्हे शाखेत तात्पुरते पोलीस निरीक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. संदीप चव्हाण गुन्हे शाखेत पीआय म्हणून काम करण्यास अपात्र असून त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी आ. संजय खोडके यांनी अधिवेशनातून केली आहे. अधिवेशनात कायदा व सुव्यवस्था संदर्भात बोलत असतांना ते म्हणाले कि, गेल्या पाच वर्षांमध्ये महाराष्ट्र राज्यात गुन्हेगारीचा आलेख कमी झाला आहे.

## अपघातात चिमुकलीचा मृत्यू

**अमरावती, दि.२६ :** मुलीच्या शैक्षणिक यशाचा आनंद साजरा करून घरी परतणाऱ्या कुटुंबावर काळाने घाला घातला. देवगाव चौफुली येथे झालेल्या भीषण अपघातात पोलीस उपनिरीक्षक राहुल वानखेडे यांच्या १० वर्षीय मुलगी त्रिशाचा मृत्यू झाला, तर वानखेडे दाम्पत्य गंभीर जखमी झाले आहे.माहितीनुसार, तळेगाव दशसर येथे कार्यरत असलेले पीएसआय राहुल वानखेडे हे पत्नी व मुलीसह मंदिरातून परतत होते. मुलीने शाळेत प्रथम क्रमांक मिळवल्याचा आनंद साजराकरण्यासाठी त्यांनी मिठाई वाटली होती. त्यानंतर देवगाव चौफुली मार्गावर इंधन भरून पुढे जात असताना धामणगावकडून भरधाव वेगात येणाऱ्याएमएच-२० टी ५८५७ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की, चारचाकीचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली.

## कार-ट्रक अपघातात युवक ठार, एक गंभीर

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२६ :** राष्ट्रीय महामार्गावरील मोझरी बायपास टर्निंगवर रात्री उभ्या असलेल्या ट्रकला स्विफ्ट डिझायरला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात शेख मुजम्मिल ३४ रा. नागपूर चा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दुसरा प्रवासी गंभीर जखमी झाला असून त्यांच्यावर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, स्विफ्ट डिझायर कार (क्रमांक एमएच ०५ बीजे १६९६) नागपूरकडून अमरावतीच्या दिशेने येत होती. कार चालक आणि मालक उमेश हरिकिशन यादगिरे (का ३५, पार्वती नगर, अकोली रोड, अमरावती) यांनी स्वी नगर परिसरातून दौन प्रवासी गाडीत बसवले होते. २४ मार्चच्या मध्यरात्री सुमारे २.३० ते ३.०० बजताच्या दरुम्यान, वालकाला झोपेची डुलकी लागल्यामुळे त्याचे

बाहुन नियंत्रणाबाहेर गेले आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला काने जोरदार धड़क दिली. अपघाताची माहिती मिळताच तिक्सा आणि मोझरी पोलीस स्टेशनचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी नॅशनल हायवे रुग्णवाहिकेने जखमींना अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवले. या अपघातात कारमधील शेख मुजम्मिल चा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर नरेंद्र सिंग (वय ५०, रा. अमृतसर, पंजाब) गंभीर जखमी असून, त्यांच्या अधिक उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हलवण्यात आले. तसेच कार चालक उमेश यादगिरे किरकोळ जखमी झाले आहेत. तपासात समोर आले आहे की, चालकाला प्रवासादरम्यान झोप येत होती; मात्र गाडी थांबवून विश्रांती घेण्याऐवजी प्रवास सुरू ठेवल्याने हा अनर्थ घडला. तिवसा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, अपघाताचा पुढील तपास सुरू आहे.प्रशासनाच्या आवाहनानुसार, महामार्गावर प्रवास करताना थक्या किया झोप येत असल्यास गाडी सुरक्षित ठिकाणी उभी करून विश्रांती घ्यावी, अन्यथा अपधाताचा धोका निर्माण होऊ शकतो.

**समस्या** वैयक्तिक मोबाईल वापरास सक्तीविरोधात शिक्षक समिती आक्रमक

# शिक्षकांवर ऑनलाईन कामाचा वाढता ताण

अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**अमरावती, दि.२६ :** राज्यातील शिक्षकांवर दिवसेंदिवस ऑनलाईन कामाचा ताण वाढत असून, यासाठी वैयक्तिक मोबाईलचा सक्तीने वापर करावा लागत असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने या संदर्भात शासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आंदोलनाचा इशारा दिला आहे.वरीष्ट अधिकारी एसीत बसुन नवनविन उपक्रम राबवत आहे.याचा त्रास मुख्याध्यापक,शिक्षक यांना होत आहे.

निपुण चाचणीपासून सुरू झालेली मोबाईल वापराची सक्ती आता 'स्कॉफ' (स्ष्ट्स्न) माहिती भरण्यापर्यंत वाढली असून, प्रत्येक शिक्षकाला स्वत:च्या मोबाईलमध्ये विविध ॲप डाउनलोड करून त्यावर काम करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेत गुगल ड्राईव्हवर फोटो अपलोड करणे, त्याच्या लिंक तयार करून ॲपमध्ये पेस्ट करणे, तसेच १२८ प्रकारच्या प्रश्नांची माहिती व संबंधित कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात अपलोड करणे अशी अनेक अतिरिक्त कामे शिक्षकांवर टाकण्यात आली आहेत. शिक्षकांनी व्यक्त केलेल्या नाराजीनुसार, वैयक्तिक मोबाईलमध्ये बँकिंग, कौटुंबिक माहिती व खाजगी डेटा साठवलेला असतो. अशा परिस्थितीत शासनाच्या विविध ॲप्सचा वापर करण्याची सक्ती ही गोपनीयतेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. तसेच, ऑनलाईन कामासाठी लागणारा डेटा खर्च, साधनसामुग्री व तांत्रिक सुविधा शासनाकडून उपलब्ध करून दिल्या जात नसल्याची खंत शिक्षकांनी व्यक्त केली आहे.याबाबत राज्य नेते उदय शिंदे राज्याध्यक्ष विजय कोंबे राज्य सरचिटणीस राजन कोरगांवकर, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती यांनी स्पष्ट इशारा देताना सांगितले की, ऑनलाईन कामासाठी आवश्यक सुविधा व साधने उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. शिक्षकांच्या वैयक्तिक मोबाईलवर सक्ती करणे अन्यायकारक असून, ही दादागिरी यापुढे सहन केली जाणार नाही.तसेच, शाळा स्तरावर उपलब्ध असलेले पुरावे प्रत्यक्ष तपासणीद्वारे पडताळता येऊ शकतात, असे असताना सर्व प्रक्रिया ऑनलाईन करण्यामागील उद्देश काय, असा सवालही संघटनेने उपस्थित केला आहे.

शिक्षक समितीने शासनाकडे मागणी केली आहे की, ऑनलाईन कामासाठी स्वतंत्र यंत्रणा, अधिकृत साधने व इंटरनेट सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. अन्यथा, या सक्तीविरोधात राज्यभर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही राज्य शाखेकडून देण्यात आला असल्याचे राज्य प्रसिध्दीप्रमुख राजेश सावरकर यांनी सांगितले आहे.

## नर्सिंग शिकणाऱ्या युवतीची आत्महत्या

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२६ :** नर्सिंगचा अभ्यासक्रम शिकणाऱ्या एका १७ वर्षीय तरुणीने तिच्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवार, २४ मार्च रोजी, गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संत कबीर नगर येथे आईसोबत तिच्या मामाच्या घरी घडली.मृत तरुणीचे नाव सलोनी विजय मोहोड आहे. आठ महिन्यांपूर्वी तिच्या मोठ्या बहिणीनेही आत्महत्या केली होती. असे म्हटले जात आहे की, मोठ्या बहिणीच्या मृत्यूच्या धक्क्यातून सलोनीने आत्महत्या केली.मिळालेल्या माहितीनुसार, सलोनी मोहोडचे वडील विजय मोहोड यांचे यापूर्वीच निधन झाले होते. तिच्या मोठ्या बहिणीने आठ महिन्यांपूर्वी आत्महत्या केली होती. त्यामुळे, सलोनी गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संत कबीर नगर येथे तिच्या मामाच्या घरी आईसोबत राहत होती.ती तिच्या मामासोबत राहून नर्सिंगचा अभ्यासक्रम शिकत होती. मंगळवार, २४ मार्च रोजी, सकाळी सुमारे ११ वाजता, सलोनी मोहोडने तिच्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली.

त्यावेळी तिचे मामा बाहेर गेले होते आणि तिची मावशी घरी कामावर होती. घटनेची माहिती मिळताच, परिसरातील रहिवासी घटनास्थळी जमले. पोलिसांना न कळवता, कुटुंबीयांनी सलोनीचा मृतदेह खाली आणून थेट जिल्हा रुग्णालयात नेला. तिचा मृतदेह पाहिल्यानंतर, तो शवविच्छेदन कक्षात नेण्यात आला. त्यानंतर डॉक्टरांनी गाडगे नगर पोलिसांना एक मेमो पाठवला. बुधवार, २५ मार्च रोजी, जिल्हा रुग्णालयाकडून मेमो मिळाल्यावर गाडगे नगर पोलिसांना धक्का बसला. मृत महिलेबद्दल चौकशी करण्यासाठी पोलीस तात्काळ जिल्हा रुग्णालयात पोहोचले.

## थोडक्यात

### अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

बडनेरा : रेल्वे पोलीस स्टेशन बडनेरा, मर्ग २६ मार्च रोजी दाखल असून यातील मयत एक अनोळखी इसम, व यंदाचे ४५ ते ५० वर्ष, हा बडनेरा नागपूर डाऊन रेल्वे ट्रॅक किलोमीटर नंबर ६६४/१/२ येथे रेल्वे अपघातात मरण पावलेला आहे. त्याच्या अंगात गडद राखाडी रंगाचा टी-शर्ट, क रंगाची लोअर, उंची ५.५ फूट, रंगाने निमगोरा, उजव्या कानामध्ये पिवळ्या रंगाची बाळी, उजव्या हातात स्टीलचे कडे, उजव्या हाताच्या मनगटावर नागेश व मार्कस् असे गोंदलेले अशा वर्णनाची व्यक्ती मयत झालेले असून त्यास कोणी ओळखत असेल तर रेल्वे पोलीस स्टेशन बडनेरा येथे संपर्क करावा.

### काटआमला शेतशिवारातून ॲल्युमिनियम तार लंपास

अमरावती : काट आमला शिवारातील नऊ सिमेंटचे इलेक्ट्रिक पोल पाडून त्यातील २ हजार मीटर ॲल्युमिनियमचा तार अज्ञाताने चोरून नेला. त्याची अंदाजे किंमत ५० हजार रुपये आहे. या संदर्भात महावितरणचे बडनेरा येथील सहाय्यक अभियंता सुदाम गजानन पाकधाने (३४) यांनी बडनेरा पोलिसात अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दिली असून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

### हातगाडी लावणाऱ्यावर गुन्हा दाखल

अमरावती : खाद्य पदार्थाची हातगाडी विक्रेत्याने आमरोडवर लावली. त्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांना अडथळा निर्माण होवून त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला होता. त्याची दखल घेत गाडगे नगर पोलिसांनी रुपेश अनिलराव बोबडे (३४) याच्यावर गुन्हा नोंदवला. ही कारवाई पाठ्यपुस्तक मंडळ परिसरात करण्यात आली.

### अश्लिल शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी

अमरावती : मित्र परिवारासोबत कार्यक्रमाणाठी जाणाऱ्या एकाला दुचाकीवरून आलेल्या दोघांनी अश्लिल शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना ताज नगर मस्जिदजवळ घडली. याबाबत सैय्यद रशिद अली (५६, रा. मौलाना आझाद कॉलनी) यांनी नागपुरी गेट पोलिसात तक्रार दिली असून पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### चांदूर रेल्वेत वृद्धेला मारहाण

चांदूर रेल्वे : शहरातील शिवाजी नगरात आकाश बंडू यादव (३२) याने कारण नसताना शेजारी राहणाऱ्या वृद्धेला शिवीगाळ करीत लोटालोट केली. त्यात तिच्या कानाला दुखापत झाली. तिचा मुलगा पंकज महादेव यादव (३२) याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.

### भावाची भावाला मारहाण

अचलपूर : दारूच्या नशेत मोठ्या भावाने विनोद रुपरावजी काळे (५७) याने लहान भाऊ संजय रुपरावजी काळे (५५) याला मारहाण केली. त्याची पत्नी मध्ये आली असता, तिलाही शिवीगाळ केली. मुगलाईपुरा येथे घडलेल्या घटनेप्रकरणी परतवाडा पोलिसांनी गुन्हा नोंदवला.

### हुंड्यासाठी महिलेचा शारीरिक छळ

अचलपूर : माहेरहून हुंडा म्हणून सोने, चांदी आणण्यासाठी पतीसह सारच्यांनी विवाहितेचा छळ सुरू केला. तू दिसायला चांगली नाही म्हणत तिची मानहानीही केली. विवाहितेच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी पतीसह, सासू व सासरे तिघेही रा. अमरावती यांच्यावर गुन्हा नोंदवला. अशीच दुसरी घटना वरुड पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली.

# विधानसभा आश्वासन समितीचा पहिला 'पेपरलेस' अहवाल सभागृहात

## प्रलंबित आश्वासनांवर कडक भूमिका घेण्याचा रवी राणा यांचा इशारा

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२६ :** महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समितीचा पहिला अहवाल मंगळवारी सभागृहात सादर करण्यात आला. या वेळी आश्वासन समितीचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी शासकीय कामकाज अधिक पारदर्शक, गतिमान आणि आधुनिक करण्यासाठी अहवाल 'पेपरलेस' स्वरूपात उपलब्ध करून देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयाचे जोरदार स्वागत केले. विधानसभेच्या निर्णयानुसार हा अहवाल आता अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्याने लोकप्रतिनिधी व प्रशासनासाठी कामकाज सुलभ होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.



सभागृहात बोलताना राणा यांनी आश्वासन समितीच्या बैठकींचे महत्त्व अधोरेखित करत संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच मंत्रालयातील अधिकारी उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले. अधिकारी अनुपस्थित राहिल्यास समितीतर्फे शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव सभागृहात आणला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

राणा यांनी सांगितले की, २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विविध मंत्र्याकडून एकूण १,१८८ आश्वासने देण्यात आली होती. आश्वासन समितीने आतापर्यंत ११ बैठका घेऊन ४९१ आश्वासने निकाली काढली असून आणखी ५३ आश्वासनांबाबत विभागीय साक्षी घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. तरीही मोठया प्रमाणावर आश्वासने प्रलंबित असल्याने प्रशासनाने दर महिन्याला किमान एक आढावा बैठक घेऊन त्यांच्या पूर्ततेस गती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.मंत्र्यांनी सभागृहात दिलेली आश्वासने ही राज्यातील जनतेच्या अपेक्षा आणि प्रश्नांशी निगडित असतात. त्यामुळे मंत्र्यांनी स्वत:च्या दालनात नियमित बैठका घेऊन संबंधित विभागांना स्पष्ट दिशा दिल्यास प्रलंबित आश्वासनांची संख्या मोठया प्रमाणात कमी होऊ शकते, असे राणा यांनी सांगितले.विधानसभेचे कामकाज शिस्तबद्ध पद्धतीने पार पडत असताना त्याच शिस्तीने आश्वासन समितीच्या बैठकींचे आयोजन होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. संसदीय कामकाज अधिक धारदार, परिणामकारक आणि लोकाभिमुख व्हावे यासाठी सर्व लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. राणा यांनी शेवटी विधानसभेच्या नेतृत्वाचे आभार मानत समितीच्या माध्यमातून प्रलंबित प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला.

# आगामी काळात येणारे धार्मिक सण शांततेत साजरे करा

## ठाणेदार संजय आत्राम यांचे निर्देश



**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पापळ, दि.२६ :** आगामी काळात येत असलेल्या महापुरुषांच्या जयंती तसेच धार्मिक कार्यक्रम या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सुरक्षितेला प्राधान्य द्यावे असे आवाहन मंगरूळ चव्हाळा पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार संजय आत्राम यांनी केले आहे. आनंद साजरा करताना कायदा व सामाजिक नियमाचे भान राखणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले ते पापळ येथील स्मारक चौक येथील आयोजित शांतता समितीच्या बैठकीला मार्गदर्शन करताना बोलत होते. महापुरुषांच्या जयंती तसेच धार्मिक सण आनंदाचा असतो मात्र आनंदाच्या भरात अति उत्साही कार्यकर्त्यांनी मात्र आपला तोल जाऊ देऊ नये सर्वांनी संयमाने व जबाबदारीने उत्सव साजरे करावे असे ठाणेदार आत्राम यांनी नमूद केले. या शांतता समितीच्या बैठकीला सामाजिक कार्यकर्ते युवराज इंगळे माजी सरपंच विजय अज बले, ह भ प गजानन महाराज खरडकर, माझी उपसरपंच शेख हकीम, पत्रकार नंदकिशोर इंगळे ,विलास बोदडे गजानन बलखंडे राजू गडेकर,आदी उपस्थित होते.

# सिलिंडरचा तुटवडा; ग्रामीण भागात पुन्हा पेटल्या चुली

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**बेनोडा (श.), दि.२६ :** जगात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताला मोठी झळ बसत असून गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. परिणामी, वरुड तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच व्यावसायिक स्वयंपाकासाठी पुन्हा चुलींचा वापर वाढू लागला आहे.

युद्धामुळे भारतातील पेट्रोल, डिझेल, गॅस, सोने-चांदी, खाद्यतेल आदींच्या दरात मोठी वाढ झाली असून, सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक कोंडी होत आहे. त्यातच गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने केंद्र सरकारने तात्पुरत्या स्वरूपात व्यावसायिक सिलिंडरचा पुरवठा बंद केला आहे, तर घरगुती सिलिंडरला मर्यादित परवानगी देण्यात आली आहे.मात्र, ऑनलाइन बुकिंग केल्यानंतरही



४५ दिवस उलटून गेले तरी गॅस सिलिंडर मिळणे कठीण होत असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांनी वरुड शहरातील गॅस एजन्सी केंद्रावर मोठ्या प्रमाणावर गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे वाढती कमतरता लक्षात घेता ग्रामीण तसेच व्यावसायिक स्तरावर पुन्हा चुलींचा वापर करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

> गेल्या काही दिवसांपासून व्यावसायिक कारणांसाठी गॅस सिलिंडर उपलब्ध होत नसल्याने मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. परिणामी, अनेकांना पुन्हा चुलींचा आधार घ्यावा लागत असून, पूर्वीच्या काळातील दिवसांची आठवण ताजी होत असल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केल्यात.
>
> **पुरुषोत्तम पोटोडे**

# संत रुपलाल महाराज पुण्यतिथी सोहळ्यांची महाप्रसादाने सांगता

## वीस हजार भक्तांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, दि.२६ :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अंजनगाव सुर्जी येथील आराध्य दैवत राष्ट्रसंत रुपलाल महाराज यांच्या पुण्यतिथी निमित धर्माचार्य दादा महाराज कोळसकर महाराज ह्यांचे मधुर वाणीतून श्रीमदभागवत कथा कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते दि. १६ मार्च रोजी पासून विठ्ठल मंदिर परिसरात भक्तिमय वातावरनातं भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होतें





सात दिवस चालणाऱ्या कार्यक्रमात दररोज सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ यावेळेत ज्ञानेश्वरी पारायण व दैनंदिन कार्यक्रम दररोज सकाळी ५ ते ६ काकडा सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ व रात्रीला दररोज संध्याकाळी ६.३० ते १० यावेळेत धर्माचार्य दादा महाराज कोळसकर यांच्या मधुर वाणीतून भागवत कथेला सुरुवात झाली होती दररोज हजारो भावीक भागवत श्रवनाचा आस्वाद घेत होते कार्यक्रमाची सांगता दि २३ एप्रिल पर्यंत बुधवार ला सकाळी ८ वाजता संत रुपलाल महाराज पालखी रथाची शहरातून भव्य दिव्य अशी ढोल, तासे,दिंड्या,टाळ मृदूंगाचे गजरात, व विविध धार्मिक वेशभूषेच्या सह संपूर्ण शहरातून शोभायात्रा काढण्यात आली होती ह्यादरम्यान मिरवणूक मार्गावर भक्तांनी जागोजागी रस्त्यावर रांगोळ्या काढून, जागोजागी शरबत, बिस्कीट, ताक, केळी चे वाटप करण्यात आले होते शोभयात्रे नंतर पुरुषोत्तम महाराज नेमाडे यांच्या वाणीतून काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. ह्यामध्ये १० क्विंटल गव्हाचा शिरा, २० क्विंटल गव्हाच्या पोळया, ५ क्विंटल तांदूळ, १० क्विंटल भाजीपाला, ३० डब्बे तेल, सुका मेवा, व इतरही साहित्यासह महाप्रसादाचे वाटप करण्यात आले होते.

# प्रभू श्रीरामचंद्र आदर्श राजा - आ.सौ.सुलभा खोडके

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२६ :** प्रभू श्रीरामचंद्राच्या कृतीमधून सत्य, नैतिकता, वचनबद्धता, क्षमाशीलता आणि आदर्श नेतृत्व शिकता येते. त्यांनी धर्माचे पालन करणे, प्रतिकूल परिस्थितीतही धैर्य राखणे तसेच सर्व जीवांप्रती करुणा आणि आदर बाळगणे हे गुण दाखवून दिले.

श्रीरामरायांचा आदर्श राजा म्हणून असलेला आदर्श स्वभाव आणि वडिलांना दिलेला शब्द पाळण्याची त्यांची वृत्ती हे समाजासाठी प्रेरणादायी आहे.भगवान श्रीराम हे केवळ एक देवता नसून ते आदर्श पुरुष, आदर्श पुत्र, आदर्श भाऊ आणि आदर्श राजा म्हणून ओळखले जातात. त्यांच्या जीवनातील प्रत्येक प्रसंग आपल्याला जीवनातील मूल्ये शिकवतो. सत्य, संयम, कर्तव्यनिष्ठा, त्याग आणि धर्मनिष्ठा हे त्यांच्या जीवनाचे मुख्य आधार होते.प्रभू श्रीरामांना मर्यादा पुरुषोत्तम असे संबोधले जाते, कारण त्यांच्या जीवनातील प्रत्येक नातेसंबंधात त्यांनी मर्यादा, शिस्त आणि आदर्श आचरण जपले. ते केवळ एक महान राजा नव्हते, तर एक आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श भाऊ, आदर्श मित्र आणि



आदर्श शासक होते. त्यांच्या व्यक्तिमत्वात कर्तव्यनिष्ठा, सत्यनिष्ठा, त्याग, धैर्य आणि करुणा यांचा सुंदर संगम दिसतो. आधुनिक विज्ञान युगात माणसाकडे प्रचंड माहिती आणि तांत्रिक सामर्थ्य उपलब्ध असले, तरी योग्य मूल्यांची कमतरता अनेकदा जाणवते.आजच्या काळात व्यक्तीच्या हातात तंत्रज्ञान आहे., पण त्याच्या वापरासाठी आवश्यक असलेले नैतिक मार्गदर्शन अनेकदा कमी पडते. प्रभू श्रीरामांचे जीवन आपल्याला सांगते, की कोणत्याही युगात मानवी जीवनाची खरी उंची ही नैतिकता, संयम आणि कर्तव्यभावना यांवर अवलंबून असते. असे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

गुरुवार दिनांक २६ मार्च २०२६ रोजी श्रीराम नवमी निमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यादरम्यान अमरावती शहरात आयोजित विविध ठिकाणी श्रीराम नवमी कार्यक्रमाला घेऊन आयोजित स्थळी त्यांनी भेट दिली. सर्वप्रथम आमदार - सौ. सुलभाताई खोडके, आमदार - संजय खोडके, यश सुलभा संजय खोडके यांनी करुणा आणि समता, नैतिकता आणि प्रामाणिकपणा, समानता आणि आदर, नेतृत्व आणि व्यवस्थापन, ध्येयाप्रती बांधिलकी,आदर्श नेतृत्व, कर्तव्यनिष्ठा, क्षमाशिलता, एकतेची शक्ती आदींचे धडे आपल्या आचरणातून समुच्या विश्वाला देणाऱ्या कौसल्यानंदन प्रभू श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेस नमन - पूजन - वंदन व माल्यार्पण केले. रामनवमीच्या मंगल दिनाचे औचित्य साधून, प्रभू श्रीरामांच्या जीवनातून मिळणारे काही अमूल्य धडे आपण आयुष्यात उतरवले पाहिजेत. अशी सामूहिक प्रार्थना करीत खोडके दाम्पत्यांनी यावेळी विश्वमांगल्याची कामना केली. यावेळी जागोजागी सियावर रामचंद्र की जयचा सामूहिक जयघोष करीत सर्व भाविकभक्तांनी श्रीरामनवमी चा जल्लोष उत्साहात साजरा केला. याप्रसंगी ठिकठिकाणी देवालयात - गाभाऱ्यात तसेच आयोजन स्थळी मनमोहक फुलांची आरास करण्यात आली होती.

चित्तवेधक तोरणे, ध्वज- पताका या उपस्थितांच्या आकर्षणाचे केंद्र ठरल्या होत्या.पंजिरी प्रसादाचे वितरण, रामनामाचे संकीर्तन, महाप्रसादाचे आयोजन, अखंड रामधून तसेच आयोजन स्थळी आयोजित धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमात आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांनी सहभाग नोंदवला होता.

# साम्राज्यवाद आणि भांडवलशाही गाडल्याशिवाय जगात शांती आणि सुख नांदणार नाही

## कॉम्रेड सुभाष लांडे यांचे प्रतिपादन



**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पापळ,दि.२६ :** साम्राज्यशाही आणि भांडवलशाही गाडल्याशिवाय जगामध्ये सुख आणि शांती नांदू शकत नाही हे आज जगातील युद्धाच्या परिस्थितीवरून आणि भारतातील धर्मांध राजकारणावरून सिद्ध झाले आहे.साम्राज्यशाहीची भूक जगातील छोट्या आणि कमकुवत देशांना गिळंकृत करण्याचे आहे. त्याचबरोबर देशांमध्ये २०१४ पासून सत्तेमध्ये बसलेले नरेंद्र मोदी सरकार हे भांडवलदारांच्या हातचे कळसुत्री बावले आहे.युद्धाच्या परिस्थितीमुळे जगातील सर्वसामान्य जनता त्रस्त झाली असून त्याची झळ आपल्यालाही प्रचंड प्रमाणात बसत आहे. गॅस व पेट्रोलचा तुटवडा आणि वाढत्या किमती हे सर्वसामान्य जनतेचे जीवन जगणे मुश्किल करणार आहे. केंद्र सरकारच्या अमेरिकेसमोर नांग्या टाकण्याच्या धोरणामुळे व लोटांगण घालण्याच्या प्रवृत्तीमुळे देशातील जनता संकटात सापडली आहे. विदेशी धोरण पूर्णपणे असफल झाले आहे. भारताचा परंपराग मित्र इराण व रशिया दुरावला जात आहे. अमेरिकेची दादागिरी वाढत आहे.

**सल्ला**

## उन्हाळ्याची तीव्रता वाढली; पालकांना मुलांच्या सुरक्षिततेबाबत दक्षतेचे आवाहन

# पालकांनो, उन्हाळा सुरू झालाय...कुलर लावताय ना ? मग मुलांची काळजी घ्या..!

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अंजनगांव बारी, दि.२६ :** उन्हाळयाच्या वाढत्या तापमानामुळे घराघरांत कुलर, पंखे आणि एसीचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी कुलर हा स्वस्त आणि प्रभावी पर्याय मानला जातो. मात्र, या कुलरमुळेच लहान मुलांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो, याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते.

दरवर्षी कुलरमधून येणाऱ्या विजेच्या शॉकमुळे लहान मुलांचे अपघाती मृत्यू झाल्याच्या घटना समोर येतात. विशेषत: पाण्याशी संबंधित उपकरण असल्यामुळे कुलरमध्ये विजेचा प्रवाह येण्याची शक्यता अधिक असते. मुलांना या गोष्टीची जाणीव नसते आणि खेळता-खेळता ते



कुलरला हात लावतात, ज्यामुळे गंभीर अपघात घडू शकतात.

पालकांनी यासाठी काही महत्त्वाच्या बाबींची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम, कुलर योग्यरित्या अर्थिंग केलेला आहे का, हे तपासणे गरजेचे आहे. वायरिंग सैल किंवा खराब असल्यास तात्काळ दुरुस्ती करावी. कुलर चालू असताना त्यामध्ये पाणी भरताना किंवा साफसफाई करताना वीजपुरवठा बंद करणे आवश्यक आहे. याशिवाय, लहान मुलांना कुलरपासून दूर ठेवणे, त्यांना विजेच्या उपकरणांबद्दल योग्य ती समज देणे आणि सतत देखरेख ठेवणे हे पालकांचे कर्तव्य आहे. शक्य असल्यास कुलर अशा ठिकाणी ठेवावा जिथे मुलांचा थेट संपर्क होणार नाही. उन्हाळ्यात थंडावा मिळवताना सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. म्हणूनच, पालकांनी सतर्क राहून आपल्या मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पार पाडावी. थोडीशी काळजी घेतल्यास मोठा अपघात टाळता येऊ शकतो.मुलांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी खालील बाबींची विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुलांना दिवसभर पुरेसे पाणी देणे, लिंबूपाणी, ताक, घरगुती सरबतांचा समावेश करणे. दुपारी १२ ते ४ या वेळेत मुलांना बाहेर न पाठवणे. हलके, सैल आणि सुती कपडे वापरणे.शाळा किंवा क्लासेससाठी जाताना टोपी, छत्रीचा वापर आवश्यक. बंद वाहनात किंवा उष्णतेशी संपर्कात असलेल्या ठिकाणी मुलांना एकटे न ठेवणे. घरातील कुलर-फॅन चालू असले तरी वेळोवेळी थंड पाण्याने अंग पुसून देणे.येत्या काही दिवसांत तापमान आणखी वाढण्याची शक्यता असल्याने पालकांनी अधिक सतर्क राहण्याचे आणि मुलांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन स्थानिक आरोग्य विभागाने केले आहे.

## थोडक्यात



### दिग्रसमध्ये रमजान ईद उत्साहात

**दिग्रस :** येथे धावंडा नदीकाठच्या ईदगाहवर मुस्लीम बांधवांनी 'ईद-उल-फित्र'ची विशेष नमाज अदा केली. शहरे काजी मौलाना अबू जफर यांनी अनाथ, निराधार आणि दुखीतांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे हाच रमजानचा खरा अर्थ असल्याचे सांगत उपवासाचे महत्व विशद केले. यावेळी देशहितासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात येऊन राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडले. ईदगाहवर सकाळी नऊ वाजता विशेष नमाज, खुत्बा आणि फातेहा ख्वानी पार पडली. मुस्लीम बांधवांनी एकमेकांची गळाभेट घेऊन शुभेच्छा दिल्या. शहरातील विविध मशिदींसह ग्रामीण भागातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती. नमाजानंतर नागरिक दिवंगत नातेवाईकांच्या स्मरणार्थ पुसद मार्गावरील कब्रस्तानमध्ये जमले होते. या सोहळ्याला आजी-माजी नगराध्यक्ष, नगरसेवक आणि सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते. पोलिस निरीक्षक तथा परिविक्षाधीन पोलिस अधीक्षक डॉ. तेजस सारडा व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुस्लीम बांधवांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. पोलिस विभागाच्यावतीने शहरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सर्वधर्मीय बांधवांच्या उपस्थितीमुळे हिंदू-मुस्लीम ऐक्याचे अभिनव दर्शन घडले. उपवासाद्वारे तहान-भुकेची जाणीव होऊन इतरांप्रती दयाभाव निर्माण होतो, असा मोलाचा संदेश यावेळी शहरे काजींनी आपल्या भाषणातून समाजबांधवांना दिला.



### दराटी येथे महाराजस्व समाधान शिबिर

**फुलसावंगी :** तालुक्यातील दराटी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत दिमाखात पार पडले. शासनाच्या योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित या शिबिरात परिसरातील अंदाजे दोन हजार नागरिकांनी सहभाग नोंदविला. विविध विभागांच्या प्रलंबित कामांचा निपटारा करून एक हजार ५३३ लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे जागीच वाटप करण्यात आले. या शिबिरात संजय गांधी निराधार योजना, रेशन कार्ड, आयुष्मान भारत आणि आधार कार्ड सेवा अशा विविध २२ विभागांची कामे एकाच छताखाली पूर्ण करण्यात आली. यवतमाळचे उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार राम पंडित, आरोग्य अधिकारी डॉ. दुबे, दुय्यम निबंधक रणमले, वनपरिक्षेत्र अधिकारी डी.डी. मदने, कृषी सहायक जाधव आणि भगवान मेंडके यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. तसेच मंडळ अधिकारी ए.एम. पातुरकर, जुमडे, सुभाष आठाव आणि ग्राम महसूल अधिकारी के.बी. भरकाडे, जी.एन. राजणे, एस.पी. पोहदरे, एस.सी. वानखेडे यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. एकाच ठिकाणी शासकीय दाखले व योजनांचा लाभ मिळाल्याने दराटी परिसरातील नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले. प्रशासकीय गतीमानतेमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लागल्याने समाधान व्यक्त होत आहे.

### शेतकऱ्यावर रानडुक्कराचा हल्ला

**उमरखेड :** तालुक्यातील चालगणी शेतशिवारात ऊस पिकाला पाणी देत असताना युवा शेतकरी दत्ता भगवान शिंदे यांच्यावर रानडुकराने अचानक हल्ला केला. या भीषण घटनेत ते गंभीर जखमी झाले असून, शेजारील शेतकऱ्यांनी आरडाओरडा करून त्यांची रानडुकराच्या तावडीतून सुटका केली व उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. जखमी दत्ता शिंदे यांना तातडीने उमरखेड येथील खाजगी रुग्णालयात भरती करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. परिसरात वन्यप्राण्यांनी धुमाकूळ घातला असून पिकांच्या नासाडीसह आता मानवी जीवावरही बेतत असल्याने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. रानडुकरांच्या कळपाने केलेल्या या हल्ल्यामुळे वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वनविभागाने उच्छाद मांडणाऱ्या या वन्यप्राण्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा आणि जखमी शेतकऱ्याला उपचारासाठी भरीव आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे. वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे शेतात काम करणे कठीण झाले असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# ग्रामीण भागातही इंधनाचा तुटवडा

## घाटंजी, पुसद, उमरखेडमध्येही वाहनांच्या लांब रांगा, युद्धाच्या भीतीने नागरिकांची मोठी पळापळ

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २६ :** जागतिक युद्धाचे ढग गडद होत असतानाच इंधन पुरवठा खंडित होणार असल्याच्या अफवेने घाटंजी, पुसद आणि उमरखेड या तिन्ही तालुक्यांत इंधनासाठी नागरिकांची मोठी झुंबड उडाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून या तिन्ही शहरांमधील पेट्रोल पंपांवर वाहनांच्या अवाढव्य रांगा लागल्या असून, इंधन साठा संपण्याच्या भीतीपोटी नागरिक धास्तावले आहेत. प्रशासनाकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न होत असले तरी अफवांच्या बाजारामुळे गोंधळ कायम आहे.

सोशल मीडियावरून पसरलेल्या 'इंधन संपणार' या संदेशामुळे २-३ दिवसांचा साठा संपेल या भीतीने नागरिकांनी सकाळी ५ वाजेपासूनच पंपांवर रांगा लावल्या. विशेषतः दुचाकीस्वारांनी टाकी फुल्ल करण्यावर भर दिला, तर शेतकरी आणि ट्रॅक्टर धारकांनी डिझेलसाठी मोठ्या बाटल्या आणि कॅन आणल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले. अचानक वाढलेल्या या मागणीमुळे पेट्रोल पंप चालकांची मोठी ओढाताण झाली. अनेक ठिकाणी मागणी आणि पुरवठ्याचे गणित कोलमडल्याने काही पंपांना 'नो स्टॉक'चे फलक लावावे लागले, तर काही ठिकाणी केवळ मर्यादित स्वरूपात इंधन दिले जात आहे. या परिस्थितीमुळे मुख्य रस्त्यांवरील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली असून, काही शहरांत तासनतास वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. प्रशासकीय स्तरावरून साठा पुरेसा असल्याचे सांगितले जात असले तरी, प्रत्यक्ष पंपांवरील स्थिती मात्र वेगळीच आहे. इंधन ही अत्यावश्यक गरज असल्याने सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, ही स्थिती किती दिवस चालेल याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. केवळ अफवेमुळे निर्माण झालेल्या या कृत्रिम टंचाईने ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत केले आहे.



### पेट्रोलचा मर्यादित वाटप

**घाटंजी : शहरात २५ मार्चपासूनच इंधनासाठी धावपळ सुरू झाली. शहरातील तिन्ही पंपांवर मध्यरात्रीपर्यंत रांगा होत्या. काही पंपांवर केवळ २०० रुपयांचेच पेट्रोल दिले जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी दिसून आली. २६ तारखेला सकाळी साठा संपल्याच्या चर्चेमुळे दोन पंप बंद ठेवावे लागले, तर मनुष्यबळाच्या अभावामुळे इंधन वाटपात अडथळे आले. यामुळे अत्यावश्यक कामांसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांचे हाल झाले.**

### इंधन तुटवड्याची चर्चा निराधार

**पुसद : शहरात मध्यरात्रीपासूनच पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. टँक फुल करून घेण्यासाठी नागरिकांची झुंबड उडाली असली तरी, येथील डीलर असोसिएशनने इंधन तुटवड्याचा दावा फेटाळून लावला आहे. शहरात पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांनी संयम राखून केवळ आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.**

### छोट्या शहरांना युद्धाच्या झळा

**उमरखेड शहरातील देवसरकर आणि सारडा पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी ट्रॅक्टर व चारचाकी वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या. दुपारनंतर शहरातील साठा संपल्याने नागरिकांनी शहराबाहेरील पंपांवर धाव घेतली. आखाती देशातील युद्ध संघर्षामुळे पुरवठा थांबणार या भीतीने घरगुती गॅस आणि इंधनावर नागरिक अक्षरशः तुटून पडले आहेत. येथे वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली असून नागरिकांमधील संभ्रम कायम आहे.**

# पुसदमध्ये रामजन्मोत्सवाचा उत्साह

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि.२६ :** प्रभू श्रीरामचंद्रांच्या पावन जन्मोत्सवानिमित्त पुसद शहरात विश्व हिंदू परिषद आणि प्रभू श्रीराम जन्मोत्सव समितीच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. 'जय श्रीराम'च्या जयघोषाने आणि भक्तीच्या रंगाने संपूर्ण पुसद शहर न्हाऊन निघाले होते.

नयनरम्य देखावे आणि पारंपरिक पेहराव या शोभायात्रेचे मुख्य आकर्षण होते. ट्रॅक्टरवर साकारलेले प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सीता माता आणि संकटमोचन हनुमानाचे जिवंत देखावे लोकांचे लक्ष वेधून घेत होते. सोबतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याची केलेली सजावट सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. विविध पारंपरिक वेशभूषा परिधान केलेले कलाकार आणि ढोल-ताशांच्या गजरात थिरकणारे युवक यामुळे मिरवणुकीत मोठी रंगत आली होती. शहराच्या मुख्य चौकाचौकांत लावलेले बॅनर्स आणि ठिकठिकाणी डोलणारे भगवे ध्वज यामुळे वातावरणात चैतन्यमय झाले होते. या पूर्वतयारीमुळे उत्सवाचा आनंद द्विगुणित झाला. शिस्तबद्ध संचलनात निघालेल्या शोभायात्रेत अबालवृद्धांसह महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.



# कलगावमध्ये महाराजस्व समाधान शिबिर

## नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी घेतला आढावा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. २६ :** तालुक्यातील कलगाव येथे १७ एप्रिल रोजी डी.व्ही. एस.पी.एम. विद्यालयात सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी या अभियानाचा आढावा घेतला असून, कलगाव मंडळातील १७ गावांमधील नागरिकांना शासनाच्या विविध २२ विभागांच्या योजनांचा लाभ एकाच छताखाली मिळणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागातर्फे जनतेला सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हे अभियान राबवण्यात येत आहे. या शिबिरामुळे नागरिकांना विविध दाखले व कागदपत्रे एकाच ठिकाणी मिळणार असून, त्यांचा वेळ व खर्च वाचणार आहे. नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या मार्गदर्शनात झालेल्या आढावा बैठकीस नायब तहसीलदार सोनकुसरे, मंडळ अधिकारी सोनुने, काळे, पटवारी वायकुळे आणि चौधरी यांच्यासह कलगाव मंडळातील सर्व गावांचे पटवारी उपस्थित होते. प्रशासनाने २२ विभागांची कामे एकाच छताखाली पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या बैठकीला परिसरातील लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. १७ एप्रिलच्या या महाशिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल प्रशासनाच्यावतीने करण्यात आले असून, सर्व विभागांना सज्ज राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



# तीन वर्षांपासून फरार असलेला दरोडेखोर जेरबंद

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. २६ :** येथील वसंतनगर पोलीस ठाण्यातील दरोडा व फसवणुकीच्या गुन्ह्यात तीन वर्षांपासून फरार असलेला आरोपी संघपाल उर्फ संगम विजय गाणार (४०) याला पोलिसांनी २३ मार्च २०२६ रोजी नागपूर येथून अटक केली. पोलीस अधीक्षक कुमार चिंता आणि अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पुसद पोलिसांनी सापळा रचून ही यशस्वी कामगिरी केली.

आरोपी संघपाल गाणार याच्यावर वसंतनगर पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३९५, ४२०, ४०६ आणि १२०(ब) अंतर्गत गुन्हा नोंद होता. अटक टाळण्यासाठी तो विविध जिल्ह्यांत वास्तव्य करत पोलिसांना हुलकावणी देत होता. सहाय्यक पोलीस अधीक्षक हर्षवर्धन बी.जे. यांच्या आदेशानुसार पोलीस पथकाने गोपनीय माहिती मिळवून तो नागपुरात असल्याची खात्री केली. त्यानंतर पोलिसांनी अत्यंत शिताफीने त्याला ताब्यात घेतले. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक रवी चव्हाण, पोलीस हवालदार पंकज पातुरकर आणि सुनील मदने यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. गुन्हेगार कितीही चतुर असला तरी कायद्याच्या हातातून सुटू शकत नाही, हे पुसद पोलिसांनी या कारवाईतून पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. आरोपीला न्यायालयात हजर करण्याची प्रक्रिया सुरू असून, या गुन्ह्यातील अधिक तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी करण्यात येणार आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीतील जुगार अड्ड्यावर छापा

## बाभूळगाव पोलिसांच्या कारवाईत १२ जुगारी ताब्यात; १.१२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२६ :** बाभूळगाव पोलिसांनी अवैध धंद्यांविरुद्ध 'रिंगण'आवळत बाभूळगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सार्वजनिक आवारात खुलेआम सुरू असलेल्या मोठ्या जुगार अड्ड्यावर धाड टाकली. या कारवाईत पोलिसांनी १२ आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून, एकूण एक लाख १२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कृषी बाजार समितीच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून जुगाराचा डाव रंगत होता. पोलिस निरीक्षक दीपमाला भेंडे यांच्या नेतृत्वातील पथकाने बुधवारी, दि. २५ मार्च रोजी सायंकाळी ६ ते ७:१५ च्या सुमारास अचानक छापा टाकला. पोलिसांची एन्ट्री होताच जुगाराच्या अड्ड्यावर एकच पळापळ झाली, मात्र सतर्क पथकाने सर्वांना जागीच घेरले. या कारवाईत पोलिसांनी आरोपींच्या अंगझडतीतून ३६,२०० रुपये रोख, डावावरील १,६०० रुपये, ७५ हजार रुपये किमतीचे १० मोबाईल फोन आणि ५२ पत्ते असा एकूण सव्वालाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सहाय्यक पोलिस जमादार अन्सार मिर्झा कदीर बेग यांच्या फिर्यादीवरून पोलिस हवालदार राजू कुडमेथे यांनी 'महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा' कलम १२ (अ) नुसार गुन्हा नोंदवला आहे. अटक केलेल्यांमध्ये प्रदीप नांदुरकर, सागर गावंडे, अमोल कापसे, राजेश काटेकर, वैभव जयपूरकर, शेख आयुब, पंकज गावंडे, अभिलाष शेळके, शाहरुख खान, निखिल गाडगे, समाधान राऊत आणि अतुल राऊत यांचा समावेश आहे. पोलिसांनी अटक केलेल्या जुगाऱ्यांमध्ये एकाच राजकीय पक्षाच्या प्रतिष्ठीत काही स्थानिक नेत्यांचा समावेश आहे. त्यात कोणी सहकारी संस्थेचे संचालक, तर एक जण नगरपंचायतीचे सदस्य आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हवालदार विजय लोखंडे करत आहेत.

### धडक कारवाईचे सर्वत्र कौतुक

**बाभूळगाव पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र, शहरात आणि परिसरात इतरही अनेक अवैध धंदे (वरली मटका, अवैध दारू विक्री, रेती चोरी) डोके वर काढत असल्याची चर्चा आहे. या कारवाईप्रमाणेच इतर गुन्हेगारी प्रवृत्तींनाही 'आळा' घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने कंबर कसावी, अशी मागणी सुज्ञ नागरिकांकडून होत आहे.**

# विस्कळीत वीज पुरवठ्यामुळे नागरिक आक्रमक

## दोषींवर कारवाईची मागणी, सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिकांची महावितरणच्या कार्यालयावर धडक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**ढाणकी, दि. २६ :** शहरात विस्कळीत वीज पुरवठा आणि स्मार्ट मीटरच्या सक्तीविरोधात सर्वपक्षीय पदाधिकारी व नागरिकांनी महावितरणच्या कार्यालयावर धडक दिली. उपकार्यकारी अभियंता जाधव यांना निवेदन देऊन सहाय्यक अभियंता राहुल नाखले यांच्यासह दोषींवर कारवाईची मागणी करण्यात आली. वारंवार वीज खंडित झाल्याने शहरात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला.

महावितरणचे सहाय्यक अभियंता राहुल नाखले हे ग्राहकांच्या तक्रारींची दखल घेत नसल्याने संतापाचे वातावरण आहे. शहरात वीज पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेवर परिणाम झाला आहे. नागरिकांचा तीव्र विरोध असतानाही आमिषे दाखवून स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरू असल्याने ही पक्रिया थांबविण्याची मागणी करण्यात आली. वीज प्रश्नी विचारणा करणाऱ्या ग्राहकांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिली जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यावेळी बाळासाहेब पाटील चंद्रे, हाजी खाजाभाई कुरेशी, सादिक शेख, प्रशांत विनकरे, अमोल तुपेकर, नगरसेवक संजय सल्लेवाड, सूर्यकांता वासमवार, फिरोज भाई, बंटी वाळके, संभाजी गोरठकर, शेख जब्बार, संतोष मंतेवाड आणि सचिन तोटेवाड उपस्थित होते. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा सर्वपक्षीयांनी दिला आहे.



### जागतिक क्षयरोग दिनानिमित्त रॅली

**यवतमाळ, दि. २६ :** जागतिक क्षयरोग दिनानिमित्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांच्या उपस्थितीत भव्य रॅली व मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. जिल्हा महिला व बाल रुग्णालयातून सुरू झालेल्या या रॅलीद्वारे नागरिकांना क्षयरोगाची लक्षणे व उपचारांबाबत माहिती देण्यात आली. जिल्हा परिषद सभागृहात मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करून जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांनी क्षयरुग्णांना मानसिक आधार देण्याचे आवाहन केले. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सागर जाधव यांनी विविध योजनांची माहिती दिली. यावेळी डॉ. क्रांतीकुमार नावंदीकर, डॉ. नितेश उपाध्याय, डॉ. मनोज तगडपल्लीवार, डॉ. नाझिया काझी आणि डॉ. हर्षलता गायनार उपस्थित होते.

# 'भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू हे देशाचे खरे डायमंड - उदयपाल महाराज

## मारेगाव येथे किर्तनातून जागवल्या देशभक्तीपर जाणिवा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**मारेगाव, दि. २६ :** भारतीय कम्युनिस्ट पक्ष मारेगाव शाखेच्यावतीने ग्रामपंचायत पटांगणात शहीद दिनानिमित्त सप्तखंजेरी वादक उदयपाल महाराज यांच्या प्रबोधनात्मक किर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उदयपाल महाराजांनी महान क्रांतिकारी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या बलिदानाचे महत्व सांगत, मानवाच्या मुक्तीसाठी लढणारे हे क्रातीकारक देशाचे खरे 'डायमंड' असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमात कॉ. अनिल हेपट, अनिल घाटे आणि सुनील गेडाम यांच्या हस्ते उदयपाल महाराजांचा शॉल व मोमेंटो देऊन सत्कार करण्यात आला. राकेश खामणकर व अनिल हेपट यांनी शहीद भगतसिंग यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. उदयपाल महाराजांनी आपल्या प्रभावी खंजेरी वादनातून शहरवासीयांचे सामाजिक व राजकीय प्रबोधन करत देशभक्तीच्या जाणिवा प्रबळ केल्या. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. श्रीकांत तांबेकर यांनी केली, तर संचालन डॉ. विनोद आदे यांनी केले. आभार प्रदर्शन संयोजक प्रफुल्ल आदे यांनी मानले. या सोहळ्याला नागरिकांची मोठी उपस्थिती होती. तसेच २३ मार्च रोजी यवतमाळच्या दर्डानगर येथे प्रा. युगल रायलू यांचे जाहीर व्याख्यान संपन्न झाले. मारेगावच्या या उपक्रमातून क्रांतीकारकांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात आला.










सर्व छायाचित्र : संजीव भीतकर (यवतमाळ)

# प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव जल्लोषात साजरा!

## शोभायात्रा, मिरवणुकीने वेधले लक्ष, ढोल-ताशांचा गजरात आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषात जन्मोत्सव साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२६ :** 'राम जन्मोत्सव सोहळा, आनंदे लोक पाहाती' या उक्तीप्रमाणे यवतमाळ शहर आणि संपूर्ण जिल्ह्यात प्रभू श्रीरामचंद्र यांचा जन्मोत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. ढोल-ताशांचा गजरात आणि 'जय श्रीराम'च्या जयघोषात निघालेल्या भव्य शोभायात्रेने संपूर्ण जिल्ह्यातील जनतेचे लक्ष वेधून घेतले होते. शहर, गाव सर्वच जणूकाही राममय झाल्याचे दृश्य बघायला मिळाले.

यवतमाळ शहरातील जयहिंद चौकातील श्रीराम मंदिरात प्रभू श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण यांच्या मूर्तींचे विधिवत पूजन करून दुपारी शोभायात्रेला प्रारंभ झाला. यंदा दक्षिण भारतीय शैलीतील कलाकृतींनी नटलेला रामरथ आकर्षणाचे केंद्र ठरला होता. विशेष म्हणजे, हा रामरथ रामभक्तांनी हाताने ओढून मार्गक्रमण केले. यामध्ये माजी मंत्री मदन येरावार, अमोल ढोणे, देवा राऊत, राम लोखंडे यांच्यासह पोलिस उपअधीक्षक दिनेश बैसाने, शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार जाधव, नरेश रणधीर रथ ओढण्यात सहभाग



घेतला. या शोभायात्रेत १०० हून अधिक चित्ररथांचा समावेश होता. गोव्याच्या सांस्कृतिक विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या 'दुर्गासुर वध'या चित्ररथाने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. यासोबतच गणपती-कार्तिकेय यांचे असुरांशी युद्ध, कर्नाटकातील प्रसिद्ध 'बावली नृत्य' आणि पांढरकवडा येथील पारंपारिक 'आदिवासी दंडार नृत्य' यांनी शोभायात्रेची रंगत वाढवली. शोभायात्रेच्या मार्गावर ठिकठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या, तर संपूर्ण शहर भगव्या ध्वजांनी आणि तोरणांनी नटले होते. दुर्गा वाहिनीच्या कार्यकर्त्यांनी साहसी कसरती सादर केल्या, तर स्थानिक व्यायामशाळा आणि आखाड्यांमधील तरुणांनी आपल्या शारीरिक कौशल्यांचे प्रदर्शन केले. मल्लखांब आणि मर्दानी खेळांनी उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे केले. या सोहळ्यात महिला, बालके आणि वृद्धांची उपस्थिती लक्षणीय होती. बजरंग दलाच्या स्वयंसेवकांनी सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी सांभाळली, तर पोलिस प्रशासनाने संपूर्ण शहरात चोख बंदोबस्त ठेवला होता. ही शोभायात्रा अत्यंत शांततेत पार पडली. जयहिंद चौकातून निघालेल्या या यात्रेचा समारोप संत सेना चौकात महाआरतीने झाला.

### विना डीजे... पारंपारिक वाद्यांच्या गजरात दुचाकी रॅली!

**रामनवमीनिमित्त यवतमाळात पहाटे पारंपारिक वेशभूषेत भव्य दुचाकी रॅली काढण्यात आली. 'डीजे'चा वापर टाळून पारंपारिक वाद्यांच्या गजरात निघालेल्या या रॅलीने सर्वांचे लक्ष वेधले. दत्त चौकातून निघालेल्या या प्रभातफेरीचे ठिकठिकाणी रांगोळ्या काढून आणि थंड पेयांचे वाटप करून स्वागत करण्यात आले. या रॅलीत राम लोखंडे, प्रदीप खराटे, अभिजित डोंगरे, संतोष हरणखेडे, गौरव सूचक, अमोल ढोणे, मनोज औदार्य, श्याम माकोडे, सचिन तुरकर, भूपेंद्र परिहार, अश्विव बोपचे, मनीष बिसेन, योगिन तिवारी, विवेक सज्जनवार, ईश्वर पिसे, सुरज ठाकूर, अजिंदर चावला, गोविंद मोर, किशोर शहा, राजू खंडारकर, उज्ज्वल सैनी, अंकुश जयस्वाल, ज्ञानेश्वर रुईकर, रतन अन्नेलवार, राहुल ढोके, विनोद सानप, कार्तिक निकम आदी सहभागी झाले होते.**



### 'जय श्रीराम'च्या जयघोषाने दुमदुमली औदुंबरनगरी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि.२६ :** प्रभू श्रीरामचंद्रांच्या जन्मोत्सवानिमित्त उमरखेड शहरात 'श्रीराम मित्र मंडळ' आणि 'सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समिती'च्या वतीने भक्तीमय वातावरणात शोभायात्रा काढण्यात आली. 'जय श्रीराम'च्या जयघोषाने संपूर्ण शहर 'राममय' झाले होते.

गुरुवारी सकाळी ११ वाजता साई मंदिरापासून श्रीराम मित्र मंडळाच्या शोभायात्रेला प्रारंभ झाला. या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे हनुमानाची आणि अस्वलाची वेशभूषा केलेले कलाकार होते, ज्यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. 'भारत का बच्चा बच्चा जय श्रीराम बोलेगा...' या गीताच्या तालावर ढोल-ताशांच्या गजरात तरुणाई मोठ्या संख्येने थिरकली. शहरात ठिकठिकाणी या शोभायात्रेचे जंगी स्वागत करण्यात आले. दुसरीकडे, सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्या वतीने वसंतनगर भागातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत विविध पथकांनी आपली नेत्रदीपक युद्धकला आणि साहसी प्रात्यक्षिके सादर केली. हे कौशल्य पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. कडक उन्हाची तमा न बाळगता आबालवृद्धांनी या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. उमरखेड शहरात चैतन्याचे वातावरण होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक, माहेश्वरी चौक, गांधी चौक आणि खडकपुरा भागातील रस्ते अन् घरे भगव्या ध्वजांनी नटली होती. 'गाव करील ते राव काय करील'या म्हणीप्रमाणे सर्वांनी एकत्र येत हा उत्सव शिस्तबद्ध आणि शांततेत पार पाडला. अप्रिय घटना टाळण्यासाठी उमरखेड पोलिसांनी शहरात चोख बंदोबस्त ठेवला होता.



## महत्वाचे

### शेतकऱ्याची आत्महत्या

**दारव्हा :** तालुक्यातील चिखली (रामनाथ) येथील शेतकरी रामदास बापूराव सरोदे यांनी काल (दि.२५) आत्महत्या केली. कर्जाला कंटाळून त्यांनी गळफास घेतल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी एक मुलगा, असा आप्त परिवार आहे.

### भरधाव रिक्षाला वाहनाची धडक

**दिग्रस :** दिग्रस येथील साखर कारखाना परिसरात २५ मार्च रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास रिक्षाला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अपघात झाला. असलम बेग रफीक बेग हे आपल्या रिक्षातून वझीर कोथमीरे, नशिम कोथमीरे आणि नदीम कोथमीरे यांना घेऊन जात असताना वाहन क्रमांक एमएच १४ जी ए ९०९० च्या चालकाने भरधाव वेगाने वाहन चालवून त्यांच्या रिक्षाला धडक दिली. या भीषण अपघातात रिक्षा चालक आणि प्रवासी जखमी झाले असून, याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### एकास मारहाण

**दिग्रस :** दिग्रस पोलिस स्टेशन परिसरात तक्रार देऊन घरी परतणाऱ्या महिलेला आरोपींनी २५ मार्च रोजी दुपारी ५:४० वाजता संगणमताने मारहाण केली. प्रांजली रामदास लोणारे ही तक्रार देऊन पतीसह घरी जात असताना गीताबाई गणेश गव्हाने, अंजली गणेश गव्हाने आणि अरूणा गव्हाने यांनी तिला अडवले. आरोपींनी हाताने केस धरून डोक्यावर दगडाने प्रहार करून जखमी केले, तसेच शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेची नोंद दिग्रस पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# घाटंजी वनपरिक्षेत्र कार्यालयाचा वीजपुरवठा खंडित

## 'महावितरण'ची कारवाई : थकबाकी भरल्याशिवाय वीजपुरवठा सुरू होणार नाही!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**'घाटंजी वनपरिक्षेत्र कार्यालयाकडे जानेवारी २०२५ पासून थकबाकी प्रलंबित होती. वारंवार नोटिसा देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने नियमानुसार वीजपुरवठा खंडित केला आहे. थकीत रकमेचा पूर्ण भरणा झाल्यावरच पुरवठा पूर्ववत केला जाईल.'**

**- व्ही. एम. उराडे, उपकार्यकारी अभियंता, घाटंजी.**

**घाटंजी, दि.२६ :** आर्थिक वर्षाच्या अखेरीस महावितरणने थकबाकीदारांविरुद्ध कडक मोहीम उघडली आहे. वारंवार सूचना देऊनही ९६हजार ९३५रुपयांचे वीज बिल न भरल्यामुळे, घाटंजी येथील वनपरिक्षेत्र कार्यालयाचा वीजपुरवठा महावितरणने खंडित केला आहे. शासकीय विभागच थकबाकीदार निघाल्याने प्रशासनाच्या कारभारावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या कार्यालयाकडे जानेवारी २०२५ पासून वीजबिल थकीत होते. महावितरणने वेळोवेळी लेखी नोटिसा बजावून आणि तोंडी सूचना देऊनही वनविभागाकडून कोणतीही ठोस हालचाल झाली नाही. अखेर नियमानुसार महावितरणने वीज कापण्याचे कठोर पाऊल उचलले. या कारवाईमुळे कार्यालयाचे दैनंदिन कामकाज पूर्णपणे कोलमडले आहे. संगणकीय प्रणाली ठप्प झाल्याने महत्त्वाची कागदपत्रे आणि फाईल्स रखडल्या आहेत. सध्या उन्हाचा कडाका वाढत असताना, पंख्याविना काम करताना कर्मचाऱ्यांच्या जीवाची काहीली होत आहे. दुसरीकडे, आपली कामे घेऊन येणाऱ्या नागरिकांना ताटकळत राहावे लागत असल्याने संताप व्यक्त होत आहे. 'सर्वसामान्यांचे वीज बिल थकले की तातडीने कारवाई करणारे प्रशासन, सरकारी कार्यालयाची थकबाकी एक लाखापर्यंत पोहोचेपर्यंत गप्प का बसते?' असा सवाल नागरिक विचारत आहेत. महावितरणने स्पष्ट केले आहे की, केवळ वनविभागच नव्हे तर इतर कोणत्याही शासकीय कार्यालयाने थकबाकी न भरल्यास त्यांच्यावरही अशीच कारवाई केली जाईल. थकबाकीचा पूर्ण भरणा केल्याशिवाय वीजपुरवठा पुन्हा जोडला जाणार नाही, यावर विभाग ठाम आहे.

### शेतविवादातून काठीने जबर मारहाण

**आर्णी, दि. २६ :** माळहिवरा परिसरात बकरी चारण्याच्या कारणावरून २६ मार्च रोजी दुपारी २ वाजता लिलाबाई चंद्रभान आगोसे यांना आरोपींनी काठीने मारहाण केली. शेतात बकऱ्या नेल्याचा राग धरून शंकर वसंतराव आगोसे आणि संगीता शंकर आगोसे यांनी फिर्यादीसोबत वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन आरोपींनी काठीने मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. या हल्ल्याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात शरीर दुखापतींच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. तयामुळे चिंता निर्माण झाली आहे.

# 'जय मुंगसाजी माउली'च्या जयघोषाने दुमदुमले देवगाव

## श्रीमद्भागवत कथेची सांगता



आर्णी : तालुक्यातील देवगाव येथे मुंगसाजी माउली प्रगटदिनानिमित्त काढण्यात आलेली मिरवणूक.

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि.२६ :** तालुक्यातील देवगाव येथे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुरू झालेल्या 'श्रीमद्भागवत संगीतमय जीवनमृत कथा' व 'ज्ञानयज्ञाची' सांगता श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर मोठ्या उत्साहात झाली. परमपूज्य मुंगसाजी माउलींच्या प्रगटदिन सोहळ्यानिमित्त आयोजित या कार्यक्रमात भक्तीचा जनसागर लोटला होता.

श्रीक्षेत्र धामणगाव निवासी परमहंस भगवान मुंगसाजी माउली यांचा प्रगटदिन दरवर्षी श्रीराम नवमीला साजरा केला जातो. या निमित्ताने १९ मार्चपासून ह.भ.प. शुभम महाराज कुडवे (पंढरपूर) यांच्या अमृतवाणीतून भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. २६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता गावातून माउलींची भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'जय मुंगसाजी माउली, जय माउली' अशा जयघोषाने संपूर्ण आसमंत दुमदुमून गेला होता. मिरवणुकीदरम्यान देवगावच्या प्रत्येक घरासमोर आकर्षक रांगोळ्या काढून व दीपप्रज्वलन करून माउलींचे स्वागत करण्यात आले. वारकरी संप्रदायाच्या तालावर भाविक मंत्रमुग्ध होऊन नाचत होते. गावातील हे भक्तिमय वातावरण पाहून जणू दिवाळीच साजरी होत असल्याचा भास होत होता. महाराजांनी आपल्या निरुपणातून माउलींच्या विविध लीलांचे दर्शन झाँकीच्या माध्यमातून घडवल्याने श्रोते भक्तीरसात न्हाऊन निघाले. दुपारी १२ वाजता ह.भ.प. शुभम महाराज कुडवे यांच्या रसाळ 'काल्याच्या कीर्तनाने'या सप्ताहाची अधिकृत सांगता झाली. या सोहळ्यासाठी देवगावसह परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थिती लावून महाप्रसादाचा लाभ घेतला. मुंगसाजी माउलींच्या दर्शनासाठी झालेली भाविकांची गर्दी आणि शिस्तबद्ध नियोजनामुळेहा सोहळा परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.

# आदिवासींच्या विकासासाठी उद्योगांना चालना देऊ!

## आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके; पांढरकवडा येथील 'आदिवासी उद्योग जत्रे'ला प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २६:** आदिवासी समाजातील तरुणांनी उद्योग, व्यवसायाची कास धरायला हवी. आपले पारंपरिक व्यवसाय करित असतानाच उद्योग उभारणीकडे लक्ष द्यावे. आदिवासींच्या विकासासाठी सरकार उद्योगांना चालना देत आहे. आपणही उद्योगांना चालना देऊन विकास साधूया, असे आवाहन राज्याचे आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी केले. ते येथे आयोजित 'आदिवासी उद्योग जत्रे'त बोलत होते.

आदिवासी समाजाला आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आयोजित 'आदिवासी उद्योग



पांढरकवडा : 'आदिवासी उद्योग जत्रा'चे उद्‌घाटन करताना आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके व उपस्थित मान्यवर.

जत्रा'अभूतपूर्व उत्साहात पार पडली. या जत्रेचे उद्घाटन ना. प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार राजू तोडसाम, माजी मंत्री प्रा. वसंतराव पुरके, वनसंरक्षक मानकर आणि उपवनसंरक्षक बहाळे आदी उपस्थित होते. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे विविध राज्यांतील आदिवासी बांधवांच्या एकत्र येण्याने, या जत्रेत कला, उद्योग आणि संस्कृतीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. या महोत्सवात महाराष्ट्रासह परराज्यांतील आदिवासी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. त्यांनी पारंपरिक हस्तकला, साहित्य, वनोत्पादने आणि आदिवासी खाद्यसंस्कृतीचे आकर्षक स्टॉल्स उभारले होते. या वैशिष्ट्यपूर्ण वस्तू पाहण्यासाठी आणि खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. ग्राहकांच्या या उदंड प्रतिसादाने विक्रेत्यांच्या उत्साहाला 'उधाण'आले होते. संयोजक पी. एल. कुमरे यांचे नियोजन आणि अध्यक्ष भाऊराव मरापे यांच्या मार्गदर्शनात हा कार्यक्रम पार पडला. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या भावनेतून आयोजित या जत्रेमुळे भविष्यात आदिवासी समाज अधिक संघटित, सक्षम व स्वयंपूर्ण होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### तरुणांसाठी रोजगाराची नवी दिशा

**केवळ खरेदी-विक्रीच नव्हे, तर व्यावसायिक प्रशिक्षण हे या जत्रेचे प्रमुख आकर्षण ठरले. तज्ज्ञांनी चंदन शेती, मशरूम उत्पादन, मधमाशी व कुक्कुटपालन, वनशेती तसेच शेतीतील नुकसानाबाबत उपाययोजनांवर मार्गदर्शन केले. 'कमी भांडवल, अधिक नफा' या तंत्रामुळे बेरोजगार तरुण आणि शेतकऱ्यांना उत्पन्नाचे नवे व शाश्वत मार्ग गवसले आहेत.**